कृषीवल
रायगड, रविवार, दि. ४ जानेवारी २०२६
किंमत ४ ₹

## मराठी साहित्य संमेलनाला गालबोट

**सातारा :** साताऱ्यात आयोजित अखिल भारतीय मराठी संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी खळबळजनक घटना घडली. या संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला एका व्यक्तीने काळे फासले. हा व्यक्ती रिपाइंचा कार्यकर्ता असल्याचा दावा केला जात आहे. त्याने विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला काळे का फासले? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण, यामुळे साहित्य वर्तुळात एकच खळबळ माजली आहे. साताऱ्यातील मराठी साहित्य संमेलनाचे शुक्रवारी सकाळी साहित्यिक डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले. त्यानंतर शनिवारी दुसऱ्या दिवशी संमेलनात वेगवेगळे कार्यक्रम सुरू असताना संदीप जाधव नामक एका व्यक्तीने संमेलनाचे पान २ वर

ऑफिस कामाकरिता अनुभवी
मुलगी/महिला पाहिजे.
पात्रता – .B.com, Typing, MS-CIT
पगार – १२०००–१५०००
पत्ता – नांदईपाडा, झिराड, अलिबाग–रायगड
संपर्क क्र. ९८२२०८३३५३,
८४०७९८२७१२

# दादांच्या सोबतीचा पश्चाताप

## भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांकडून समाचार

। पुणे । प्रतिनिधी ।

**उपमुख्यमंत्री अजित पवार हे भाजपसोबत कशापद्धतीने जोडले गेले, हे सर्वांना माहिती आहे. त्यांना सोबत घेण्याबाबत पुणे, पिंपरी–चिंचवडमधील पक्षाचे पदाधिकारी मला थोडा विचार करा म्हणून सांगत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही मी नेहमी खासगीत सांगायचे की, थोडा विचार करावा. आता पवार यांना सोबत घेतल्याचा पश्चाताप होत असल्याचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले. ते शनिवारी निगडीतील कार्यक्रमात बोलत होते. दरम्यान, कोणाच्या जीवावर कोण काय बोलतोय, असा सवालही त्यांनी केला.**

पिंपरी–चिंचवड महापालिका निवडणुकीतील भाजप उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ चव्हाण यांच्या हस्ते शनिवारी निगडीतील भक्ती–शक्ती चौक येथे झाला. त्यावेळी ते बोलत होते. निवडणूक प्रमुख आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, अमित गोरखे, उमा खापरे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी खासदार अमर साबळे, माजी महापौर संजोग वाघेरे यावेळी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी महापालिकेतील भाजपच्या राजवटीतील कारभारावर गंभीर आरोप केले होते. त्याला चव्हाण यांनी शनिवारी प्रत्युत्तर दिले.

चव्हाण म्हणाले, निवडणुकीत खोटे कथानक पसरविण्यासाठी काही खासगी संस्था सल्ला देतात. अजित पवार हे केंद्र, राज्यात आमच्यासोबत जोडले आहेत. या निवडणुकीमध्ये त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. सल्ला देणाऱ्या संस्थेने (एजन्सी) सांगितल्याशिवाय पवार खोटे आरोप करणार नाहीत. त्यांचे सर्व आरोप खोटे आहेत. आम्ही खाणार नाही, कोणाला खाऊ देणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पारदर्शकपणे काम होईल, याकडे केंद्र, राज्यातील नेत्यांचे लक्ष असते. निवडणुकीनंतर ते झाले होते, जाऊ दे असे पवार हसत–हसत म्हणतील. सध्या खोटे बोल, पण रेटून बोल, या पद्धतीने ते चालले आहेत. भाजपची संघटनेची ताकद चांगली आहे. मतदार सुज्ञ असून, विकासाला पान २ वर

### आम्हाला भाजपवर टीका करण्याची गरजच नाही : सामंत



पुणे महापालिका निवडणुकीत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने १२० उमेदवार मैदानात उतरवले आहेत. आमचय मित्रपक्षाला वाटले होते की, आम्ही ४० उमेदवारही उभे करु शकणार नाही, पण आम्ही काही तासांतच १२० जणांना ताकद दिली, अशा शब्दात मंत्री उदय सामंत यांनी भाजपचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधला. तर, आम्हाला कोणावरही टीका करण्याची गरज नाही, कारण ते काम अजित पवार चोख पार पाडत आहेत, असा टोलाही सामंत यांनी लगावला.शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी पुण्यात शिवसेनेच्या प्रचाराचा नारळ फोडला. यावेळी बोलताना त्यांनी भाजप आणि अजित पवार गआवर शालजोडीतले टोले लगावले. पुण्याचा पुढचा महापौर शिवसेनेच्या मदतीशिवाय होऊ शकणार नाही, असा ठाम विश्वास व्यक्त केला. भाजप आणि शिवसेना ही नैसर्गिक युती आहे ही टिकली पाहिजे, असे आमचे म्हणणे होते. पण, काही लोकांचा गैरसमज होता की, आम्ही ४० देखील उमेदवार उभे करु शकणार नाही. आम्हाला वेळ कमी पडला, नाहीतर आपण १६५ उमेदवार उभे केले असते, असा टोला सामंत यांनी भाजपला लगावला.

## वेधक

### टेम्पोला अपघात; चालक ठार

**खोपोली :** मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर शनिवारी सकाळी एका आयसर टेम्पोने धुक्यात समोरील वाहनाला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात टेम्पो चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे. मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरुन आयसर टेम्पो (डीडी ०१ आर ९९५३) मुंबईहून पुण्याकडे माल घेऊन जात असताना धुक्यामुळे टेम्पो चालकाला समोरील वाहनांचा अंदाज न आल्याने त्याने समोरील अज्ञात वाहनाला पाठीमागून धडक दिली. यात टेम्पोच्या केबिनमध्ये अडकून चालकाचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, डेल्टा फोर्स व देवदूत यंत्रणा, अपघातग्रस्त टीमचे सदस्य तात्काळ घटनास्थळी दाखल होत टेम्पोमध्ये अडकेलेल्या चालकाला बाहेर काढले.

### १४ माओवाद्यांना घातले कंठस्नान

**नवी दिल्ली :** छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलाने केलेल्या कारवाईमध्ये १४ माओवादी ठार झाल्याची माहिती समोर आली आहे. छत्तीसगडच्या सुकमा आणि बिजापूर जिल्ह्यात शनिवारी सकाळी सुरक्षा दलाच्या जवानांनी दोन ठिकाणी वेगवेगळी कारवाई केली. या दोन्ही ठिकाणच्या कारवाईत एकूण १४ माओवादी ठार झाले आहेत. सुरक्षा दलांकडून अद्यापही शोधमोहीम सुरू आहे. या चकमकीत ठार झालेल्या माओवाद्यांमध्ये आठ लाख रुपयांचं बक्षीस असलेला नक्षलवादी कमांडर मंगडू याचाही समावेश आहे.

## सुपारी देऊनच मंगेश काळोखेंची हत्या

### पोलीस अधीक्षक आचल दलाल यांची माहिती

। खोपोली । प्रतिनिधी ।

खोपोलीतील शिवसेना नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांच्या हत्येप्रकरणी आतापर्यंत १२ जणांना अटक करण्यात आली आहे. मंगेश काळोखे यांची हत्या सुपारी देऊनच करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. ज्यांचा या गुन्ह्यात सहभाग आढळून आला आहे, त्यांना रायगड पोलिसांकडून अटक करण्यात आली असल्याची माहिती पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी दिली.



राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे आणि प्रवक्ते भरत भगत यांचा या गुन्ह्यात अद्याप तरी सहभाग आढळून आलेला नाही. मात्र, त्याबाबत तपास सुरू असून, तो अंतिम टप्प्यात असल्याचे पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी सांगितले आहे. २६ डिसेंबर रोजी आपल्या मुलीला शाळेत सोडून घरी परतत असताना मंगेश काळोखे यांची निर्घृणपणे हत्या केली होती.

मंगेश काळोखे हे नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती होते. या हत्येचा सीसीटीव्ही समोर आला होता. याआधी नऊ आरोपी अटकेत होते. पोलिसांनी अजून तीन आरोपींना अटक केल्याने एकूण १२ आरोपींना आतापर्यंत अटक झाली आहे. मंगेश काळोखे यांच्या हत्येची सुपारी देण्यात आली होती. कॉन्ट्रॅक्ट किलिंगची ही घटना असून, देवकर यांनी सुपारी देऊन पाच जणांना बोलावलं आणि हा गुन्हा केला. त्यातील दोन आरोपी दर्शन देवकर आणि महेश धायतडक हे आरोपी निष्पन्न झाल्याचे आचल दलाल यांनी सांगितले.

#### सुधाकर घारे यांना का अटक केली नाही?

सध्याच्या पुराव्यात सुधाकर घारे यांना अटकेची गरज नसल्याचे सांगून शेवटचा आरोपी अटक झाल्यावर हत्येचे चित्र स्पष्ट होईल, असे पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी सांगितले.

## बोर्ली ग्रा.पं.मध्ये निधीचा अपहार



- **माहिती अधिकारामुळे फसवणुकीचा पर्दाफाश**
- **जीएसटी बिले, वर्क ऑर्डर गायब**

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत बोर्लीमध्ये २०२३–२४ व २०२४–२५ या आर्थिक वर्षांत मिळालेल्या १५व्या वित्त आयोग निधीच्या विकासकामांमध्ये कोट्यवधींच्या अपहाराचा गंभीर संशय व्यक्त होत आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्ते प्रतिक प्रमोद कणगी (रा. ताराबंदर, बोर्ली–मांडला) यांच्या पाठपुराव्यामुळे हा घोटाळा उघडकीस आला असून, प्रशासनाला अखेर चौकशी सुरू करावी लागली आहे.

माहिती अधिकारांतर्गत मागविण्यात आलेल्या कागदपत्रांत जीएसटी बिले, वर्क ऑर्डर आणि पूर्णत्व प्रमाणपत्रेच नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. कागदोपत्री कामे पूर्ण दाखवली पान २ वर

## माफियांना रायगड पोलिसांचा दणका

### वर्षभरात ९३ कोटी ४५ लाखांचा ऐवज जप्त

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जुगार, मटक्यासह अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या ठिकाणी रायगड पोलिसांनी छापे टाकले. या छाप्यांमध्ये ९३ कोटी ४५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. रायगड पोलिसांची ही कारवाई समाधानकारक असली, तरी काही मंडळी छुप्या पद्धतीने हे धंदे चालवित आहेत. रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या दणक्याने अवैध धंद्यांचे धाबे दणाणून गेले आहेत. रायगड पोलिसांची वर्षभरातील कामगिरी समाधानकारक असली तरी जिल्ह्यातील अनेक भागात छुप्या पद्धतीने अवैध धंदे चालविले जात असल्याची तक्रारी आहेत.

रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी नशा येणारे तसेच अन्य अंमली पदार्थ विक्री, वाहतूक व निर्मितीत वाढ होत आहे. तसेच जास्त पैसे मिळविण्याच्या उद्देशाने काही मंडळी मटका, जुगारासारखे अवैध धंदे चालवित असल्याचे तपासातून समोर आले आहे. या व्यवसायामुळे अनेकांची कुटुंब उद्ध्वस्त होण्याची भीती आहे. काही मंडळी नशा येण्यासाठी अंमली पदार्थांचा वापर करतात. तर, व्यायामशाळेतील काही तरुण मंडळी नशा येणारे इंजेक्शनचा वापर करीत असून, मटका व जुगारसारखे अवैध धंदे राजरोसपणे चालवित असल्याची माहिती रायगड पोलिसांना मिळाली. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळी पथके तयार पान २ वर

#### अवैध दारु विक्रेत्यांचे धाबे दणाणले

रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी अवैध दारु विक्री, वाहतूक व निर्मिती केली जाते. यावर अंकुश ठेवण्यासाठी रायगड पोलिसांनी २०२५ या वर्षात कंबर कसली आहे. अवैधरित्या दारु विक्री, वाहतूक व निर्मिती करणाऱ्यांविरोधात ६२५ कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये ८४ लाख ५५ हजार ५८५ रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या कारवाईतून अवैध दारु विक्रेत्यांना दणका देण्यात आला आहे.



> **रायगड पोलीस दलाच्या हद्दीतील अवैध धंद्याविरोधात कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली. या कारवाईच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दहा हजारांहून अधिक जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई केली असून, १४ जणांना तडीपार केले आहे. अन्य मंडळींविरोधात तडीपारची प्रक्रिया सुरु आहे.**
> **– आंचल दलाल, पोलीस अधीक्षक, रायगड**





## सरपंच ओझर्डेवर ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल

- **पोलिसांकडून तपास सुरू**

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील शिरगाव गावचे सरपंच तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हा समन्वयक सोमनाथ ओझर्डे यांच्यासह अन्य दोघांवर जातीवाचक शिवीगाळ व दमदाटी केल्याप्रकरणी शुक्रवार, २ जानेवारी रोजी महाड शहर पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रोहन किसन ढेंडवाल (वय ३८, रा. काकरतळे, महाड, जि. रायगड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १ जानेवारी २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास फिर्यादी व त्यांचे काही मित्र महाड बेकरी परिसरात गप्पा मारत उभे असताना सोमनाथ ओझर्डे तेथे आले. त्यांनी फिर्यादीकडे उद्देशून, “बघितलेस ना कशी जिरवली तुझ्या विकास गोगावलेची, होतो का जामीन आता बघ!” असे वक्तव्य केले. या वक्तव्यावर फिर्यादीने शब्द जपून वापरण्याची विनंती केली असता, फिर्यादी अनुसूचित जातीचा असल्याच्या कारणावरून ओझर्डे सह अन्य दोघांनी जातीवाचक शिवीगाळ करून दमदाटी केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात सोमनाथ दिगंबर ओझर्डे (रा. शिरगाव, महाड), अक्षय भोसले (रा. नवेनगर, महाड) व प्रतीक जगताप (रा. ताम्हाणे, महाड) यांच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास महाड शहर पोलीस ठाण्याच्या वतीने सुरू आहे.

## पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला सेवानिवृत्त

**मुंबई :** महाराष्ट्राच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला३७.५ वर्षांच्या प्रदीर्घ आणि यशस्वी कारकीर्दीनंतर शनिवारी सेवानिवृत्त झाल्या.



मुंबईतील नायगाव पोलीस मैदानावर आयोजित एका सोहळ्यात त्यांना निवृत्तीनिमित्त गार्ड ऑफ ऑनर देऊन मानवंदना देण्यात आली. १९८८च्या बॅचच्या आयपीएस अधिकारी असलेल्या शुक्ला यांनी आपल्या कार्यकाळात राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखल्याचे समाधान व्यक्त केले. रश्मी शुक्ला यांच्या निवृत्तीनंतर पान २ वर







### उपचारासाठी गर्भवतीची पायपीट | गडचिरोतील हृदयद्रावक घटना

## बाळासह मातेचा करुण अंत

। गडचिरोली । प्रतिनिधी ।

गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील दुर्गम भागात आरोग्य सुविधांच्या अभावामुळे एका नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलेसह तिच्या बाळाचा मृत्यू झाला. गावात प्रसूतिसुविधा नसल्याने महिलेला जवळच्या रुग्णालयाची सोय व्हावी म्हणून पतीसोबत जंगलमार्गे तब्बल ६ किलोमीटर पायपीट करावी लागली. मात्र, या कष्टाने तिची प्रकृती खालावली आणि प्रसूतीदरम्यान आधी बाळ आणि नंतर मातेचा मृत्यू झाला.



या घटनेने दुर्गम भागातील तोकड्या आरोग्य व्यवस्थेचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे.

मृत महिलेचे नाव आशा संतोष किरंगा (वय २४, राहणार आलदंडी टोला, ता. एटापल्ली) असे आहे. आलदंडी टोला हे गाव तालुका मुख्यालयापासून सुमारे ६ किलोमीटर अंतरावर असून, मुख्य रस्त्यापासून पूर्णपणे तुटलेले आहे. गावात प्रसूतीची कोणतीही सुविधा नसल्याने, प्रसववेदना सुरू झाल्यास तातडीने उपचार मिळावेत यासाठी १ जानेवारी रोजी आशा आपल्या पती संतोष यांच्यासोबत जंगलातील मार्गाने पायपीट करत तोडसा पान २ वर

#### प्रसूतीवेदना असह्य

गावात प्रसूतीची कोणतीही सुविधा नसल्याने, प्रसववेदना सुरू झाल्यास तातडीने उपचार मिळावेत यासाठी आशाने आपल्या पती संतोष यांच्यासोबत जंगलातील मार्गाने पायपीट केली. दिवसभर चालल्याने तिची प्रकृती बिघडली. डॉक्टरांनी सिझेरियन करण्याचा निर्णय घेतला, मात्र त्यावेळी बाळ पोटातच मृत झाले. या धक्क्यातून न सावरल्याने मातेनेही प्राण सोडले.

# रायगडात जानेवारीमध्ये मोफत कॅन्सर तपासणी

■ ३१ गावांमध्ये स्त्रीरोग तज्ज्ञांसह व्हॅन सेवा

■ जिल्ह्यात थळपासून, कोर्लई, पोयंजेपर्यंत मोहीम राबवणार



। रेवदंडा । प्रतिनिधी ।

कॅन्सरसारख्या घातक आजाराचा लवकर शोध लागून वेळेत उपचार मिळावेत, या उद्देशाने जिल्ह्यात दि. १ ते ३१ जानेवारी या कालावधीत विशेष कॅन्सर तपासणी मोहीम राबवली जाणार आहे. यासाठी उपसंचालक, आरोग्य सेवा ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅन्सर व्हॅन उपलब्ध करून दिली जाणार असून, जिल्ह्यातील नागरिकांनी या मोफत तपासणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन रायगड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी केले आहे.

३१ गावांमध्ये मोहिमेचा विस्तार ए.टी.पी. (अॅडव्हान्स्ड टेक्निकल प्लॅन) नुसार थळ, वाघोली, कोर्लई, तळा, दिघी, नेरूळ, पाभरे, कापडे, टोल, वरंध, निजामपूर, साई, धाटाव, रोहा, जांभूळपाडा, आरव, आमटेम, अंजप, कर्जत, वडवळ, होनाड, आजीवली, जासई, पोयंजे या ३१ गावांमध्ये ही मोहीम राबवली जाणार आहे. प्रत्येक गावात स्थानिक वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून तपासणी होईल.

तज्ज्ञांसह व्हॅनची सुविधा कॅन्सर व्हॅनसोबत एक स्त्रीरोगतज्ज्ञ, एक दंत शल्यचिकित्सक आणि एक सहाय्यक परिचारिका उपस्थित राहणार आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून गावागावी पोहोचून नागरिकांची कॅन्सर तपासणी केली जाईल. याशिवाय, जिल्ह्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांतील अधीपरिचारिका आणि सहाय्यक परिचारिकांचा या मोहिमेत समावेश करण्यात आला आहे.

**दररोज १५० तपासण्या**

जनजागृतीवर भरमोहिमेचे दैनंदिन उद्दिष्ट एका दिवसात किमान १५० नागरिकांची कॅन्सर तपासणी पूर्ण करणे असे निश्चित केले आहे. कॅन्सरसारख्या गंभीर आजाराबाबत जनजागृती वाढवणे, वेळेत तपासणी करून घेण्यास प्रोत्साहन देणे आणि विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. यामुळे लवकर निदान होऊन उपचार सुलभ होतील, असा विश्वास डॉ. निशिकांत पाटील यांनी व्यक्त केला. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना मोहिमेच्या तारखा व ठिकाणांची माहिती प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा जिल्हा आरोग्य विभागाकडून घेण्याचे आवाहन केले आहे. या मोहिमेच्या यशस्वीतेने जिल्ह्यातील कॅन्सर रुग्णसंख्येवर नियंत्रण मिळवता येईल, अस अपेक्षित आहे.

# नवनिर्वाचित नगरसेवकांचा सन्मान

■ कमळ पतसंस्थेचा स्तुत्य उपक्रम

। अलिबाग । प्रतिनिधी ।

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे आठ सभासद नुकत्याच पार पडलेल्या अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीत निवडून आले आहेत. याचे औचित्य साधत कमळ पतसंस्थेतर्फे श्रीबाग नं. ०२, म्हाडा कॉलनी येथील नाना-नानी पार्क येथे गुरुवार, दि. १ जानेवारी रोजी रघुजीराजे आंग्रे यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

आपल्या वेगळेपणासाठी सर्वश्रुत असलेल्या 'कमळ नागरी पतसंस्था' या पतसंस्थेने हा एक वेगळा उपक्रमकरिता अलिबाग शहरातील नागरिकांकडून वाहवा मिळवली. यावेळी अलिबाग नगरपरिषदेत १० प्रभागातून २० नगरसेवक निवडून आले. त्यापैकी आठ नगरसेवक हे कमळ पतसंस्थेचे सभासद असून, ते वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आहेत. पण, ते आपले ग्राहक सभासद आहेत, हाच धागा पकडून त्या सर्वांना सन्मानित करण्यात आले.

यामध्ये संस्थेचे सभासद व नवनिर्वाचित नगरसेवक संदीप जनार्दन पालकर, अंकित श्रीनिवास बंगेरा, समीर मधुकर ठाकूर, अश्विनी ऋषिकेश ठोसर, मानसी संतोष म्हात्रे, नीलम किशोर हजारे, अनिल रमेशचंद्र चोपडा, शैला शेषनाथ भगत, श्वेता संदीप पालकर यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात कमळ पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांच्या प्रास्ताविकाद्वारे करण्यात आली. दरम्यान, मानसी म्हात्रे, अंकित बंगेरा, संदीप पालकर, नीलम हजारे, अनिल चोपडा यांनी आपले मनोगत व्यक्त करताना कमळ पतसंस्थेने केलेल्या सन्मानाबद्दल आभार प्रदर्शित केले. या कार्यक्रमाच्या समारोप भाषणात रघुजीराजे आंग्रे यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांकडून शहरातील नागरिकांना चांगल्या सेवा सुविधा प्राप्त करुन द्याव्यात, त्यामध्ये वाहन पार्किंग सुविधा हा प्रश्न प्रामुख्याने सोडवावा, अशा सूचना केल्या.

नगरसेवकांना सन्मानित करताना त्यांना देण्यात आलेल्या सन्मानपत्राचे वाचन संस्थेचे वरिष्ठ अधिकारी देवेंद्र कारुळकर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे डेप्युटी जनरल मॅनेजर रंजन पाटील यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमास कमळ पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके, कमळ सेवा संस्थेचे अध्यक्ष राजेश प्रधान यांच्यासह दोन्ही संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी वर्गासह संस्थेचे सभासद उपस्थित होते.

# उरण शहर अंधाराच्या गर्तेत!

## पत्रकार संघाचा नगरपालिकेवर घणाघात

। उरण । प्रतिनिधी ।

उरण नगरपालिका हद्दीतील बहुतांश परिसर सध्या अक्षरशः अंधाराच्या साम्राज्यात सापडला असून, रस्त्यावरील पथदिवे बंद, निकामी आणि निष्क्रिय अवस्थेत आहेत. नागरिक जीव मुठीत धरून रस्त्यावर वावरत असताना नगरपालिकेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अनेक भागात पथदिवे पूर्णतः बंद असून, काही ठिकाणी बसविण्यात आलेले पथदिवे अत्यंत कमी दर्जाचे असल्याने त्यांचा उजेड अपुरा ठरत आहे. विशेष म्हणजे, हे पथदिवे अल्पावधीतच निकामी होत असल्याने खरेदी व बसविण्याच्या कामात मोठा आर्थिक घोटाळा झाल्याचा संशय जनमानसात व्यक्त होत आहे.

या गंभीर प्रश्नाबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत असून, यासंदर्भात वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध होऊनही प्रशासन ढिम्मच असल्याचे चित्र आहे. रात्रीच्या अंधारामुळे अपघात, चोरी, असामाजिक तत्त्वांचा वावर वाढण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून, नागरिकांच्या सुरक्षिततेशी सरळ सरळ खेळ सुरू असल्याचा आरोप होत आहे.

या पार्श्वभूमीवर उरण तालुका मराठी पत्रकार संघाने नगरपालिकेला थेट जाब विचारत नगराध्यक्षा भावना घाणेकर यांना निवेदन सादर केले. या निवेदनात संपूर्ण प्रकरणाची तात्काळ सखोल चौकशी करून दोषी ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी करण्यात आली.

तसेच उरण नगरपालिका हद्दीतील सर्व बंद पथदिवे तात्काळ दुरुस्त करून कार्यान्वित करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी 'आपण स्वतः जातीने लक्ष घालून शहरातील पथदिवे लवकरात लवकर सुरू करू' असे आश्वासन दिले. निवेदन देताना उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष घनश्याम कडू, उपाध्यक्ष विरेश मोडखरकर, दिलीप कडू, चिटणीस अजित पाटील यांच्यासह संघाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# मुख्य रस्त्याच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग-रेवदंडा या मुख्य रस्त्याची खड्ड्यांमुळे अक्षरशः चाळण झाली आहे. या मार्गावर एमएसआयडीकडून रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. सध्या या रस्त्याच्या दुतर्फा गटारांचे काँक्रिटीकरण सुरू आहे. रस्ता होईल तेव्हा होईल, परंतु, सध्या या मार्गावर पडलेले खड्डे तरी भरण्यात यावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांसह वाहनचालकांकडून करण्यात येत आहे. परंतु, संबंधित विभागाकडून याकडे सपशेल दुर्लक्ष करण्यात येत आहे. मात्र, याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. तरी, संबंधित विभागाने जबाबदारीने या समस्येकडे पाहावे, अशी मागणी सर्व स्तरातून करण्यात येत आहे.

# भूमी आमची, बलिदान आमचे, मग विमानतळावर हक्क कुणाचे?

। उरण । प्रतिनिधी ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अखेर कार्यान्वित झाला. उद्घाटनाचे सोहळे झाले, फिती कापल्या गेल्या, भाषणांचा पाऊस पडला आणि जागतिक दर्जाचा विकास अशा घोषणा सुरू आहेत. मात्र, या झगमगाटाच्या प्रकाशात एक गंभीर आणि अस्वस्थ करणारा प्रश्न आहे, तो म्जणे हा विकास नेमका कुणासाठी आहे?

ज्या भूमीवर हा भव्य विमानतळ उभा राहिला, ती भूमी कुणाची होती? ज्यांच्या जमिनी गेल्या, घरे उद्ध्वस्त झाली, पिढ्यान्‌पिढ्या शेती करणारा माणूस विस्थापित झाला त्या प्रकल्पग्रस्तांचा या विकासात वाटा काय? की त्यांच्या बलिदानावर फक्त कॉर्पोरेट नफा आणि राजकीय श्रेय उभारायचे?

रायगड जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांनी या विमानतळासाठी जे बलिदान दिले, त्याला तोड नाही. लोकनेते दि. बा. पाटील यांनी अखेरच्या श्वासापर्यंत या भूमीपुत्रांच्या हक्कासाठी संघर्ष केला. आज मात्र त्यांच्याच नावावर राजकारण होत असले तरी गेली ३-४ वर्षे केंद्रात आणि राज्यात सत्ता असूनही विमानतळाला अधिकृतपणे लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्याची हिंमत सरकार दाखवू शकलेले नाही. हा विलंब नाही, ही प्रकल्पग्रस्तांच्या भावनांशी केलेली थट्टा आहे.

नाव देण्यापेक्षा मोठा प्रश्न आहे, दि. बा. पाटलांचे विचार स्वीकारणार की फक्त त्यांचे नाव वापरणार? कारण दि. बा. पाटील म्हणजे केवळ नाव नव्हते; ते स्थानिकांचा पहिला हक्क हे तत्त्व होते. आज मात्र चित्र उलटे आहे. भूमी स्थानिकांची, सहनशीलता स्थानिकांची, विस्थापन स्थानिकांचे, पण नोकऱ्यांवर परप्रांतियांची मक्तेदारी! हा अन्याय नाही तर काय? उरण-पनवेल परिसरात एकामागोमाग एक प्रकल्प उभे राहात आहेत. विमानतळ, बंदरे, लॉजिस्टिक्स हब, औद्योगिक वसाहती विकासाचा महापूर दाखवला जात आहे. पण, या विकासात मराठी तरुण कुठे आहे? विमानतळावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये स्थानिक भूमीपुत्र शोधूनही सापडत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. मग प्रश्न उपस्थित होतो; हा विकास भूमीपुत्रांचा आहे की त्यांच्यावरचा प्रयोग? अदानी समूह मल्टीस्टेट एअरपोर्टची स्वप्ने दाखवत आहे. कोट्यवधींची उलाढाल होणार, अनेक राज्यांचे आर्थिक केंद्र इथे तयार होणार, असे दावे केले जात आहेत. पण, या स्वप्नांमध्ये प्रकल्पग्रस्तांचे स्थान कुठे आहे? या उलाढालीतून स्थानिकांना किती नोकऱ्या मिळणार, किती व्यवसाय उभे राहणार, किती तरुणांना प्रशिक्षण आणि कायमस्वरूपी रोजगार मिळणार याबाबत आज एकही ठोस धोरण जाहीर करण्यात आलेले नाही.

मराठी माणूस विकासाला विरोध करत नाही. त्याला प्रगती हवी आहे, पण ती न्यायाच्या पायावर उभी असलेली हवी आहे. जमीन देताना कोणी अट घातली नाही. देशासाठी, राज्यासाठी म्हणून प्रकल्प स्वीकारले. आता किमान हक्काच्या नोकऱ्या मागणे जर गुन्हा ठरत असेल, तर हा विकास स्वीकारायचा तरी कसा? आज जर प्रकल्पग्रस्त गप्प बसले, आवाज उठवला नाही, एकत्र आले नाहीत, तर इतिहास पुन्हा एकदा महाराष्ट्रावर अन्याय करेल. विमानतळ पूर्ण क्षमतेने चालेल, प्रवाशांची गर्दी वाढेल, कोट्यवधींचा नफा होईल; पण प्रकल्पग्रस्तांचे संसार मात्र कायमचे उध्वस्त राहतील. हा विमानतळ महाराष्ट्राच्या प्रगतीचे प्रतीक ठरावा, हीच अपेक्षा आहे. पण प्रकल्पग्रस्तांना न्याय नसेल, स्थानिकांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य नसेल, दि. बा. पाटलांचे विचार प्रत्यक्षात उतरवले जाणार नसतील तर हा विकास मान्य केला जाणार नाही.

# मच्छिमारांना न्यायालयाचा दिलासा

। उरण । प्रतिनिधी ।

तालुक्यातीलबायपासरस्त्याच्या विरोधातील आंदोलनप्रकरणी अटक करण्यात आलेल्या ३० पारंपरिक मच्छिमारांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या अंतिम सुनावणीत भविष्यात मच्छिमारांवर कोणतीही फौजदारी कारवाई करु नये, असे सक्त आदेश न्यायालयाने दिले. फेब्रुवारी २०२३ मध्ये सिडकोमार्फत पारंपरिक मच्छिमार क्षेत्रातून व कांदळवन तोड करुन बायपास रस्ता उभारण्याच्या प्रयत्नांना स्थानिक मच्छिमारांनी विरोध केला होता. मार्च २०२३ मधील आंदोलनानंतर दहा महिला व २० पुरुष अशा ३० मच्छिमारांना कलम ३५३ अंतर्गत अटक करुन १२ दिवस कारागृहात ठेवण्यात आले होते.

# विषमुक्त शेतीबाबत एकदिवसीय शिबिराचे आयोजन

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

संवेदना चॅरिटेबल संस्थेच्या वतीने ११ जानेवारी रोजी आगरी समाज हॉल, पनवेल येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत पद्मश्री कृषीऋषी डॉ. सुभाष पाळेकर गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली 'विषमुक्त अन्न, शेती, छतशेती व परसबाग' या विषयावर आधारित एकदिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबीर प्रत्येक घरात अन्नपूर्णेची भूमिका निभावणाऱ्या भगिनी, सामान्य नागरिक, शेतकरी, स्वयंसहायता बचत गट, आरोग्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था, तसेच कृषी व इतर संबंधित कार्यालयांतील प्रतिनिधींसाठी अत्यंत माफक देणगी मूल्यात आयोजित करण्यात आले आहे. डॉ. सुभाष पाळेकर गुरुजींचे या विषयांवरील सखोल ज्ञान व प्रत्यक्ष अनुभवातून सहभागींसाठी खूप काही शिकण्याची ही एक अनोखी संधी असून, हे शिबीर सर्वांसाठी अत्यंत समृद्ध व प्रेरणादायी ठरणार आहे.

या शिबिराचे आयोजन जरी संवेदना चॅरिटेबल संस्थेतर्फे करण्यात आले असले, तरी सुभाष पाळेकर कृषी जनआंदोलन, रायगड जिल्ह्यातील कार्यकर्ते देखील या उपक्रमात मोलाची भूमिका बजावत आहेत. निरोगी जीवनाची गुरुकिल्ली म्हणजे आपले आरोग्य. घरच्या घरी भाज्या व फळे पिकवून आपले आरोग्य कसे सुदृढ ठेवता येईल, याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन या शिबिरात मिळणार आहे.

# शाळकरी मुलांचा पायी प्रवास धोकादायक



। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

सावरोली-खारपाडा या मार्गावर रस्त्यालगत प्राथमिक तसेच माध्यमिक शाळा असून, काही शाळेचे अंतर एक ते दोन किमी असल्यामुळे शाळकरी मुले पायी चालत जाणे पसंद करीत असतात. मात्र, मागील काही महिन्यांपूर्वी या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढत असल्यामुळे पालकांच्या मनात आपल्या पाल्यांविषयी भीती निर्माण होत असून, मुलगा शाळेत पोहोचेपर्यंत ते घरी येईपर्यंत पालक भीतीच्या छायेखाली असल्याचे मत पालक व्यक्त करीत आहेत.

या मार्गावरून ग्रुप ग्रामपंचायत माजगाव हद्दीत राजिप शाळा माजगाव व कोएसो माध्यमिक शाळा असून, या परिसरातील मुले शिक्षण घेण्यासाठी या शाळेमध्ये पायी जात असतात. परिणामी, या रस्त्यावर अवजड वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असल्यामुळे अपघाताची समस्या गंभीर होत आहे. त्याचबरोबर या ठिकाणी वळणाचे रस्ते धोकादायक ठरत आहेत. याठिकाणी गतिरोधक त्याचबरोबर वाहनांची गती कमी करण्याचे फलक लावण्याची मागणी पालकवर्गातून होत आहे.

पान १ वरून

## माफियांना रायगड पोलिसांचा दणका

करण्यात आली. वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांतील प्रभारी अधिकाऱ्यांमार्फत कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली. त्यानुसार जुगार, मटका चालविणाऱ्यांसह गांजा चरस, केटामाईनसारखे अंमली पदार्थ विकणारे, बाळगणाऱ्यांविरोधात रायगड पोलिसांनी कारवाई केली. वर्षभरात १४० ठिकाणी वेगवेगळे छापे टाकण्यात आले. या कारवाईत ९३ कोटी ४५ लाख ७८ हजार ७७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एकूण १२३.७६८ किलो वजनाचा अंमली पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला. त्यात २३.८९० किलो ग्रॅम वजन असलेला एक कोटी १९ लाख ४५ हजार रुपयांचे चरस, ४४.४३१ किलो ग्रॅम वजन असलेला ११ लाख ३२ हजार ७७५ रुपयांचा चरस, ४.७६ किलो ग्रॅम वजन असलेला चार कोटी २२ लाख ७६ हजार रुपयांचे एम.डी. अंमली पदार्थ तसेच ५०.६८७ किलो ग्रॅम वजन असलेला ८८ कोटी ९२ लाख २५ हजार रुपये किमतीचा केटामाईनचा साठा जप्त करण्यात यश आले आहे. तसेच मटका जुगाराचा धंदा करणाऱ्यांवर छापे टाकून ५६ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. अंमली पदार्थांच्या २६, तर मटका जुगारच्या ११५ कारवाया झाल्याची माहिती रायगड पोलिसांनी दिली. या कारवाईनंतर जिल्ह्यात अंमली पदार्थांसह मटका जुगारासारख्या अवैध धंद्यांनी विळखा घातल्याचे दिसून येत आहे. रायगड पोलिसांनी कारवाई समाधानकारक असली, तरी जिल्ह्यातील अनेक भागात छुप्या पद्धतीने अवैध धंदे चालविले जात असल्याची तक्रारी आहेत. काही ठिकाणी मटका जुगारासारखे धंदे ऑनलाईन चालविले जात असल्याची माहिती समोर येत आहे.

गावगुंडांविरोधात कारवाई

सण, उत्सव व निवडणुकीच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या जिल्ह्यातील गावगुंडांविरोधात रायगड पोलिसांनी कारवाई केली आहे. मुंबई पोलीस अधिनियम कलम ५६ व ५७ अन्वये १४ जणांना तडीपार करण्यात आले असून, ११ जणांना तडीपार करण्याची हालचाल सुरु आहे. दहा हजार ५१९ जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांना दणका दिला आहे.

## दादांच्या सोबतीचा पश्चाताप

प्राध्यान्य देईल. पवार यांनी केलेले आरोप स्थानिक आमदारांनी का फेटाळले नाहीत, असे विचारले असता चव्हाण म्हणाले, उपमुख्यमंत्री पदावर असलेला एवढा मोठा माणूस आरोप करतो. त्यावेळी त्याच्याएवढी उंची असलेल्या कोणी तरी येऊन बोलावे, असे अपेक्षित असते. भाजप शिस्तीचा पक्ष आहे. कोणी आरोप केले, तर त्याचे उत्तर कोणी द्यावे, याचे काही ताळतंत्र, नियम आम्ही ठेवले आहेत. त्या नियमाप्रमाणे आम्ही वागतो. सिंचनामध्ये ७० हजार कोटींचा घोटाळ्याचा आरोप करणाऱ्यांमध्ये सत्तेत सहभागी आहे असे अजित पवार यापूर्वी कधी म्हटले नाहीत. आता सल्ला देणारी संस्था बदलली आहे. त्यामुळे या संस्थेला माहिती कमी असेल.

## बोर्ली ग्रा.पं.मध्ये निधीचा अपहार

असली, तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी कामे झालेलीच नसल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.प्रतिक कणगी यांनी ३ एप्रिल २०२५ रोजी माहिती अधिकार अर्ज दाखल करून विकासकामांची यादी, खर्च तपशील, बिले व प्रमाणपत्रांची मागणी केली होती. मात्र, कायद्यानुसार ३० दिवसांत माहिती देण्यात आली नाही. त्यामुळे ६ मे रोजी प्रथम अपील दाखल करण्यात आले. ३० मे रोजी पंचायत समिती मुरुड येथे झालेल्या सुनावणीत जनमाहिती अधिकाऱ्यांना ६ जूनपर्यंत माहिती देण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले. तरीही मिळालेली माहिती अपूर्ण, विसंगत आणि संशयास्पद होती. दरम्यान, माहिती अधिकारामधील विसंगती स्पष्ट झाल्यानंतर १६ ऑक्टोबर २०२५ रोजी पंचायत समिती मुरुड व जिल्हा परिषद रायगड यांच्याकडे निधी अपहाराची लेखी तक्रार दाखल करण्यात आली. या तक्रारीची गंभीर दखल घेत १ जानेवारी २०२६ रोजी चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. या घोटाळ्याप्रकरणी आता केंद्रीय पंचायत राज मंत्रालयाचे सचिव विवेक भारद्वाज, महाराष्ट्र ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डावले तसेच राज्यपाल देवव्रत आचार्य यांनी स्वतः हस्तक्षेप करावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. कामे न करता बिले काढणारे सरकारी अधिकारी, कर्मचारी व ठेकेदारांवर शासन फसवणुकीचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. हे प्रकरण ग्रामपातळीवरील प्रशासकीय भ्रष्टाचाराचा काळा चेहरा उघड करणारे असून, माहिती अधिकार कायदा किती प्रभावी शस्त्र आहे याचे ठळक उदाहरण ठरत आहे. दरम्यान, याबाबत सरपंच आणि ग्रामसेवक यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, तो होऊ शकला नाही.

**स्थळ पाहणीत धक्कादायक खुलासे**

चौकशीदरम्यान गणेश आळी येथे प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली. यावेळी कार्यकर्ते प्रतिक कणगी, पंचायत तपास अधिकारी राजेश वाडेकर, सामाजिक कार्यकर्ते राजेश तरे व ग्रामस्थ उपस्थित होते. या पाहणीत अनेक कामांची जीएसटी बिलेच नसणे, वर्क ऑर्डर व पूर्णत्व प्रमाणपत्रांचा अभाव, कागदोपत्री दाखवलेली व प्रत्यक्षातील कामे यांत मोठी तफावत आढळून आली.

**अंतिम अहवालाच्या प्रतीक्षेत ग्रामस्थ**

संपूर्ण चौकशी प्रक्रिया पूर्ण झाली असून, अंतिम अहवाल सादर होण्याच्या मार्गावर आहे. मात्र, दोषींवर कारवाई होईल की प्रकरण दडपले जाईल, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**माहितीचा अधिकार हा नागरिकांचा घटनात्मक हक्क आहे. ग्रामस्थांचा पैसा पारदर्शकपणे खर्च व्हायलाच हवा. चौकशी झाली, पण अंतिम अहवाल सार्वजनिक करून दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. असे प्रतीक कणगी यांनी सांगितले.**

## पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला सेवानिवृत्त

राज्याच्या पोलीस महासंचालकपदाची धुरा आता सदानंद दाते यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना रश्मी शुक्ला यांनी सर्वांचे आभार मानले. गेली दोन वर्षे महाराष्ट्र पोलिसांचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली, हा माझ्यासाठी मोठा बहुमान आहे. या काळात राज्यातील सण-उत्सव शांततेत पार पडले आणि निवडणुकाही विनाअडथळा पार पडल्या. विशेषतः गडचिरोली आणि गोंदियातील नक्षलग्रस्त भागांत झालेली सुधारणा आणि नक्षलवाद्यांच्या संख्येत झालेली घट, हे संपूर्ण पोलीस दलाचे यश आहे, असे त्या म्हणाल्या.

## बाळासह मातेचा करुण अंत

जवळील पेठा गावी आपल्या बहिणीच्या घरी गेली.

मात्र, नऊ महिन्यांच्या गर्भारपणात अवजड शरीराने दिवसभर चालल्याने तिची प्रकृती बिघडली. २ जानेवारी रोजी पहाटे २ वाजता तिला तीव्र प्रसववेदना सुरू झाल्या. पेठा गावातील आशा सेविकेने तातडीने हेडरी येथील लॉयड्स मेटल्सच्या कालीअम्माल रुग्णालयाशी संपर्क साधला. रुग्णवाहिकेतून तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी सिझेरियन शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला, मात्र त्यावेळी बाळ पोटातच मृत झाल्याचे आढळले. त्यानंतर आशाचा रक्तदाब प्रचंड वाढला आणि ती सावरली नाही. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, मात्र काही वेळातच तिचा मृत्यू झाला.

दरम्यान, उत्तरीय तपासणीसाठी बाळ व मातेचे शव हेडरी येथून एटापल्ली ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. मात्र, तेथे स्त्रीरोगतज्ज्ञ उपलब्ध नसल्याने पुढे ४० किलोमीटरवरील अहेरीला पाठवावे लागले. अहेरी येथील ग्रामीण रुग्णालयात २ जानेवारी रोजी दुपारी उत्तरीय तपासणीनंतर मृतदेह नातेवाईकांकडे स्वाधीन केले. माता व बाळाच्या मृत्यूने किरंगा कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

याप्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रताप शिंदे म्हणाले की, संबंधित गर्भवतीच्या आशासेविकांमार्फत गृहभेटी घेतल्याची नोंद आहे. ती पायी चालल्यामुळे तिला अचानक प्रसववेदना झाल्या, डॉक्टरांनी सर्वतोपरी प्रयत्न केले, पण यश आले नाही. या घटनेचा तालुका आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत अहवाल मागवला आहे.

## मराठी साहित्य संमेलनाला गालबोट

कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला काळे फासले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे सर्वचजण स्तब्ध झाले. स्वतः कुलकर्णी यांनाही काही क्षण काय झाले हे समजले नाही. संदीप जाधव यांनी हा हल्ला का केला? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण, ते रिपाइंचे कार्यकर्ते असल्याचे सांगितले जात आहे.

या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यात गळ्यात निळा रुमाल असलेले संदीप जाधव जय जवान, जय किसानच्या घोषणा देत विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला काळे फासताना दिसत आहेत. काळे फासल्यानंतर हल्लेखोर व्यक्ती राष्ट्रगीत म्हणतानाही व्हिडिओत दिसत आहे. ही घटना व्यासपीठावर जाणाऱ्या पायऱ्यांजवळ घडली. शाहूपुरी पोलिसांनी आंदोलनकर्त्याला ताब्यात घेतले आहे.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय**
**जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला. काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ०३२**

क्र.अपिल/डेस्क/आरटीएस/रिव्ही/८५८/२०२५ दिनांक :- २८/१२/२०२५

**जाहिर नोटीस**

प्रती,
राजेंद्र रामचंद्र पाटील
स्व. अनुसया दत्तात्रय पाटील यांचे कायदेशीर वारस -... अर्जदार
रा. जे / ६०२. सुमेर नगर. एस. व्ही. रोड,
बोरीवली (पश्चिम), मुंबई-४०००९२ विरुद्ध
१. श्री. संतोष दत्तात्रय पाटील
रा. ४३/४०८, सी वर्सोवा, मनीष सीएचएसएल,
मनीष नगर, चार बंगला. अंधेरी (प), मुंबई-४०२२०१
२. सौ. दर्शना दत्तात्रय पाटील
कै. सागर दत्तात्रय पाटील (मृत)
रा. गणेश गल्ली. कुरुळ, अलिबाग, रायगड, पि-४०२२०१
३. श्री. विलास रघुनाथ प्रधान
रा. कुरुळ, अलिबाग, रायगड, पि-४०२२०१
४. श्री. सचिन विलास प्रधान
रा. कुरुळ, अलिबाग, रायगड, पि-४०२२०१
५. श्री. वसंत रामभाऊ म्हात्रे
रा. कुरुळ, अलिबाग, रायगड, पि-४०२२०१
६. श्री. प्रमोद मधुकर भाडोचकार
रा. कुरुळ, अलिबाग, रायगड, पि- ४०२२०१
७. श्री. आर्य अशोक दुधे
रा. फ्लॅट क्र. ७०४, इमारत क्र. ५६, प्लॉट क्र. ५४,५६,५८,
पाम बीच, नेरुळ सेक्टर- ३, नवी मुंबई- ४००७०६ ......सामनेवाले

**विषय:-** अपर जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील आदेश प्रा. नोंद अपिल नं.२५१/२०२४ दि.०९/०६/२०२५ चे विरुद्ध पुनरिक्षण अर्ज

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील पुनरिक्षण अर्जाची सुनावणी मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय. १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक २०.०१.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीला मार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहून म्हणणे न मांडल्यास पुनरिक्षण अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
**नायब तहसिलदार (अपिले)**
**कोकण विभाग**

# सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**शिक्षणाच्या शिल्पकार सावित्रीबाई फुले यांची जयंती शनिवारी (दि.३) संपूर्ण जिल्ह्यात साजरी करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच, सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा जागर करण्यात आला. त्यांच्या जयंतीनिमित्त शाळा व महाविद्यालयांत विविध कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले होते.**

## ग्रंथालयाच्यावतीने जयंती साजरी

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

शिक्षणाच्या शिल्पकार सावित्रीबाई फुले यांची जयंती अलिबागमध्ये ठिकठिकाणी साजरी करण्यात आली. यावेळी अलिबागमधील सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालयाच्यावतीने सभागृहात शनिवारी (दि.३) जयंती साजरी करण्यात आली. ग्रंथालयाचे ज्येष्ठ संचालक नागेश कुळकर्णी यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी वाचनालयाच्या ग्रंथपाल रजिता माळवी, वाचनालयातील कर्मचारी अर्पूव वर्तक, अर्चना माळवी, मिलिंद सुळे व वाचक वर्ग उपस्थित होते. यावेळी नागेश कुळकर्णी यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची आज जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करून मी त्यांना अभिवादन करतो. सावित्रीबाई फुले यांनी त्या काळात स्त्री शिक्षणाला होत असलेला विरोध झुगारून स्वतः शिक्षण घेतले. शाळेत शिक्षिका म्हणून नोकरी करून त्या मुख्याध्यापिका झाल्या. मुलींना शिक्षणाचा अधिकार मिळवून देण्यासाठी पुण्यात भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. त्यामुळे ३ जानेवारी हा दिवस बालिका दिन म्हणून साजरा करण्यात येतो. सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणाचे अमुल्य योगदान हा देश कधीही विसरू शकणार नाही, असे नागेश कुळकर्णी म्हणाले.

## नागोठणे विद्यामंदिरात जयंती उत्साहात



**| नागोठणे | प्रतिनिधी |**

स्त्री शिक्षणासाठी झटणाऱ्या आणि समाजसुधारण्यासाठी ज्यांनी अतिशय महत्त्वपूर्ण योगदान दिले, अशा क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती कोएसोच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील अग्रवाल विद्यामंदिर व एस.पी. जैन ज्युनिअर कॉलेजमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अग्रवाल हायस्कूलमध्ये त्यांच्या प्रतिमेला शाळेचे मुख्याध्यापक डी. एम. पवार यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्त महामार्ग वाहतूक शाखेच्या सपोनी गीतांजली जगताप, महिला दक्षता समितीच्या सदस्या सुजाता जवके, शिक्षिका सविता गोळे, मेघना म्हात्रे, अमिता पाटील, कल्याणी पवार, प्रीती दरेकर, मानसी शेलार, आराधना सुतार, खांडेकर, शिक्षक आबेसिंग गावित आदींसह इतर शिक्षिका व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांकडून एकांकिकेचे सादरीकरण

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव येथील राजिप विकास कॉलनी शाळेत शनिवारी (दि.३) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी उतेखाल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे उपस्थित होते. यावेळी इ. १ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आपले मनोगत व्यक्त केले. तसेच, इ. ४ थीमधील विद्यार्थीनी स्वरा मसुरे हिने 'मी सावित्री बोलते' ही एकांकिका सादर केली. केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाईंच्या जीवनावर मार्गदर्शन केले व त्यांचा आदर्श सर्वांनी आचरणात आणावा, या विषयी मार्गदर्शन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका पूर्वा येलवे व उपशिक्षिका निलम गायकवाड यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले होते.



## बालविवाहमुक्त महाराष्ट्र संकल्प

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यातील नवघर शाळेत बालिका दिनानिमित्त 'लेक शिकवा अभियान' प्रारंभ आणि 'बालविवाहमुक्त महाराष्ट्र संकल्प' कार्यक्रमांतर्गत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात 'बालपण वाचवा, बालविवाह घालवा', 'मुलगी शिकली, प्रगती झाली' अशा घोषणा दिल्या गेल्या. तसेच, बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा घेतली गेली. त्याचबरोबर शाळेतील विद्यार्थीनींनी सावित्रीबाई फुले यांच्या वेषात सज्ज होऊन आपले मनोगत, गाणी, चारोळ्या सादर केल्या. तर, मुले महात्मा जोतिराव फुले यांच्या वेषात येऊन त्यांचे विचार मांडले. सखी सावित्री समितीच्या सदस्या, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, शाळेतील सर्व महिला शिक्षिका यांनी आपले मार्गदर्शन केले. यावेळी सर्वांनी सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करून 'लेक शिकवा' अभियानाचा शुभारंभ केला.



## सावित्री मातेविषयी मनोगत व्यक्त

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगावातील पीएमश्री उतेखोलवाडी शाळेत शनिवारी (दि.३) सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी मुलांनी वेशभूषेत उपस्थित राहून सावित्री मातेविषशी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी उपस्थित राहून मुलांना मार्गदर्शन केले.



## 'सावित्रीबाई फुले यांचे कार्य जोपासा'



**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूडमधील वसंतराव नाईक महाविद्यालयात समाजासुधारक सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. जनार्दन कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त करुन समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांचे कार्य जोपासा. आज मुली शिक्षण घेत आहेत, हे श्रेय समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांना आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी डॉ. श्रीशैल बहिरगुडे, डॉ. सुभाष म्हात्रे, डॉ. गजानन मुनेश्वर, डॉ. सीमा नाहिद, डॉ. नारायण बागुल प्राध्यापक चिंतन पोतदार, प्रणव बागवे, प्रा.मुस्कान रजब, गणेश लाढ, हरी हवालदार, अस्मिता सादळुकर, अनघा विरकुड, रफी हसवारे आदिंसह प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

## माथेरान नगरसेविकांकडून पूजन



**| माथेरान | प्रतिनिधी |**

माथेरान शहरात स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. नगरपरिषद शिक्षण मंडळाच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

माथेरान नगरपरिषद कार्यालयात महिला नगरसेविका यांनी एकत्र येत स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर या सर्व महिला नगरसेविका यांनी नगरपरिषद शिक्षण मंडळाच्या हुतात्मा वीर भाई कोतवाल प्राथमिक शाळेत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. तेथे प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन जेष्ठ नगरसेविका प्रतिभा घावरे आणि प्रियांका कदम यांच्या हस्ते झाले. त्यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ढेबे यांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या बद्दल माहिती देणारे भाषण केले. त्यानंतर शाळा व्यवस्थापन समितीच्यावतीने माथेरान नगरपरिषदेवर निवडून आलेल्या नगरसेविका प्रतिभा घावरे, प्रियांका कदम, लता ढेबे, माधुरी चौधरी, रिजवाना शेख, कमल गायकवाड, सुरेखा साळुंखे, अर्चना भिलारे, ऐश्वर्या तोरणे आदींचा सन्मान करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला अभिवादन केले.

## वेदक कॉलेजमध्ये जयंती संपन्न



**| तळे | प्रतिनिधी |**

गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठानचे जी.एम.वेदक कॉलेज तळा येथे सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती शनिवारी (दि.३) साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुलेंच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

त्यानंतर सर्व मान्यवरांचे स्वागत सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. अमोल निकम आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एन.एम. शेख यांनी केले. तसेच, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित माहितीपटाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे आणि महाविद्यालय विकास समितीचे ज्येष्ठ सदस्य पुरुषोत्तम मुळे उपस्थित होते.

## उरण महाविद्यालयात प्रतिमा पूजन

**| उरण | प्रतिनिधी |**

कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयातील महिला विकास कक्षातर्फे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती प्रतिमा पूजन करून साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. गर्जे यांनी सावित्रीबाई फुले यांचे विचार प्रत्यक्षात आचरणात कसे आणावेत याविषयी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर भूगोल विभाग प्रमुख डॉ. आनंद गायकवाड यांनी देखील सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याचा आढावा घेतला. तसेच, डॉ. पराग कारूलकर यांनी सावित्रीबाई फुले यांनी विद्यार्थिनींसाठी दिलेल्या संदेशाबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.पी.आर. कारूलकर यांनी तर आभार डॉ. कांबळे यांनी मानले.

# पालिकेच्या परिपत्रकाला केराची टोपली

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिकेतील बहुतांश अभियंते व कर्मचारी निवडणूक कर्तव्यावर तैनात आहेत. या कालावधीत कामांच्या दर्जावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य नसल्याने, शहर अभियंता विभागाने अधिकृत परिपत्रक काढून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सर्व स्थापत्य व विकासकामांना स्थगिती देण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. मात्र, हे आदेश धाब्यावर बसवत शहरात ठिकठिकाणी ठेकेदारांकडून कामे सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे प्रशासनाच्या आदेशांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत आहे की नाही, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, महापालिका आयुक्तांच्या निवासस्थानासमोर देखील विकासकामे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. हा प्रकार केवळ नियमभंगापुरता मर्यादित नसून, तो प्रशासकीय यंत्रणेसमोर उभे ठाकलेले ठेकेदारांचे धाडस दर्शवत आहे. आचारसंहिता लागू असताना मतदारांवर परिणाम होईल अशा कोणत्याही कामास मनाई असताना, ही कामे कोणाच्या परवानगीने किंवा आशीर्वादाने सुरू आहेत? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होत आहे. पालिकेच्या कामाबाबत आणखी गंभीर बाब म्हणजे, दर्जाहीन कामांबाबत तक्रार करणाऱ्या जागरूक नागरिकांना व सामाजिक संघटनांना धमकावले जात असल्याचे आरोप पुढे येत आहेत. व्हिडिओ पुरावे सादर करणाऱ्या तक्रारदारांवर ब्लॅकमेलिंग, खंडणीचे खोटे आरोप किंवा गुन्हे दाखल करण्याची भीती घालून दबाव आणण्याचे प्रयत्न होत असल्याचे सांगण्यात येत आहे. हा प्रकार लोकशाही व्यवस्थेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आघात करणारा असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

पालिकेच्या अभियंत्याने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली तर नवी मुंबई सजग नागरी सदस्यांना प्रत्यक्ष कामाला भेटी देत हस्तक्षेप करण्याची गरजच होणार नाही. ही बाब पालिका प्रशासनाने व ठेकेदारांनी लक्षात घ्यायला हवी, असे नवी मुंबई सजग नागरी मंचाने स्पष्ट केले आहे.

# हुतात्मा गौरव पुरस्काराचे वितरण

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात देशाच्या स्वातंत्र्याच्या लढा उभा राहिला आणि त्यात दोन क्रांतिकारकांना हौतात्म्य प्राप्त झाले. या इतिहासाने केवळ कर्जत तालुक्याचे नाही तर रायगड जिल्ह्याचे नाव सुवर्ण अक्षरांनी लिहिले आहे, असे गौरोवोद्गार खासदार सुनील तटकरे यांनी काढले आहेत. तसेच, त्यांच्या हस्ते संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या लढ्यातील हुतात्मांच्या शिल्पाचे लोकार्पण करण्यात आले. तसेच, पाणवठा



संस्था आणि लेखक गिरीश कंटे यांना हुतात्मा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात आपल्या बलिदानाने अजरामर ठसा उमटविला आहे. हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील या भारतमातेच्या दोन सुपुत्रांना अभिवादन करण्यासाठी नेरळ येथील हुतात्मा चौकात सिद्धगड बलिदान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार सुनील तटकरे यांच्यासह पुंडलिक पाटील, अशोक भोपतराव, एकनाथ धुळे, भगवान चंचे, डॉ. कुशाग्र पटेल, दीपक श्रीखंडे, अ‍ॅड. रंजना धुळे, शेखर भडसावळे, शरद भगत, कुमार जाधव, अर्जुन शिंदे, नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल वरोटे, सुजित धनगर, अरुण कार्ले आदी प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान, हुतात्म्यांच्या अर्ध पुतळ्याला खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन केले. त्यानंतर रायगड जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीमधून बांधण्यात आलेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे लढ्याचे शिल्पाचे लोकार्पण खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते झाले.सुरुवातीला हुतात्मा स्मारक समिती अध्यक्ष संतोष पेरणे यांनी प्रास्ताविक केले.

**कॅलेंडरसाठी बारा छायाचित्रांची निवड | प्रदीप नाईक यांची कौतुकाची थाप**

# 'इमेज'मधून पर्यटन स्थळांची ओळख

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

कोणत्याही उपक्रमाची सुरुवात करणे सोपे आहे, मात्र त्याचे सातत्य राखणे कठीण आहे. इमेज कॅलेंडरने आठ वर्षात पदार्पण केले आहे. या कॅलेंडरची निर्मिती, मेहनत फार महत्वाची आहे. रमेश कांबळे, जितेंद्र शिगवण आणि समिर मालोदे या तिघांनी कॅलेंडरच्या माध्यमातून जिल्ह्यातील पर्यटन स्थळांसह संस्कृतीची माहिती, ओळख छायाचित्राद्वारे पोहचविण्याचे काम केले आहे. पर्यटन स्थळांसह सण उत्सवाची माहिती चित्रांद्वारे कॅलेंडरच्या रुपात पहावयास मिळत असल्याचे गौरवोद्गार अलिबाग लायन्स क्लबचे अध्यक्ष तथा शेकाप कामगार आघाडीचे प्रमुख प्रदिप नाईक यांनी काढले.

अलिबागमधील अलिबाग प्रेस असोसिएशनच्या सभागृहात शनिवारी (दि.३) इमेज कॅलेंडरच्या प्रकाशन सत्कार सोहळ्याप्रसंगी ते






बोलत होते. यावेळी अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक प्रशांत नाईक, सहयोग नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन योगेश मगर, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनावडेकर, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, ईमेज कॅलेंडरचे प्रमूख रमेश कांबळे, जितेंद्र शिगवण, समीर मालोदे आदींसह पत्रकार, छायाचित्रकार, सत्कार मुर्ती व नागरिक उपस्थित होते.

यावेळी प्रदिप नाईक म्हणाले की, रमेश कांबळे, जितेंद्र शिगवण आणि समीर मालोदे या तीन छायाचित्रकारांनी एकत्र येऊन इमेज कॅलेंडरची संकल्पना प्रत्यक्षात उतरवली. रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळांसह येथील सण उत्सवाची ओळख कॅलेंडरच्या माध्यमातून घराघरात पोहचावी यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. छायाचित्रकारांसह ज्यांना चित्र काढण्याचे छंद आहेत, अशा सर्वसामान्यांना देखील यामध्ये स्थान देण्याचे काम केले आहे. एखादा उपक्रम सुरु होतो, परंतु तो फार काळ टिकत नाही. मात्र, पत्रकारिता क्षेत्रातील अलिबागमधील तीन छायाचित्रकारांनी ईमेज कॅलेंडर निर्मितीचे सातत्य राखण्याचे खऱ्या अर्थाने काम केले आहे. आता ईमेज कॅलेंडरला आठ वर्षे झाली आहेत. या तिघांच्या परिश्रमामुळे शक्य झाले आहे. ईमेज कॅलेंडरसाठी बारा छायाचित्रांची निवड केली आहे. या कॅलेंडरमध्ये असलेल्या प्रत्येक छायाचित्रांमध्ये एक अर्थ आहे. एक वेगळी ओळख आहे. ती ओळख दाखविण्याचे काम करण्यात आले आहे, असे प्रदिप नाईक यांनी सांगितले. यावेळी योगेश मगर, मंदार वर्तक यांनीदेखील मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समीर मालोदे यांनी तर सुत्रसंचलन सुयोग आंग्रे यांनी केले.

### बारा छायाचित्रकारांचा सन्मान

इमेज कॅलेंडरसाठी गडकिल्ले, पर्यटनस्थळे इत्यादी छायाचित्रांची स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत ४७८ जणांनी सहभाग घेतले होते. ज्येष्ठ छायाचित्रकार जयंत धुळप यांनी परीक्षण केले. या छायाचित्रांमधून महाडमधील दीक्षित कांबळे, श्रीबागमधील वैभव शिंदे, अलिबागमधील महेंद्र महाडिक, थळमधील शुभम सुंकले, अलिबागमधील डॉ. गणेश गवळी, गोंधळपाडाधील निलेश दुदम, मुरूडमधील भारत रांजणकर, मिळकतखारमधील सनीश म्हात्रे, पेणमधील जयंत ठाकूर, महाडमधील कल्पेश पाटील, उसर येथील मोनिका औचटकर, अलिबागमधील सुनील ठोकळ यांनी काढलेल्या छायाचित्रांची निवड करण्यात आली. हे छायाचित्र इमेज कॅलेंडरमध्ये प्रसिद्ध करण्यात आले. माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक प्रशांत नाईक यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते या बारा छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात आला.

## शेतकऱ्यांसाठी चारा उत्पादनाचे प्रात्यक्षिक



**| खांब | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यात पशुपालकांसाठी पौष्टिक चाऱ्याचा नवा पर्याय म्हणून सुरभी सीएसआर प्रकल्पाअंतर्गत अझोला चारा उत्पादनाचे प्रात्यक्षिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. तालुक्यातील पशूपालक शेतकऱ्यांच्या पशूधन आरोग्य व उत्पन्नवाढीच्या दृष्टीने दीपक फाऊंडेशन व दीपक नायट्रेट लि. यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'सुरभी' या सीएसआर प्रकल्पाअंतर्गत आणखी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाअंतर्गत सुमारे ८० पशुपालक शेतकऱ्यांसाठी अझोला चारा उत्पादनाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्यांना शाश्वत पशुपालनासाठी नवे तंत्रज्ञान व चारा व्यवस्थापनाचे पर्याय उपलब्ध होणार असून, पशुधन व शेतकरी दोघांचेही आरोग्य आणि कल्याण सुनिश्चित होण्यास हातभार लागणार असल्याचे दीपक फाऊंडेशनचे अनिकेत निकम यांनी सांगितले.

# निवडक

## म्हसळ्यात पोलीस रायझिंग डे संपन्न



**म्हसळा :** म्हसळ्यातील न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ विद्यालयात शनिवारी (दि.३) पोलीस रायझिंग डे साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म्हसळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे यांनी आपल्या मनोगतात महाराष्ट्र पोलीस दल स्थापना दिवसाचे महत्त्व व माहिती करून दिली. त्याचबरोबर पोलीस खात्यातील विविध पदांची माहिती देऊन ब्रीदवाक्याचा अर्थ सांगितला. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी माहिती आणि विविध शस्त्र, पिस्तूल, कार्बाइन, ॲक्शन पंप मशीन अशा विविध बंदुकींची ओळख करून दिली. तसेच, मंचावर विविध प्रकारच्या बंदूक ठेऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली. यावेळी म्हसळ्याचे हवालदार दिलीप राठोड, पोलीस कॉन्स्टेबल अक्षय पुरी, महिला पोलिस कॉन्स्टेबल सोनवणे, पर्यवेक्षक जे.के. मांजरेकर, ज्येष्ठ शिक्षक ई.सी. पाटील, गर्जे, मोरे, शिर्के, पाटील, आमले, सहारे, वसावे व विद्यार्थी उपस्थित होते.

## अजीवलीत अखंड हरिनाम सप्ताह



**चिरनेर :** पनवेल-अजीवली हायस्कुलच्या मैदानात दि.१८ ते २५ डिसेंबर या कालावधीत संत ज्ञानेश्वर माऊली सेवा मंडळाच्यावतीने कंठ भूषण शांती ब्रम्हा एकनाथ कोष्टी यांच्या व्यासपीठ नेतृत्वाखाली ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न झाला. या सप्ताहाच्या दिवसांत सकाळी ४ ते ६ काकड आरती, सकाळी ८ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, संध्याकाळी ४ ते ६ व्याख्यान, संध्याकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्रौ ९ ते ११ हरि कीर्तन असे दैनंदिन कार्यक्रम पार पडले. या दिवसांत उद्धव चोले, संजय वेळूकर, विशाल खोले, स्वामी राजेश्वरानंद सरस्वती शास्त्री, निवृत्ती देशमुख, गणेश भगत, सुदाम पानेगावकर यांच्या सुश्राव्य कीर्तनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. दिंडी सोहळा व दीपोस्तव तसेच सांगता जयवंत बोधले यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.

## मोफत शालेय साहित्य वाटप




**महाड :** गावागावातील मूलं-मुली शिक्षणापासून दूर राहू नये, त्यांना कोणत्याही साहित्याची कमी पडू नये, यासाठी आपल्याकडून जे जे लागेल ते सहकार्य केले जाईल. विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासह उत्पादक क्षेत्राकडे वळावे, असे मत नवनिर्वाचित नगरसेविका अक्षया हेलेकर यांनी बाल मित्र मंडळ, महिला मंडळ व पेठचा राजा तर्फे कोझर येथील जिजामाता माध्यमिक शाळेतील साहित्य वाटप प्रसंगी व्यक्त केले. महाडमधील बाल मित्र मंडळ व महिला मंडळ पेठेचा राजा तर्फे शालेय साहित्याचे वाटप शुक्रवारी (दि.२) कोझर येथील रायगड शिक्षण प्रसारक मंडळाच्या जिजामाता माध्यमिक शाळेत आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष सुयोग पोरे, महिला अध्यक्ष तथा नगरसेविका अक्षया हेलेकर, मंडळाचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक वृंद व कर्मचारी उपस्थित होते.

## लेखन स्पर्धेत राजेंद्र अंबिके द्वितीय



**पाली/बेणसे :** महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागामार्फत व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यावतीने विभागस्तरीय प्रवास वर्णन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात राजेंद्र अंबिके यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर व रायगड या पाच जिल्ह्यांतील स्पर्धकांमधून त्यांनी द्वितीय क्रमांक पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. शिक्षणातील गुणवत्ता संवर्धन तसेच शिक्षकांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून एक महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. शिक्षकांना २१व्या शतकातील आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करण्यासाठी तसेच शैक्षणिक व प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने या स्पर्धा तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर घेण्यात आल्या. या उपक्रमांतर्गत आयोजित 'प्रवास वर्णन लेखन' या विभागस्तरीय स्पर्धेत राजेंद्र अंबिके यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. राज्यस्तरीय स्पर्धेत मुंबई विभागाचे नेतृत्व करण्याची संधी त्यांना प्राप्त झाली.

## सिद्धगड येथे हुतात्मांना मानवंदना



**नागोठणे :** हुतात्मा विर भाई कोतवाल व हुतात्मा हिराजी पाटील यांच्या बलिदान दिनानिमित्त समाजबंधव व महाराष्ट्र शासनाच्यावतीने मुरबाड येथील सिद्धगडावर त्यांना मानवंदना दिली जाते. यंदा ८३ व्या बलिदान दिनानिमित्त नागोठणे नाभिक समाजाच्यावतीने सिद्धगड येथे विरभाई कोतवाल व हिराजी पाटील यांच्या स्मारकाला मानवंदना देण्यात आली. सिद्धगड येथे शासकीय मानवंदना कार्यक्रमापूर्वी देशभक्तीपर गीत व आझाद दस्ताची सुंदर नाटिका सादर करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीतानंतर मान्यवरांकडून स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान व विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम संपन्न झाला. दरम्यान, मानवंदना कार्यक्रमापूर्वी नागोठणे नाभिक समाजाच्या समाज बांधवांकडून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला वंदन करण्यात आले.

# वारळ ग्रामपंचायतीचा अनागोंदी कारभार

## ● गटविकास अधिकाऱ्यांकडून दखल; अविश्वास ठरावावर विशेष सभा

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यातील वारळ ग्रामपंचायतीचा कारभार पूर्णतः अनागोंदीचा झाल्याचा आरोप ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्यांकडून करण्यात आला आहे. या संदर्भात स्थानिकांनी जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त (कोकण), जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, श्रीवर्धन उपविभागीय अधिकारी, म्हसळा तहसीलदार व गटविकास अधिकारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींना तक्रारीवजा निवेदन सादर केले आहे. या तक्रारींची दखल घेत म्हसळ्याचे गटविकास अधिकारी यांनी विभागीय आयुक्तांकडे अहवाल सादर केला आहे. त्या अहवालाच्या आधारे म्हसळा तहसीलदारांनी वारळ ग्रामपंचायतीतील सरपंच व उपसरपंच यांच्या विरोधात अविश्वास ठरावावर गुरूवारी (दि.७) सकाळी विशेष सभा आयोजित करण्याचे आदेश दिले आहेत.

सरपंच कविता पेरवी व उपसरपंच किरण चाळके यांच्या विरोधात ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेणे, ग्रामस्थांना उलटसुलट उत्तरे देणे, विकासकामांकडे दुर्लक्ष करणे, ग्रामपंचायत कारभारात पतीचा थेट हस्तक्षेप, पोलीस कारवाईच्या धमक्या देणे, कर्मचाऱ्यांवर दबाव आणणे तसेच कोणतीही चूक नसताना कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करणे, अशा गंभीर तक्रारी करण्यात आल्या आहेत. याशिवाय गावातील खारलँड संदर्भात शासनाकडे दुरुस्ती प्रस्ताव न सादर करणे, मासिक सभा व ग्रामसभांमध्ये गंभीर त्रुटी, तसेच आर्थिक हिशोबात अनियमितता असल्याचेही तक्रारींमध्ये नमूद करण्यात आले आहे. या सर्व बाबींमुळे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ३९ अंतर्गत सरपंच व उपसरपंच यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी देखील मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात मधुसूदन पाटील, नरेश पाटील, चंद्रकांत पाटील, संजय माळी, वैभव चाळके, सुनीत सावंत, जगन्नाथ पाटील, नवाज काजी व मिना पाटील आदी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त (कोकण), जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, श्रीवर्धन उपविभागीय अधिकारी, म्हसळा तहसीलदार व गटविकास अधिकारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींना तक्रारीवजा निवेदन सादर केले आहे. या तक्रारींची दखल घेत म्हसळ्याचे गटविकास अधिकारी यांनी चौकशी करून दफ्तरी कागदपत्रांची छाननी करत विभागीय आयुक्तांकडे अहवाल सादर केला आहे. या अहवालाच्या आधारे म्हसळा तहसीलदारांनी वारळ ग्रामपंचायतीतील सरपंच व उपसरपंच यांच्या विरोधात अविश्वास ठरावावर विशेष सभा आयोजित करण्याचे आदेश दिले आहेत. ही विशेष सभा गुरुवारी (दि.८) सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. दरम्यान, नोव्हेंबर २०२३ पासून आजपर्यंत वारळ ग्रामपंचायतीत तब्बल पाच ग्रामसेवकांनी कार्यभार सांभाळल्याची माहिती गटविकास अधिकारी यांनी दिल्याचे बोलले जात आहे. या सततच्या बदलांमुळेही ग्रामपंचायतीच्या कारभारावर विपरीत परिणाम झाल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे.

## गुगलवर नंबर शोधणे महागात

**पनवेल :** घरातील फ्रीज दुरुस्त करण्यासाठी दि.२० डिसेंबर रोजी गुगलवर कंपनीचा कस्टमर केअर नंबरशोधणेएका५९वर्षीयमहिलेला चांगलेच महागात पडले आहे. या महिलेने गुगलद्वारे मिळालेल्या ज्या कस्टमर केअरच्या नंबरवर संपर्क साधला, त्या बनावट कस्टमर केअर प्रतिनिधीने पाठवलेल्या लिंकवर क्लिक केल्यामुळे या महिलेचा मोबाईल फोन हॅक होऊन तिच्या तीन बँक खात्यांतून तब्बल ११ लाख ५ हजार रुपये परस्पर लंपास करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे. सुधा नायर असे या महिलेचे नाव असून त्या नवीन पनवेल येथे वास्तव्यास आहेत.

## निबंध स्पर्धा बक्षीस समारंभ



**कोर्लई :** रायगडच्या युवक फाऊंडेशनने तालुका स्तरीय निबंध स्पर्धेचे शुक्रवारी (दि.२) आदर्श पतसंस्थेच्या सभागृहात आयोजन केले होते. या स्पर्धेत ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी पहिल्या गटात प्रथम प्रभा पाटील, दुसऱ्या गटात प्रथम श्रावणी थळे, द्वितीय ऋग्वेद बेलोसकर, तृतीय श्लोक नागे, तिसऱ्या गटात प्रथम समृद्धी जगे, द्वितीय आराध्या भोईटे व तृतीय क्रमांक कनिष मगर यांनी पटकावला असून त्यांना रोख बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आली. यावेळी चंद्रकांत पाटील, डॉ.रसिका पाटील, डॉ. जयपाल पाटील, तपस्या गोंधळी, सत्यम पाटील उपस्थित होते.

## कर्जत नगराध्यक्ष पदग्रहण सोहळा

**कर्जत :** नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबर रोजी लागला. परिवर्तन विकास आघाडीच्या थेट नगराध्यक्षपदाच्या उमेदवार पुष्पा दगडे यांनी विजय संपादन करून आपल्या १३ शिलेदारांसह कर्जत नगरपरिषदेवर सत्ता स्थापन केली आहे. औपचारिकता म्हणून कर्जत नगरपरिषदेच्या नगराध्यक्षाचा पदभार स्वीकारला. कर्जत नगरपरिषद कार्यालयात नगराध्यक्ष पदग्रहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित नगराध्यक्ष पुष्पा दगडे यांनी पदभार स्वीकारला.

## कर्जत शहरात मशाल मिरवणूक

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

हुतात्मा वीर भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या बलिदान दिनानिमित्त कर्जतमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हुतात्मा स्मृती समितीच्यावतीने शहरात मशाल मिरवणूक काढण्यात आली होती. त्यानंतर हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली.



कर्जतच्या टिळक चौकात हुतात्मा बलिदान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास नगराध्यक्ष पुष्पा दगडे यांच्या हस्ते क्रांतीज्योत प्रज्वलित करण्यात आली. तसेच, सिद्धगडहून आणलेल्या मृतिकेचे पूजन डॉ. रवींद्र मर्दाने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक अशोक राऊत, मानसी कानिटकर, सुचिता खोत, ॲड. योगिनी देशमुख, अरुण थोरवे, प्रभाकर आसवले आदी उपस्थित होते. त्यानंतर शहरातून मशाल मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक टिळक चौकात आल्यानंतर शवम ढाकवळ आणि सृष्टी ढाकवळ यांनी दोन्ही हुतात्म्यांच्या कार्याची व बलिदानाची प्रसंगानुरूप माहिती सांगितली. यावेळी दत्तात्रेय म्हसे, विवेक बडेकर, रमेश पवार, पियुष पाटील, गजानन बोराडे, जयेश शेलार, कृष्णा पवार, शशिकांत मंडलिक, ॲड. भारती ढाकवळ, राहुल गायकवाड, विशाल कोकरे, निखिल क्षीरसागर, गणेश गायकवाड, मच्छिन्द्र पवार, संतोष मंडलिक, दिनेश पवार, संतोष पवार, सुनील आढाव, दिनेश पवार, स्नेहा आढाव, कल्पना मंडलिक, स्वरूपा मंडलिक, कविता शिंदे, विनायक पवार आदींसह कर्जतकर मोठ्या संखेने उपस्थित होते.

## रत्नाकर गाताडी यांचा पुण्यस्मरण दिन



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

स्वर्गीय रत्नाकर गाताडी हे कोप्रोली गावचे खरे रत्न होते. त्यांनी निवेदन कलेच्या माध्यमातून कोप्रोली गावाचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचविले आहे, असे गौरवोद्गार शिक्षिका रणिता ठाकूर यांनी काढले. निवेदक तथा आदर्श शिक्षक स्वर्गीय रत्नाकर गाताडी यांचा १२वा पुण्यस्मरण दिन गुरुवारी (दि.१) सुयश क्लासेस आवरे यांच्यावतीने कडापे येथील प्राथमिक शाळेत साजरा करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या.

रत्नाकर गाताडी हे व्यक्तिमत्व केवळ शब्दांचे जादूगार नव्हते, तर विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे प्रेरणास्थान होते. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालावा, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व वक्तृत्वगुण विकसित व्हावेत, या उद्देशाने स्वच्छता अभियाना अंतर्गत वकृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात प्राप्ती म्हात्रे व आरोही थळी यांनी सादर केलेल्या वकृत्वाने उपस्थितांची मने जिंकली. तसेच, श्रेयस क्लासेस तर्फे शैक्षणिक साहित्याचे व दिनदर्शिकांचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक सर्वेश ठाकूर, प्रणिता ठाकूर, नागेंद्र म्हात्रे, शंकर पाटील, हरीश म्हात्रे, साक्षी थळी, पल्लवी थळी, नीलम थळी, अविष्कार म्हात्रे, सुप्रिया थळी उपस्थित होते.

## बॅग स्कॅनिंग मशिन्स कार्यान्वित

**पनवेल :** रेल्वे स्थानकाच्या सुरक्षेसाठी पुन्हा एकदा अत्याधुनिक बॅग स्कॅनिंग मशिन्स बसवण्यात आल्या आहेत. बाहेरगावी प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या बॅगांची तपासणी या मशिन्सद्वारे करण्यात येणार आहे. अनेक वर्षांपासून या मशिन्सची मागणी प्रवासी व नागरिकांकडून होत होती. पूर्वीही अशा मशिन्स बसवण्यात आल्या होत्या; मात्र, देखभालीअभावी त्या खराब झाल्याने काढून टाकण्यात आल्या होत्या. सध्या पनवेल रेल्वे स्थानकात दररोज हजारो प्रवासी प्रवास करत असल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मात्र, ज्या ठिकाणी या मशिन्स बसवण्यात आल्या आहेत, ते ठिकाण गैरसोयीचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



## सुवर्ण क्रांती अर्बन बँकेची सभा

**माणगांव :** सुवर्ण क्रांती अर्बन मल्टीस्टेट निधी लिमिटेड बँकेची सभा गुरुवारी (दि.१) बँकेचे संस्थापक सुखदेव म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत माथेरान येथे संपन्न झाली. या सभेत बँकेच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी लीडर डेव्हलपमेंट प्रोग्राम म्हणजेच नेतृत्व विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुखदेव म्हात्रे यांनी आपल्या मार्गदर्शनात बँकेचा अहवाल, बँकेची नियमावली, तसेच बँकेच्या योजनांबद्दल सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमामध्ये बँकेत उत्कृष्टपणे काम करणारे माणगाव शाखेमधून संदीप सकपाळ, लतिका पोटले, अंकिता हर्णे, किशोर झेमसे, शंकर जाधव, नरेंद्र पेणकर, पूजा शिर्के, संजीवनी सकपाळ, सुरेश पोटले, अक्षदा मोरे, भक्ती नागावकर, पुणे येथील भरत दानवे तसेच महाड, बिरवाडी, पोलादपूरमधून साक्षी कदम, प्रेरणा तळवटकर, सुशांत जाधव, संगीता जाधव, श्रीहरी जाधव यांचा सन्मान करण्यात आला.

## रक्तदान शिबिरात ३२ बाटल्यांचे संकलन

**। रोहा । प्रतिनिधी ।**

हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अशोक जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा शहरात शुक्रवारी (दि.२) समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रोहा मेडिकल असोसिएशन व राजमुद्रा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला रोहा शहरासह तालुक्यातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. युवक, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी व विविध क्षेत्रांतील नागरिकांनी रक्तदान करत या उपक्रमाला मोठे पाठबळ दिले. या शिबिरात तब्बल ३२ रक्त बाटल्यांचे संकलन करण्यात आले.



रोहा नगराध्यक्षा वनश्री शेंडगे, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, पत्रकार राजेंद्र जाधव, निलिकॉन कंपनीचे मालक मुकुंदभाई तुराकिया, रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील, विनोद पाशिलकर, समाधान शिंदे, संतोष पोटफोड, अमित मोहिते, डॉ. देशमुख यांच्यासह असंख्य हितचिंतकांनी उपस्थित राहून डॉ. जाधव यांना शुभेच्छा दिल्या.

## समीर साळुंके सेवापुर्ती गौरव मिरवणूक

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील आंबेवाडी गावाचे सुपत्र समीर साळूंके हे भारतीय सैन्य दलातून ३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त झाले. त्या निमित्ताने शुक्रवारी (दि.२) मुंबई-गोवा महामार्गावरील आंबेवाडी बाजारपेठेतील अंबर सावत महाराज मंदिर येथून पुई-गोवे रस्त्यावर असणाऱ्या त्यांच्या निवास्थानापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली.



देशाची सेवा करणाऱ्या भारतीय सैनिकांचा सर्वांना अभिमान असतो. आंबेवाडी गावचे सुपत्र समीर साळूंके हे काश्मीरसह देशाच्या विविध राज्यांत १७ वर्षे ६ महिने देशसेवा करून सेवानिवृत्त झाले. काश्मीरच्या गुलाबी थंडीत हिरव्या रंगाच्या वेशात देशाची सेवा करणे भाग्यवान व्यक्तीच्या नशिबात असते. ज्यावेळी भारतीय सैन्यातुन सेवानिवृत्त होतो, त्यावेळी त्या भारतीय सैनिकाचे संपूर्ण कुटूंबासहित त्या परिसरातील नागरिकांना सार्थ अभिमानाचा असतो. त्याप्रमाणे समीर साळूंके यांनी भारतीय सैन्य दलात देश सेवा करून सेवा निवृत्त झाले. त्यांचा सेवापूर्ती सेवा निमित्ताने आंबेवाडी बाजारपेठेतुन मिरवणूक काढण्यात आली. यावेळी आंबेवाडी ग्रामस्थ, बाजारपेठेतील व्यापारी वर्ग, नाभिक समाज, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### सात शाळांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग | समूह गीते सादर करून मने जिंकली

## विद्यार्थ्यांनी जागवली क्रांतीची मशाल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने माणिवली येथील हुतात्मा स्मारकात शिक्षण विभागाच्या दहिवली मालेगाव केंद्राच्यावतीने 'जागर क्रांतीचा' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या सात प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी समूह गीते, क्रांती गीते आणि समर गीते सादर करून वहावा मिळवली.



हुतात्मा भाई कोतवाल आणि वीर हुतात्मा हिराजी पाटील यांच्या बलिदानाने पावन झालेली त्यांची जन्मभुमी मानिवली येथे पुर्व संध्येला जागर क्रांतीचा हा कार्यक्रम सादर करण्यात येतो. यामध्ये केंद्र ददिवली-माले अंतर्गत १० शाळांचा सामावेश करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात वीर हुतात्मा हिराजी पाटील यांच्या अर्धपुतळ्याला विठ्ठल पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून करण्यात आली. यावेळी विस्तार अधिकारी प.शो. म्हात्रे, प्रशासक संजय चव्हाण, ग्रामपंचायत अधिकारी पांडुरंग म्हसे, स्मारक समिती अध्यक्ष प्रवीण डायरे, शाळा व्यवस्थापन समिती जितेंद्र गवळी, तंटामुक्ती अध्यक्ष रमेश पाटील, मुख्याध्यापक राठोड, पोलीस पाटील रामचंद्र गवळी, वामनबुवा गवळी, गोपाळ पाटील, आगरी संघटना अध्यक्ष संतोष पेरणे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात शाळा मानिवलीच्या विद्यार्थीनी गणेश वंदनेवे केली. तसेच, वकृत्व सामायिक नाटक आणि पोवाडे यांच्या सहभाग घेण्यात आला होता.

जागर क्रांतीचा या कार्यक्रमात माणिवली, दहिवली, मालेगाव, झेंडेवाडी, वंजारपाडा, बिरदोले, कोदिवले, अवसरे, वरई या शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका संजयोती कांबरी यांनी केले. यावेळी मानिवली शाळेने गणेश वंदना, दहिवली शाळेने वकृत्व, झेंडेवाडी शाळेने 'ही जन्मभूमी ही कर्मभूमी', वंजारपाडा शाळेने 'बंदिया बंदिया', मानिवली शाळेने 'विर हुतात्मा गीत', बिरदोले शाळेने नाटक 'चलाऑक्सिजन पेरू या', कोदिवले शाळेने समूह नृत्य 'खंडोबाची कारभारीन', वरई शाळेने समूह नृत्य 'देव मल्हारी', मानिवली शाळेनेनाटक 'स्वातंत्र्याचारणसंग्राम', मालेगाव शाळेने समुह नृत्य 'सुनो गोरसे दुनियावालो', अवसरे शाळेने समूह गीत 'स्वातंत्र्याच्या लढ्यात', मानिवली शाळेने समुहानृत्य 'स्वर्गात आकाशगंगा', झेंडेवाडी शाळेने समुहनृत्य 'झुलवा पाळणा', वंजार पाडा शाळेने पोवाडा 'वंदू शूराला क्रांतीवीराला', इत्यादी कार्यक्रम सादर झाले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**४ जानेवारी**

१) श्री.अभय प्रभाकर सिनकर अलिबाग, ४-१-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**लायन्स क्लब ऑफ अलिबाग**

# श्रीवर्धन आगाराचे वेळापत्रक कोलमडले

## ● चालक-वाहकांच्या कमतरतेचा बसफेऱ्यांना फटका

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

एसटी महामंडळाच श्रीवर्धन आगार हे अत्यंत जुने असून, मुंबई-गोवा महामार्गापासून सुमारे ५० किलोमीटर अंतरावर स्थित आहे. एकेकाळी जिल्ह्यात सर्वाधिक उत्पन्न देणाऱ्या आगारांमध्ये श्रीवर्धन आगाराचा समावेश होता. मात्र, सध्या आगाराची परिस्थिती काहीशी बिकट झाल्याचे चित्र दिसून येत आहे.



चालक-वाहकांच्या बदल्या, सेवानिवृत्ती तसेच रिक्त पदांवर नवीन कर्मचारी वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे सध्या सुमारे १० ते १५ कर्मचारी कमी असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. सध्या श्रीवर्धन आगाराकडे ४० चालक, २२ वाहक व १०१ चालक-वाहक असे एकूण १६३ कर्मचारी कार्यरत आहेत.

कर्मचारी संख्येच्या कमतरतेमुळे गाड्या वेळेवर सुटण्याचा परिणाम होत असून, कार्यरत चालक-वाहकांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्याचेही दिसून येत आहे.

आगारातील बससंख्येचा विचार करता सध्या २८ साध्या बसेस, यामध्ये १० सीएनजी व उर्वरित डिझेल, ६ शिवाशाही बसेस, ८ स्लीपर कोच, खासगी कंपनीच्या १४ बसेस तसेच नव्याने दाखल झालेल्या लालपरीच्या ५ बसेस असा एकूण ५६ बसेसचा ताफा आगाराकडे आहे.

कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या आगाराच्या नियमिततेवर परिणाम करत असल्याने, बदली किंवा सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या जागी तातडीने मनुष्यबळ उपलब्ध करुन दिल्यास श्रीवर्धन आगारातील अनेक समस्या मागी लागू शकतील, अशी अपेक्षा प्रवासी व स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत.

## प्राचार्य डी. एम. जाधवांची सेवापूर्ती



**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचालित अशोकदादा साबळे विद्यालय व माणगाव जुनिअर कॉलेज माणगावचे प्राचार्य डी. एम. जाधव हे ३१ डिसेंबर २०२५ रोजी नियत वयमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यानिमित्त संस्था आणि कर्मचाऱ्यांच्यावतीने शनिवार (दि.३) जानेवारी रोजी प्राचार्य डी. एम. जाधव यांचा स्वागत सेवापूर्तीनिमित्त सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. जाधव हे १९९२ पासून या संस्थेत शिक्षक, पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक आणि मुख्याध्यापक तथा प्राचार्य म्हणून ते ३३ वर्ष तीन महिने २३ दिवस इतकी प्रदीर्घ सेवा संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली केलेली आहे.



## पनवेलमध्ये वाहतूक नियमनाबाबत मार्गदर्शन

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ नागरिक संघ, पनवेल यांच्या साप्ताहिक सभेच्या निमित्ताने पनवेल शहर वाहतूक शाखेच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने तसेच पोहवा येळे व पोहवालदार मुलाणी अंमलदार उपस्थित राहून ज्येष्ठ नागरिकांना वाहतूक नियमनासंदर्भातील विविध अडचणींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नागरिकांना रस्ता ओलांडताना घ्यावयाची काळजी, पादचारी मार्गाचा योग्य वापर, सिग्नलचे नियम, तसेच वाहनचालकांकडून होणाऱ्या वाहतूक नियमभंगामुळे उद्भवणाऱ्या अडचणी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांना पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने यांनी समर्पक उत्तरे देत आवश्यक सूचना केल्या. पनवेल शहर वाहतूक शाखेच्या या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती होऊन त्यांच्या सुरक्षिततेसाठी सकारात्मक वातावरण निर्माण होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## सोसायटीसमोरील कचरापेटीची चोरी

**पनवेल :** खारघर सेक्टर ३४ मधील स्कायलाइन सोसायटीसमोर ठेवण्यात आलेली कचरापेटी तसेच लहान मुलांच्या सायकल, दारासमोरून चप्पल चोरी केल्याचे प्रकार सीसीटीव्हीद्वारे उघडकीस आले होते. चोरांनी आता सोसायटीचे डस्टबिन चोरी करून घेऊन जात असल्याचे प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बंद असल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करत आहेत.

## रस्ते सुरक्षा मोहिमेत विद्यार्थ्यांचे प्रबोधन

**। चिरनेर। प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील वेश्वी येथील जे. एम. म्हात्रे एज्युकेशन सोसायटीच्या पदाजी पांडुरंग मुंबईकर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये उरण वाहतूक पोलिसांच्या वतीने रस्ते सुरक्षा मोहिमेअंतर्गत प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन शाळेतील दीडशे ते दोनशे विद्यार्थी, विद्यार्थिनींना दैनंदिन जीवनामध्ये वावरत असतांना वाहन सुरक्षित चालवणे, अपघातापासून स्वतःचा बचाव व इतरांची सुरक्षा घेण्याबाबत विविध प्रकारे मौलाचे मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी पालकांना मोटार सायकल चालवत असतांना हेल्मेट वापरण्याबाबत माहिती देण्यात आली. याशिवाय वाहन चालवितांना मोबाईलवर कोणीही बोलू नये, रोडवर अपघात झाल्यास जखमींना तात्काळ हॉस्पीटलमध्ये घेऊन जावे तसेच १०० व ११२ या क्रमांकांवर फोन करून अपघाताची माहिती तात्काळ द्यावी असे सांगण्यात आले.



## मधु मोरे सेवानिवृत्त



**खरोशी :** सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या खवली येथील माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मधु मोरे नियत वयोमानानुसार ३१ डिसेंबर रोजी सेवापूर्ती समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी घोडके, डी. एस. पाटील, बी. डी गायकवाड, बैकर, अशोक आंबरे, अरविंद आहेर, रवींद्र आहेर, सुनील आहेर, अंकुश आहेर, देवराम आहेर, चंद्रभान कानवडे, टेमकर, कुंभार, जे. पी. पाटील, ठाकूर, विद्या घरत, धनाजी घरत, यादव, वाघमारे, दीपक पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## उतेखोल शाळेत वॉटर फिल्टरचे लोकार्पण

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने माणगाव तालुक्यातील आदर्श प्राथमिक विद्यामंदिर उतेखोल शाळेत मचारिझेन फाउंडेशनच्यावतीने आधुनिक वॉटर फिल्टर यंत्रणा बसवण्यात आली आहे. या फिल्टरचे लोकार्पण गुरुवार (दि.१) जानेवारी २०२६ रोजी एका विशेष कार्यक्रमाद्वारे उत्साहात करण्यात आले.



या कार्यक्रमास चारिझेन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांना संबोधित करताना त्यांनी केवळ शैक्षणिक प्रगतीच नव्हे, तर एक उत्तम माणूस म्हणून घडण्याचे संस्कार रुजवण्यावर भर दिला. त्यांच्या प्रेरणादायी भाषणामुळे विद्यार्थी भारावून गेले. कार्यक्रमाचे विशेष पैलू: बौद्धिक मार्गदर्शन: फाऊंडेशनचे क्वालिटी हेड सचिन वाघ यांनी मुलांच्या जडणघडणीत वाचनाचे महत्त्व सांगतानाच वाचन संस्कृती जोपासण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी उपाध्यक्ष सतीश काळे यांचीही विशेष उपस्थिती होती. कलाविष्कार: शाळेच्या विद्यार्थ्यांनी वीरता या विषयावर शौर्यगाथा सांगणारी कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. आरोग्य जाणीव: शुद्ध पाण्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुरक्षित राहून त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेचे अध्यक्ष लक्ष्मण जंगम व मुख्याध्यापक अमोल जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमाची सांगता सविता निंबाळकर यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. चारिझेन फाऊंडेशनने राबवलेल्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ०४ ते १० जानेवारी २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### आर्थिक लाभाची शक्यता

**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपल्या लक्ष्यांप्रती आपण वचनबद्ध असल्याने प्रत्येक काम आपण शिस्तबद्ध पद्धतीने व एकाग्रतेने पूर्ण कराल. या आठवड्यात व्यावसायिक आघाडीवर शत्रूंपासून सावध राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. उत्तरार्धात आपणास आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या सुरवातीस आपण जर एखाद्याच्या सहकार्याची अपेक्षा बाळगलीत तर ती पूर्णत्वास जाईल. आपले लक्ष बहुतांशी आपल्या कामाच्या गुणवत्तेवर केंद्रित ठेवल्याने आपण स्पर्धात्मक वातावरणात टिकाव धरू शकाल. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पूर्वार्ध अनुकूल आहे. सामान्य अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उत्तरार्ध जास्त अनुकूल आहे. या आठवड्यात कुटुंबीय व प्रियव्यक्तीशी असलेल्या आपल्या संबंधांना आपण अधिक चांगल्या प्रकारे समजू शकाल. **महिलांना:** समाधानामुळे प्रियव्यक्ती प्रती असलेली भावना अधिक तीव्र होईल. आध्यात्मिक मार्गासाठी सुद्धा हा आठवडा अनुकूल आहे. प्रणयी जीवनासाठी सुद्धा हा आठवडा अनुकूल असून उत्तरार्धात आपणास प्रेमालाप करण्याची संधी लाभेल. **शुभ दिनांक** : ०५, ०६

### आप्तांशी संपर्क वाढतील

**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरुवातीस आपणास आत्मपरीक्षण करण्याची इच्छा होईल. त्यामुळे आपण इतरांपासून दूर राहून स्वतःच्याच जगात वावरत बसाल. अशा परिस्थितीत आपण व्यवसाय किंवा कुटुंबास कमी महत्व द्याल. मात्र, आठवड्याच्या मध्यापासून आपण पुन्हा सांसारिक बाबतीत सक्रिय व्हाल. त्यामुळे दूरवर राहात असणाऱ्या आप्तांशी संपर्क वाढतील. कोणतेही नवीन धाडस किंवा सुरवात करण्यात येणाऱ्या अडचणी आता दूर होऊ लागतील. भागीदाराच्या सहकार्याने प्राप्तीत वाढ करू शकाल. सुरवातीच्या दोन दिवसात विद्यार्थ्यांना अभ्यासाचा कंटाळा येऊ शकतो, मात्र त्या नंतर ग्रहांच्या प्राबल्यामुळे अभ्यास चांगला होईल. या आठवड्यात व्यक्तिगत जीवनात व संबंधात पारदर्शीपणा ठेवल्यास त्यातील आत्मीयता जाणवून संबंध अधिक परिपक्व होतील. **महिलांना:** सुरुवातीच्या दोन दिवसात आपणास एकटे राहण्यास आवडले तरी एकंदरीत या आठवड्यात आपण संबंध उत्तम प्रकारे टिकवू शकाल. आठवड्याच्या सुरवातीस आरोग्याची काळजी घ्यावी. कोणत्याही लहानशा समस्येकडे दुर्लक्ष करू नये. **शुभ दिनांक** : ०७,०८

### व्यावसायिक व्यूहरचना आखा

**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरुवातीस आपल्या व्यक्तिगत जीवनात येणारी वादळे टाळण्यासाठी संबंधांत अधिक जिवंतपणा आणण्याचा प्रयत्न करावा लागेल. आठवड्याच्या मध्यास आपल्यात सुस्ती व आळस राहिल्याने आपल्या शक्तीचे स्तर खालावून प्रकृतीत सतत चढ - उतार होण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात आपण कठीण परिस्थितीतून बाहेर पडू शकाल. आपली व्यावसायिक व्यूहरचना आखून आपण मार्गक्रमण कराल. कदाचित व्यावसायिक हेतूने अनेक लोकांशी सतत संपर्क व बैठका घेण्यासाठी सुद्धा सज्ज राहावे लागेल. आपण नवीन उत्पादन किंवा सेवा सुरु करण्याचा विचार करत असाल तर त्यासाठी उत्तरार्ध अनुकूल आहे. आपण आजवर साधलेल्या संपर्कांचा आता फायदा होऊ लागेल. विद्यार्थ्यांसाठी आठवड्याचे सुरवातीचे व अखेरचे दिवस अनुकूल आहेत. **महिलांना:** प्रियव्यक्ती किंवा वैवाहिक जोडीदाराकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यास त्यांची वास्तविक स्थिती समजून घेऊन त्याचे निराकरण करण्यासाठी मदतरूप होण्याचा प्रयत्न करावा, असे केल्याने आपल्यात दीर्घकाळासाठी जवळीक वाढेल. **शुभ दिनांक** : ०५, ०९

### पौष्टिक आहार घ्या

**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरवातीस मानसिक तणावामुळे आपल्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. आपण पौष्टिक आहारच घ्यावा. या दरम्यान स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी योग्य जीवनशैलीचे अनुसरण करणे अत्यंत गरजेचे आहे. व्यावसायिक आघाडीवर सुद्धा अतिरिक्त काम करण्याची तयारी ठेवावी लागेल. कामाच्या ठिकाणी आंतरिक लाथाळ्यांपासून बचाव करण्यासाठी आपणास अधिक व्यावसायिक व्हावे लागेल. आठवड्याच्या मध्यास वैवाहिक जोडीदाराच्या किंवा प्रियव्यक्तीच्या सहवासात वेळ घालवताना आपल्या जीवनातील उत्साह व उमेद वाढेल. उत्तरार्धात आपला अंतरात्मा आपणास दैनंदिन कार्यापासून दूर राहण्यास प्रोत्साहित करेल. त्यामुळे आपल्या आध्यात्मिक ज्ञानाच्या कक्षा रुंदावतील. **महिलांना:** आपल्या वैवाहिक जोडीदाराची नापसंती किंवा नाराजी आपण समजून घेऊन त्याचे योग्य निराकरण करून त्याचे किंवा तिचे हृदय जिंकू शकाल. ह्या आठवड्यात प्रणयी जीवनात संभाव्य गैरसमज टाळण्यासाठी आपल्या प्रियव्यक्तीशी वार्तालाप करताना शब्दांची निवड काळजीपूर्वक करावी. **शुभ दिनांक** : ०६,०८

### प्रलंबित कामे पूर्ण होतील

**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आठवड्याच्या सुरवातीस आपण कुटुंबाशी संबंधित बाबींकडे लक्ष द्याल, परंतु कौटुंबिक कार्यात विलंब होऊ शकतो. वाणी संयमित ठेवल्यास वाणीतील माधुर्यामुळे आपण कोणत्याही व्यक्तीस आपले म्हणणे पटवून देऊ शकाल. आर्थिक बाबींवर आपण अधिक लक्ष द्याल. आठवड्याच्या मध्यास वैवाहिक जोडीदार किंवा प्रिय व्यक्तीशी आपण जवळीक साधू शकाल. विवाहेच्छुकांना योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात व्यावसायिक आघाडीवर आपली सक्रियता वाढेल. नोकरी करणाऱ्या व्यक्तींनी उत्साहपूर्वक काम केल्यास त्यांना त्याचे यथोचित फळ मिळू शकेल. पदोन्नतीचा मार्ग मोकळा होईल तसेच नवीन संधी सुद्धा प्राप्त होण्याची शक्यता आहे. त्यासाठी योग्य प्रयत्न करा. **महिलांना:** आठवड्याच्या अखेरीस प्रलंबित कामे पूर्णत्वास जातील. वैयक्तिक संबंधाच्या बाबतीत आपण अतिभावनाशील व्हाल. विद्यार्थी आठवड्याच्या मध्यापर्यंत अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकतील. त्या नंतर त्यांना अभ्यासात काही अडचणी येतील. **शुभ दिनांक** : ०४, १०

### व्यवसाय लाभ होण्याची शक्यता

**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात मन स्थिर करून सुद्धा उत्तरार्धात काही समस्या निर्माण झाल्याने आपले मन बेचैन व व्याकुळ होईल. त्यामुळे मानसिक अस्वस्थता जाणवेल. आठवड्याच्या अखेरीस शरीराला ताजेतवाने ठेऊन शरीर निरोगी ठेवू शकाल. तरीही आपले आरोग्य मध्यम राहील. आपणास आहारात योग्य आहारासाठी आग्रही राहावे लागेल तेलकट तूपट, तिखट या पासून लांब राहा. डोकेदुखी, शारीरिक ताण इत्यादी समस्या संभवतात. व्यवसाय कार्यात सुद्धा लाभ होण्याची अपेक्षा आपण यावेळी बाळगू शकता त्या दिशेने प्रयत्न करा. सेवा तसेच धर्मादाय कार्यात अधिक खर्च करून आपण समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न कराल. व्यापाऱ्यांची वसुली होऊ शकेल. व्यापारास नवीन दिशा सापडेल. भागीदारी कार्यात भागीदार व्यक्ती घाई किंवा रागराग करेल तेव्हा शांत राहावे. **महिलांना:** उत्तरार्धात विवाहेच्छुक व्यक्ती जोडीदार निवडीचा निर्णय घेऊ शकतील. कोलेस्ट्रोलशी संबंधीत समस्या संभवत असल्याने आहाराकडे विशेष लक्ष द्यावे. आरोग्य विषयक समस्या टाळण्यासाठी तब्बेती बाबत हलगर्जीपणा करू नका. **शुभ दिनांक** : ०५, ०६

### वागणुकीत सौम्यपणा राखा

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरवातीस कौटुंबिक वातावरणात सलोखा राहील. घरात एखादी नवीन वस्तू आणली जाईल. वडीलधारी व वरिष्ठ यांच्याशी वाणी व वागणुकीत सौम्यपणा राखावा व शक्य तितका त्यांचा आदर करावा. सध्या शासकीय व कायदेशीर खर्च करण्याची तयारी सुद्धा ठेवावी लागेल. नकारात्मक विचारांपासून दूर राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. आपल्या हातून एखादे धार्मिक किंवा पुण्य कार्य होईल. प्रणयी जीवनात आपण गर्क राहाल. समाधानी वृत्ती बाळगल्यास अनेक संघर्षातून बाहेर पडू शकाल. नोकरी-व्यवसायात स्पर्धेस सामोरे जावे लागले तरी आपल्या कार्यनिष्ठेमुळे आपण त्यात यशस्वी होऊ शकाल. उत्तरार्धात प्रिय व्यक्तीच्या संपर्काने आपण अधिक प्रसन्न व्हाल. मिळकत वाढल्याने हिशोबीपणाने दीर्घकालीन आर्थिक नियोजन सुद्धा करू शकाल. आठवड्याच्या मध्यास सामाजिक व सार्वजनिक प्रसिद्धी मिळेल. **महिलांना:** कौटुंबिक व वैवाहिक जीवनात सुख, संतोष व रोमँटिक पराकाष्ठेचा अनुभव येईल. आठवड्याच्या मधल्या दिवसात आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागेल. **शुभ दिनांक** : ०७,०८

### आत्मविश्वास द्विगुणित होईल

**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात चांगली कार्ये, आवेग व भरपूर जोमाने सामाजिक जवाबदाऱ्या किंवा वचने पाळावी लागतील. आपण ज्या जोमाने कार्य करून पुढे जाऊ इच्छिता त्यात इतरांचे सहकार्य मिळाल्याने आपला आत्मविश्वास द्विगुणित होईल. व्यावसायिक कार्याशी संबंधित सरकारीबाबीत यश प्राप्ती होईल. कमी प्रयत्नात चांगला आर्थिक लाभ होऊ शकेल. आपली कामे आयोजनानुसार पूर्ण होऊन आपणास अपेक्षित लाभ सुद्धा होईल. प्रतिस्पर्धी कोणत्याही क्षणी आपल्यावर चढाई करण्याची शक्यता असल्याने आपण सावध राहावे. वैवाहिक जीवनात प्रेमाची उत्कटता अनुभवता येईल. स्वादिष्ट भोजन, नवीन वस्त्रांची खरेदी, भिन्नलिंगी व्यक्तींचा संपर्क यामुळे आपण रोमांचित व्हाल. भिन्नलिंगी व्यक्तींशी आधुनिक साधनांच्या मदतीने वार्तालाप संभवतो. **महिलांना :** स्त्री मित्रांची मैत्री लाभदायी ठरेल. आपल्या पाल्याकडे लक्ष द्यावे लागेल. बाहेर फिरण्यासाठी केलेले नियोजन नंतर उपयोगी पडणार आहे योगासने व ध्यानधारणा करून आरोग्य चांगले राहण्यास मदत होऊ शकेल. **शुभ दिनांक** : ०९, १०

### मित्रांचे सहकार्य लाभेल

**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरवातीस आपणास एकटे राहण्याची इच्छा होईल. नवीन कार्याची सुरुवात करण्यास किंवा नवीन निर्णय घेण्यास पूर्वार्ध अनुकूल नाही. पोटाशी संबंधित विकारांमुळे शारीरिक अस्वस्थता जाणवेल. मनात काही नकारात्मक विचार सुद्धा येतील. असे असले तरी आठवड्याच्या मध्यास ग्रहांच्या अनुकूल परिवर्तनामुळे आपल्या जीवनात नवीन आशावाद जागृत होऊ शकेल. आपण नवीन विचाराने व उत्साहाने सुरुवात करू शकाल. स्नेहीजन व मित्रांचे सहकार्य मिळून त्यांच्याशी असलेल्या संबंधातील माधुर्यसुद्धा टिकून राहील. आठवड्याच्या मध्यास आजारी व्यक्तींना नवीन उपचारांचा फायदा होऊ शकेल. ह्या आठवड्याच्या सुरुवातीस खर्च करण्यास सज्ज राहावे लागेल. पहिल्या दिवसापासूनच विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नीयोजन करून त्यानुसार पुढे जावे लागेल. **महिलांना:** प्रियव्यक्ती किंवा वैवाहिक जोडीदाराशी सुरवातीस थोडा दुरावा निर्माण झाला तरी आठवड्याच्या मध्यास जवळीक वाढेल. ज्यांचे कोणाशी संबंध नसतील त्यांची एखाद्या योग्य व्यक्तीशी ओळख होण्याची शक्यता नाकारता येत नाही. **शुभ दिनांक** : ०५, ०६

### सार्वजनिक क्षेत्रात लाभ होईल

**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरुवात काहीशी प्रतिकूल आहे. विशेषतः आपण कोणत्याही बाबतीत अति घाई किंवा अतिशयोक्ती करू नये, अन्यथा आपले विचार किंवा शब्दांचे चुकीचे अर्थ निघण्याची किंवा नुकसानदायी निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. सुरुवातीस आपण कोणतेही नवीन काम करण्या ऐवजी धीराने व शांत चित्ताने जैसे थे स्थिती टिकवून ठेवणे हितावह होईल. आठवड्याच्या मध्यापासून आपण सामाजिक व सार्वजनिक जीवनात कौतुकास पात्र व्हाल. आपणास सार्वजनिक क्षेत्रात चांगला लाभ होईल. आपण सार्वजनिक सेवेत सुद्धा स्वारस्य दाखवाल. मनमोहक वस्तूंची खरेदी किंवा मनोरंजनासाठी आपण पैसे खर्च कराल. नोकरी-व्यवसायात नवीन संधी मिळेल. विविध क्षेत्रात आपण केलेल्या कष्टांचे फळ प्राप्त झाल्याने आपल्या आर्थिक सामर्थ्यात व कामातील आत्मविश्वासात वाढ होईल. **महिलांना:** आठवड्याच्या मध्यापासून प्रियव्यक्तीशी संबंधात सुधारणा होऊन आपणास सौख्य व आनंदाची प्राप्ती होईल. भावनाशील संबंधात आपण न्हाऊन जाल. सुरवातीचे दोन दिवस वगळता बहुतांशी आपले आरोग्य उत्तम राहील. **शुभ दिनांक** : ०७,०८

### प्रतिस्पर्ध्यांवर मात कराल

**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्ही कुटुंबातील बऱ्याच जबाबदाऱ्यांना पूर्ण कराल ज्यामुळे तुमच्या प्रतिष्ठेत वृद्धी होईल तसेच तुमचा समाजात ही मान सन्मान ही वाढेल आणि तुम्ही एक प्रसिद्ध व्यक्ती म्हटले जाल. या आठवड्याच्या सुरुवातीपासूनच आपण व्यावसायिक व व्यक्तिगत जीवनावर अधिक लक्ष केंद्रित करू शकाल. त्यामुळे कामाच्या ठिकाणी आपण प्रतिस्पर्ध्यांवर मात करू शकाल. मोहाच्या अतिरेकाने नवीन समस्या निर्माण होण्याची शक्यता असल्याने अल्पकालीन योजनेत परिस्थितीचा अभ्यास करून पाऊल उचलावे. अति आत्मविश्वास समस्यांना कारणीभूत ठरू शकतो हे लक्षात ठेवावे. दैनंदिन प्राप्तीत फायदा होऊन त्यात वाढ संभवते. जन्मस्थग्रह प्रबळ असल्यास अचानक धनलाभ तसेच विविध प्रकारचे लाभ संभवतात. **महिलांना:** घरात धार्मिक कार्ये होतील. विवाहेच्छुकांना योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता आहे. कुटुंबियांशी कटुता निर्माण झाल्याने मनाची उदासीनता वाढेल. वडीलधाऱ्यांच्या आशीर्वादाने आपणास कार्यात यश मिळेल, तसेच कोणत्याही कार्यात त्यांचे उत्तम मार्गदर्शन सुद्धा मिळेल. त्याचा फायदा होईल. **शुभ दिनांक** :०८, ०९

### कामाची प्रशंसा होईल

**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात व्यावसायिक आघाडीवर प्रगती झाल्याने आपल्या सामाजिक प्रतिमेत मोठी सुधारणा होईल. आपण सार्वजनिक क्षेत्रातील कार्यात सहभागी व्हाल व तेथे आपल्या कामाची प्रशंसा सुद्धा होईल. उत्तम वाहनसौख्य लाभेल. आपले व्यक्तिगत जीवन व संबंध प्रबळ करण्यासाठी आवश्यक तितका खर्च करणे हितावह होईल. पूर्वार्धात विद्यार्थ्यांचा अभ्यास उत्तम झाला तरी उत्तरार्धात वैचारिक चांचल्यामुळे अभ्यासातील एकाग्रता कमी होण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या सुरवातीस इतरांशी संपर्क वाढतील. तंदुरुस्त राहण्यासाठी सभोवतालच्या वातावरणात स्वच्छता ठेवून अशुद्ध तत्त्वांपासून दूर राहून आरोग्याची काळजी घेता येईल. मनात येणाऱ्या वाईट विचारांना दूर सारा. **महिलांना:** हा आठवडा वैवाहिक जीवनाचा आनंद उपभोगण्यासाठी उत्तम आहे. जोडीदाराच्या सहवासात सुखद क्षणांचा अनुभव घेऊ शकाल. आठवड्याच्या मध्यास आपणास कुटुंबियांचे व नातेवाईकांचे सहकार्य सुद्धा मिळू शकेल. वैवाहिक जीवनात आपल्या जोडीदारा बरोबर शांतिपूर्वक राहण्याचे प्रयत्न करा. **शुभ दिनांक** : ०६,०८

# सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांची सभा उत्साहात



**| खरोशी | प्रतिनिधी |**

अखिल रायगड जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक व कर्मचारी संघाची सभा अमरचंद पाटील जिल्हाध्यक्ष रायगड यांच्या अध्यक्षतेखाली दि. २ जानेवारी रोजी आगरी समाज विकास पेण येथे आनंदाने व उत्साहाने संपन्न झाली.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा निवृत्त न्यायाधीश डी.पी. म्हात्रे, जिल्हाध्यक्ष अमरचंद पाटील, पत्रकार धनाजी घरत, सरचिटणीस गुरूनाथ पाटील, कार्याध्यक्ष परशुराम म्हात्रे, कोषाध्यक्ष जगन्नाथ मोकल, नगरसेवक निळकंठ म्हात्रे, भूषण कडू, जिल्हा उपाध्यक्ष स.रा.म्हात्रे, गजानन गायकवाड, गणेश थवई, पनवेल गटशिक्षणाधिकारी शाहू सतपाल, अभिमन्यू गावंड, विलास गावंड (उरण), सल्लागार बापुजी म्हात्रे, प्रदीप म्हात्रे, मुरलीधर म्हात्रे, अलका मोकल, सुगंधा म्हात्रे, माजी केंद्रप्रमुख चंद्रकांत म्हात्रे, सुधाकर पिंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. अहवाल वाचन विश्वनाथ कोठेकर यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात आणि स्वागत गीत आणि ईशस्तवन गायन करून सरस्वती मातेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकातून सरचिटणीस गुरूनाथ पाटील यांनी सांगितले की, सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत समिति गटशिक्षणाधिकारी, गटविकास अधिकारी यांची भेट घेऊन त्यांचा योग्यपणे निपटारा केला जातो.

अनेक मान्यवरांनी सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत, अशी मागणी करण्यात आली. अध्यक्ष भाषणात अमरचंद पाटील यांनी सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे सेवा पुस्तक लवकरात लवकर तपासून देणे, अंशकालीन रक्कम तात्काळ मिळावी २०२६ या वर्षात सेवानिवृत्त होणाऱ्या प्राथमिक शिक्षकांची यादी गटाकडे पाठवणे अत्यंत आवश्यक आहे, पंचायत समितीच्या माध्यमातून वेळोवेळी ही माहिती रायगड जिल्हा परिषद यांना सहा महिने अगोदर पाठवणे गरजेचे आहे. पंचायत समितीकडे पाठवलेल्या माहितीचा तात्काळ पाठपुरावा करावा आणि काम पूर्ण झाले नाही तर सर्व सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांना वेगळा मार्ग काढून काम करून घेतले जाईल, असा इशारा देण्यात आला. यावेळी रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यातील सेव शिक्षकांचा शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच या जिल्हा कार्यकारिणीच्या सभेमध्ये अनेक सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांना पदावर जबाबदारी देण्यात आली.

**भाडे तत्वावर किंवा चालवण्या करीता १२ स्वेकर फुट दोन बेडरूम ३०० फुट गॅलरी सह सर्व फर्निचर सह गाड्या पार्किंग सह सर्व सोई युक्त कॉटेज भाड्याने देणे आहे. संपर्क ८०१०६३४६५७**

## जाहिर समन्स

नि. क्र. ४८/ड

**अलिबाग येथील मे. सिव्हिल जज्ज सिनी. डिव्हि. सो. यांचे कोर्टात**

स्पेशल सिव्हिल सुट नं.४६/२०२१

अमोल जगदिश कपाडिया वगैरे — वादी

विरुद्ध

संदीप राघो उर्फ राघव धर्मा थळे वगैरे — प्रतिवादी

सदरच्या दाव्यामधील प्रतिवादी क्र. २ श्रीमती जया सुधाकर म्हात्रे, प्रतिवादी क्र.४ श्रीमती वंदना मधुकर भगत, प्रतिवादी क्र.५ श्रीमती संगीता प्रकाश पाटील, प्रतिवादी क्र.६ श्रीमती स्मिता संजय पाटील, सर्व रा. मु. झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड यांस वेळोवेळी नोटिसा/समन्स काढले असता बजावणी झाली नाही. तरी वर नमुद प्रतिवादी क्र.२, प्रतिवादी क्र.४ ते क्र.६ यांस याद्वारे असे कळविणेत येत आहे की, या दाव्याचे कामी पुढील तारीख २९/०१/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता या कोर्टात स्वतः अथवा प्राधिकृत व्यक्तिमार्फत त्यांनी हजर व्हावे व आपले म्हणणे/कैफियत दाखल करावी. त्याचप्रमाणे बजावणीकरीता स्वतःचा पत्ता दाखल करावा. सदर तारखेस हजर होण्यास व म्हणणे देण्यास कसूर केल्यास सदर प्रतिवादींच्या विरुद्ध योग्य तो हुकूम करणेत येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२६-१२-२०२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याने दिले.

**कनिष्ठ लिपिक**
**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर**
**अलिबाग- रायगड**

**सहा. अधिक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर**
**अलिबाग- रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे किरवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या बिनशेती मिळकतीचे मालक श्री.नीता नरेश नागपाल व राजीव हरबंसलाल सेठी यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ५०/३/अ/१ | ३२०-०० | ३२-०० |
| ५०/३/अ/१ | ३३०-०० | ३३-०० |

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०४/०१/२०२६

**ॲड. समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकतीचे मालक श्री.सुनिल किसन जाधव यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं | प्लॉट नं | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| १४२ | २२ | २-७३-०० | २७-३० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/०१/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत हि खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असुन ती त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे सुखदरवाडी, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट नं | एकुण क्षेत्र आर | आकार रु. पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| वसुधा संजय मोरे | २४५/२ | वरकस ०-१९-००<br>पो.ख. ०-०९-००<br>०-२८-०० | ०=११ | खालसा |

वरील मिळकती संबंधात आमचे आशिल श्री. बळीराम पांडुरंग पाटील यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहान, दान, लिज, फरोक्त साठेकरार, अखत्यार लिएनचार्ज, ॲटचमेंट अन्न, वस्त्र, निवारा ताबा कबजा. वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत हि निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि. ०४/०१/२०२६

श्री.बळीराम पांडुरंग पाटील
मोबा.क्र. ९८९२१२६९९३

सही/-
**ॲड. श्री. पी. जी. दाभाडे,**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी विंग, ४ था मजला.
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजीनगर,
डॉ. वागळे हॉस्पीटल जवळ रोहा,
ता. रोहा जि. रायगड ४०२१०९,
मोबा. क्र. ९२७२७१३९५६

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर**
**सो. यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र.५१/२०२५

श्री. यशवंतसिंग गंगाराम ठाकूर
वय : ४९ वर्षे, धंदा : व्यापार
रा. कन्हैया बंगला श्रीबाग नं.२,
ता. अलिबाग, जि. रायगड. ... अर्जदार

विरूद्ध

कोणीही नाही ... सामनेवाला

**सदर जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,**

अर्जदार हे वरील पत्त्यावर राहत असून अर्जदार कै. गंगाराम तोडीसिंग ठाकूर यांचे वारस असलेबाबत जाहीर करून मिळणेकरीता मे.कोर्टात तसा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२१/०१/२०२६ रोजी पर्यंत मे. न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०३/०१/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

(कोर्टाचा शिक्का)

सही/-
**कनिष्ठ लिपिक**
**सि.ज.सि.डी. अलिबाग-रायगड**

सही/-
**सहा. अधिक्षक**
**सि.ज.सि.डी. अलिबाग-रायगड**

**ॲड.वंदना घोसाळकर**

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मा.दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात,**
**जिल्हा-रायगड**

स्पेशल दिवाणी मुकदमा क्र.: १४०/२०२२,
ने.ता.१४/०१/२०२६

श्री.दत्तात्रय शंकर सताणे उर्फ महार वगैरे — वादी

विरूद्ध

श्री.विश्वास राजाराम ठोसर वगैरे — प्रतिवादी

प्रति,

प्रतिवादी क्र.२ श्री.नितीन शंकर जाधव,
राहणार-पिरडोंगरी, ता-पेण, जि.रायगड

ज्याअर्थी सदरील वादी यांनी मौजे गागोदे खुर्द, तालुका पेण, जिल्हा रायगड येथील गट क्र.४६६ क्षेत्र ०-२६-३ या जमिनीबाबतच्या मालकी हक्कांच्या ठरावाकरीता रक्कम वसुलीकरीता, निरंतर मनाई हुकुमाकरीता व इतर तदनुषंगिक मागण्यांरीता विशेष दिलासा कलम ३४ व ३९ दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये या न्यायालयात दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी तुम्हास या नोटीसद्वारे असे कळविणेत येत आहे की, सदर दाव्याविरूद्ध कारण दाखविण्याकरीता दि.१४/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. तसे न केल्यास उक्त दाव्याची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

हे कळावे.

आज दिनांक रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली.

अलिबाग
दिनांक : ०१/०१/२०२६

सही/-
**क.लिपिक**
**दिवाणी न्यायालय व स्तर**
**अलिबाग**

सही/-
**सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर**
**अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल रुचिता राकेश दाभाडे रा.मेन रोड माजलगाव, मांजलेगॉव, बीड, ४३११३१. यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे-नालधे, ता.कर्जत, जि रायगड येथील बिनशेती मिळकत:-**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं./ प्लॉट नं | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| मौजे - नालधे | ७९ | १३४ | २.७६.०० | २७ | ६० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:-ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला,
गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका शेजारी,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१.

सही /-
**ॲड. निलेश दामू मुंढे**
दिनांक : ०४/०१/२०२६
मो. नं. ८४४६८६९६७१
ई मेल: nileshmundhe029@gmail.com

## खरेदीदारास सावधान नोटीस

१) सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यांत येते की, माझे अशील श्री. राजेंद्रनाथ सदाशिव पाटील, वय ६० वर्षे, व्यवसाय शेती, रा. मु. कार्लेखिंड, पो. कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड यांची मिळकत खालीलप्रमाणे आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन (मौजे कार्लेखिंड, ता. अलिबाग, जि. रायगड.)**

| अ.क्र. | ग.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | २६४<br>जुना स.नं.१३२/२ | - | ०-०१-५७ | ०.७५ |

आमचे अशीलांनी वरील वर्णनाची मिळकत खरेदीखत दस्त क्र. अलब १६०७/१९९८ नुसार खरेदी केलेली आहे. वरील वर्णनाच्या मिळकतीचे आमचे अशील हे कायदेशीर मालक असून वरील वर्णनाची मिळकत आमचे अशीलांचे मालकीची, तांबे, कबजा, वहिवाटीत आहे.

आमचे अशीलांच्या लगत असणारी मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतींचे वर्णन (मौजे कार्लेखिंड, ता. अलिबाग, जि. रायगड.)**
**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | स.नं. | हिस्सा नंबर | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|
| १. | १४० अे | १ | २६९/१ | ०-०४-७२<br>०-००-३९<br>०-०५-०९ |
| २ | १३२ अे | १ | २६९/२ | १-८२-७<br>पैकी ०-३१-० |
| ३. | १३२बी | ० | २६४ | ०-०१-५७ |

पैकी १.५२ हे.आर. सामाईक क्षेत्र पैकी ४० गुंठे क्षेत्र या नोटीसीचा मुख्य विषय आहे.

वरील वर्णनाच्या मिळकतीच्या चतुःसिमा मौजे तळवडे ग्रुपग्रामपंचायत परहू हद्दीतील चतुःसिमा

पुर्वेस : स. नं. १४० ओ, बी, तळवडे ग्रामस्थांची शिल्लक जमीन.
पश्चिमेस : चिंतामण हरी दांडेकर यांची जमीन व पलिकडे विहिर व त्यापलिकडे ओहोळ
दक्षिणेस : अलिबाग पेण रस्ता व नोटीस देणार यांची मिळकत.
उत्तरेस : स.नं. १४० पैकी तळवडे गावकऱ्यांची उर्वरित जमीन व मध्येच स.नं. १३३ ची भातशेती जमीन.

वरील मिळकतीपैकी १.५२ हेक्टर अथवा १५२ गुंठे जमीन मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

२) आमचे अशीलांचा वरील वर्णनाच्या १५२ गुंठे शेती मिळकतीपैकी ४० गुंठे क्षेत्रामध्ये आंबा, चिकू, फळझाडे, यांची लागवड आहे आणि सन १९९८ पासून ते आजतागायत सन २०२५ पर्यंत सलगरित्या विनाअडथळा ताबा आहे. तसेच वरी ४० गुंठे अथवा १ एकर क्षेत्रामध्ये आमचे अशीलांचा गॅरेज आणि पुर्वीपासून हॉटेलचा व्यवसाय देखील सुरु आहे.

३) वरील वर्णनाच्या मिळकतीमध्ये (१५२ गुंठे पैकी ४० गुंठे) ४० गुंठे क्षेत्रात सलगरित्या विनाअडथळा ताबा, कबजा, वहिवाट वापर आहे आणि याबाबत सातबारा दप्तरी नांव असणारे १) गंगाधर श्रीपाद काणे, रा. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, २) उत्तम हरिश्चंद्र पाटील, रा. चरी (रायदे), पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड, ३) एकनाथ मगन लखन (मयत) तर्फे वारस ३/१) सरोजिनी एकनाथ लखन, रा. सिध्दार्थ नगर, बुध्द विहार जवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, ३/२) शारदा मनोज गोयर, रा. सिध्दार्थ नगर, बुध्द विहार जवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, ३/३) राणी राजेश गोयर, रा. सिध्दार्थ नगर, बुध्द विहार जवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, ३/४) दिपाली रवि गोयर, रा. सिध्दार्थ नगर, बुध्द बिहार जवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड., ३/५) रुपेश एकनाथ लखन, रा. सिध्दार्थ नगर, बुध्द विहार जवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, ४) चिंतामणी हरि दांडेकर (मयत) तर्फे वारस, ४/१) अनिल चिंतामण दांडेकर, रा. दांडेकर ॲटो पार्टस, शेतकरी भवन समोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, ४/२) कविता शरद जगे, रा. जगे राईस मिल, बाजारपेठ, रा. मु.पो. ता. अलिबाग, जि. रायगड, ५) शौकत इस्माईल परदेशी (मयत) तर्फे वारस ५/१) रंजना सुभाष उर्फ शौकत परदेशी, रा. स्नेह अपार्टमेंट, आयसीआयसीआय बँकेसमोर, अलिबाग, ता, अलिबाग, जि. रायगड, ५/२) प्रियदर्शनी निरज मंधान, रा. स्नेह अपार्टमेंट, आयसीआयसीआय बँकेसमोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे नावावर सध्या आहे. परंतु वरील इसम वरील मिळकतीचे कायदेशीर मालक नाहीत आणि त्यांचे वरील मिळकतीशी कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत.

४) वरील मिळकती संदर्भात परशुराम नागेश दांडेकर आणि वरील १) गंगाधर श्रीपाद काणे, २) उत्तम हरिश्चंद्र पाटील, ३) एकनाथ मगन लखन (मयत) तर्फे वारस ३/१) सरोजिनी एकनाथ लखन, ३/२) शारदा मनोज गोयर, ३/३) राणी राजेश गोयर, ३/४) दिपाली रवि गोयर, ३/५) रुपेश एकनाथ लखन,

४) चिंतामणी हरि दांडेकर (मयत) तर्फे वारस, ४/१) अनिल चिंतामण दांडेकर, ४/२) कविता शरद जगे, ५) शौकत इस्माईल परदेशी (मयत) तर्फे वारस ५/१) रंजना सुभाष उर्फ शौकत परदेशी, ५/२) प्रियदर्शनी निरज मंधान यांचेमध्ये खरेदीखत दस्त क्र. २८१/१९८३ हा झालेला असून वरील इसम परशुराम नागेश दांडेकर हे शेतकरी नसल्यामुळे वरील मिळकत त्यांचे नावावर महसुल दप्तरी झालेली नाही आणि सरकार दरबारी झालेली नाही. अशी वस्तुस्थिती असताना म्हणजेच वरील सर्व व्यक्ती परशुराम नागेश दांडेकर आणि वरील १) गंगाधर श्रीपाद काणे, २) उत्तम हरिश्चंद्र पाटील, ३) एकनाथ मगन लखन (मयत) तर्फे वारस ३/१) सरोजिनी एकनाथ लखन, ३/२) शारदा मनोज गोयर, ३/३) राणी राजेश गोयर, ३/४) दिपाली रवि गोयर, ३/५) रुपेश एकनाथ लखन, ४) चिंतामणी हरि दांडेकर (मयत) तर्फे वारस, ४/१) अनिल चिंतामण दांडेकर, ४/२) कविता शरद जगे, ५) शौकत इस्माईल परदेशी (मयत) तर्फे वारस ५/१) रंजना सुभाष उर्फ शौकत परदेशी, ५/२) प्रियदर्शनी निरज मंधान आमचे अशीलांचे अपरोक्ष त्रयस्थ व्यक्तींना विकण्याच्या तयारीत आहेत आणि त्यांची तशी बोलणी देखील सुरु आहेत असे आमचे अशीलांना गावातील खात्रीशीर सुत्रांकडून समजलेले आहे.

५) आमचे अशीलांचे वरील मिळकतीमध्ये कायदेशीर हक्क व हितसंबंध असताना ही मिळकत आमचे अशीलांचे अपरोक्ष इतर कोणीही खरेदी केल्यास ते प्रामाणिक खरेदीदार राहणार नाहीत. तसेच आमचे अशीलांचे अपरोक्ष अन्य कोणीही वरील मिळकती संदर्भात खरेदीखत केल्यास विक्रीखत केल्यास अथवा अन्य मार्गाने हस्तांतरण केल्यास तो व्यवहार आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तसेच वरील मिळकती संदर्भात आमचे अशीलांची ताबा, कब्जा, वहिवाट, वापर, हक्कहितसंबंध याची माहिती जनतेस व्हावी व विकत घेणाऱ्याची दिशाभुल तसेच फसगत होऊ नये याकरिता आमचे अशील श्री. राजेंद्रनाथ सदाशिव पाटील हे ही नोटीस प्रसिद्ध करत आहेत. तसेच आमचे अशील वरील मिळकती संदर्भात हक्क प्रस्थापनेकरिता आणि मनाई हुकूमाकरिता वरील इसमांविरुद्ध स्पेशल सिव्हील सुट दाखल करणार आहेत याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहिर नोटीस आहे. कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक २६.१२.२०२५

सही /-
**ॲड. अजय उपाध्ये.**
श्रीनिल सोसायटी, तळमजला,
श्री गणपतीचे देवळाजवळ, ब्राह्मण आळी,
अलिबाग रायगड. ९८५०५७०९७७

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

प्रधान मुख्य अभियंता, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, खालील कामांसाठी पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-टेंडरिंगद्वारे एकल बोली प्रणालीमध्ये खुली निविदा मागवित आहेत.

**क्र. सं.: 1. कामाचे नाव:** कर्नाटक राज्यात वरिष्ठ प्रादेशिक अभियंता, कारवार यांच्या कार्यक्षेत्रातील एसईएन/उडुपी विभागामध्ये कि.मी. 556/600 ते 739/760 दरम्यान चिन्हित भागांमध्ये 52 किग्रा, 260 मीटर रेल पॅनल्ससह 70 ट्रॅक कि.मी. (टीकेएम) लांबीसाठी रेल नूतनीकरणाचे काम. **निविदा सूचना क्र.: केआर-डब्ल्यू-1-58-2025-24. अंदाजे खर्च**: रु.5,10,16,201/- जीएसटी वगळून. **पूर्व बोली बैठकीची तारीख व वेळ**: 06.01.2026 रोजी 15:00 वाजता. **समापन तारीख/समय**: 23.01.2026 पर्यंत 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन ऑफर/बिड जमा करण्यासाठी. **पूर्ण होण्याची अवधि**: पावसाळा वगळता चार महिने.

**क्र. सं.: 2. कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यात वरिष्ठ प्रादेशिक अभियंता, रत्नागिरी क्षेत्रातील कि.मी. 0/800 ते 378/100 दरम्यान चिन्हित भागांमध्ये 52 किग्रा, 260 मीटर रेल पॅनल्ससह 26 ट्रॅक कि.मी. (टीकेएम) लांबीसाठी रेल नूतनीकरणाचे काम. **निविदा सूचना क्र.: केआर-डब्ल्यू-1-58-2025-25. अंदाजे खर्च**: रु.1,89,69,104/- जीएसटी वगळून. **पूर्व बोली बैठकीची तारीख व वेळ**: 06.01.2026 रोजी 15:00 वाजता. **समापन तारीख/समय**: 23.01.2026 पर्यंत 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन ऑफर/बिड जमा करण्यासाठी. **पूर्ण होण्याची अवधि**: पावसाळा वगळता तीन महिने.

मॅन्युअल ऑफर स्वीकार केले जाणार नाहीत. तपशील / सहभागासाठी कृपया **https://ireps.gov.in** वेबसाइटला भेट द्या. शुद्धिपत्र / परिशिष्ट फक्त या वेबसाइटवर होस्ट केले जातील.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १८/३ | एकूण क्षेत्र ३-०१-०० हे.आर.<br>या पैकी विक्री क्षेत्र १-००-०० हे.आर | ०.६९ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ०४/०१/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं. १४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण.जि.रायगड पिन नं. ४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चई, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १५/४/ब/१ | एकूण क्षेत्र १-५८-०० हे.आर.<br>या पैकी विक्री क्षेत्र ०-८०-०० हे.आर | १.१२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पाच दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ०४/०१/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण.जि.रायगड पिन नं. ४०२१०७

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **कुरुळ ता. अलिबाग येथे** दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- **बोअरवेल, विहीरीसाठी** इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन म्हात्रे - ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- **शुभमूर्हूत विवाह मंडळ** अलिबाग शाखेत सर्वजातीय प्रथमद्वितीय वधूवरांची नावनोंदणीसाठी ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- **प्रथम, पुर्नविवाह** सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा, पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- **बागायती वाडी विक्री** -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २६ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- **श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण,** नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग
- **मंगल ग्रेन स्टोअर्स,** बाजारपेठ, अलिबागमध्ये packing व Delivery साठी मूल मुली पाहिजेत. Contact No : 7875990092

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९० / २२२७६१**

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : खेळाडू, कलाकारांना उत्तम संधी लाभतील. नोकरीत अडचणी येतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.
- **वृषभ** : जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. संसारात जोडीदाराचं मनाजोगं सहकार्य राहील. बाकी चिंता नसावी.
- **मिथुन** : आजचा दिवस अत्यंत व्यस्त राहील. किंमती वस्तुंची काळजी घ्यावी. प्रेम प्रकरणात यश लाभेल.
- **कर्क** : धनलाभाचे योग आहेत. कामाचा व्याप वाढता राहील. गैरसमज दूर झाल्यानं ताण-तणाव दूर होईल.
- **सिंह** : मौजमजेवर खर्च करू शकाल. कार्यक्षेत्रात उत्तम फलप्राप्ती होईल. वरिष्ठांची मर्जी राखायला हवी.
- **कन्या** : प्रेम प्रकरणात सुसंवाद साधता येईल. आजची कामं आजच पूर्ण करा. आत्मविश्वास वाढीस लागेल.
- **तूळ** : कार्यक्षेत्रात कामाचा ताण वाढेल. अनपेक्षितपणे पाहुण्यांच्या भेटी होतील. आर्थिक समस्या सुटतील.
- **वृश्चिक** : मुलाखतीत चांगलं यश मिळेल. हितचिंतकांच्या सल्ल्याकडे लक्ष द्या. वैवाहिक सौख्य प्राप्त होईल.
- **धनु** : आनंदाच्या क्षणांची अनुभूती मिळेल. कामावर वरिष्ठ खूष होतील. नवे करार विचारपूर्वक व्हायला हवे.
- **मकर** : वरिष्ठांकडून कामाचं कौतुक होईल. स्वत:साठी वेळ काढून आत्मचिंतन करा. सुखद वार्ता समजेल.
- **कुंभ** : गुंतवणूक लाभदायक ठरेल. वैयक्तिक मार्गदर्शनातून प्रगती साधता येईल. निष्काळजीपणा टाळावा.ह्न
- **मीन** : मानसिक ताण-तणाव वाढेल. रिकाच्या वेळेचा सदुपयोग करावा. जोडीदाराचं सहकार्य लाभेल.

## ४ जानेवारी

दिनविशेष

१८०९ : अंधांसाठीच्या ब्रेललिपीचा संशोधक लुई ब्रेल यांचा जन्म.
१९१४ : साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या इंदिरा संत यांचा जन्म.
१९२५ : हिंदी आणि बंगाली अभिनेते प्रदीप कुमार यांचा जन्म.
१९४८ : ब्रिटिशांच्या ताब्यातून ब्रह्मदेश मुक्त.
१९९४ : हिंदी चित्रपट संगीतकार राहूल देवबर्मन यांचं निधन.
२०१० : जगातील सर्वात उंच इमारतींपैकी एक असणाऱ्या दुबईतील बुर्ज खलिफाचं उद्घाटन.

## अतिसाराचा त्रास?

आरोग्यमंत्र

जुलाब वा अतिसार शरीरातलं चैतन्य हिरावून घेणारा त्रास असून त्यावर वेळीच उपचार घेणं गरजेचं आहे. अतिसारमध्ये वारंवार पातळ शौचास होते. अतिसाराला डायरिया, हगवण लागणे किंवा जुलाब होणे असेही म्हणतात. वारंवार शौचास होणे, पोटात दुखणे अशी याची लक्षणे असतात.

अतिसाराचा त्रास वाढल्यास शरीरातील पाणी कमी झाल्याने डिहायड्रेशनचा धोकाही संभवतो. आता यामागील कारणं जाणून घेऊ या.



अपचन झाल्यामुळे, उघड्यावरील दूषित आहार आणि दूषित पाण्यामुळे, बॅक्टरीयांच्या इन्फेक्शनमुळे अर्थात ई. कोलाई, सेलमोनेला, शिगेला, क्लोस्ट्रीडियम किंवा कॉलरा (विब्रियो कॉलेरी) जिवाणूंमुळे अतिसार होऊ शकतो. विषाणू संक्रमानामुळे म्हणजेच रोटावायरस, नोरोवायरस, एन्टेरोवायरस आणि हिपॅटायटीस व्हायरसमुळेही अतिसार होऊ शकतो. त्याचबरोबर पोटातील कृमी वा जंतामुळेही अतिसाराचा त्रास संभवतो. कॉलरा, टायफॉईड, आमांश, डाईवर्टिकुलर डिजीज, इरिटेबल बोवेल सिंड्रोम अशा आतड्यासंबंधित विविध आजारामुळे, तसेच काही औषधांच्या साईड इफेक्ट्समुळे जुलाब आणि अतिसार होऊ शकतो. त्यामुळेच अतिसाराचं शोधणं गरजेचं ठरतं. त्यानुसार उपचार दिले जातात.

## मोबाईल कव्हर वापरताय?

स्मार्ट नॉलेज

छोट्यांनो, बाजारात वेगवेगळ्या रंगांची, आकर्षक डिझाइन्सची मोबाईल कव्हर्स मिळतात. कव्हरमुळे मोबाईल सुरक्षित राहतो असं वाटत असलं तरी प्रत्यक्षात काही प्रकारच्या कव्हर्समुळे तो खराबही होऊ शकतो.

रबराची कव्हर्स मजबूत आणि टिकाऊअसली तरी यामुळे फोन गरम होण्याची शक्यता असते. उष्णतेमुळे रबराचं कव्हर घातलेल्या फोनचा स्फोटही होऊ शकतो. त्यामुळे असं कव्हर लगेच काढून टाका. लेदरचं कव्हरही टाळा. या प्रकारची बरीचशी कव्हर्स प्लास्टिकपासून बनवली जातात. पण त्यांच्यामुळेही फोन गरम होतो. सतत सुरू असल्यामुळे फोनमधून उष्णता बाहेर पडते. लेदरच्या कव्हरमधून ती बाहेर पडू शकत नाही. यामुळे फोन खराब होऊ शकतो. आता पर्याय उरतो तो मेटल कव्हर्सचा. या कव्हर्समुळे फोनची उष्णता वाढत नसली तरी ती वॉटरप्रूफ नसतात. पाण्याच्या संपर्कामुळे त्यांना गंज चढू शकतो. ती लवकर खराब होतात. मेटल कव्हरमुळे स्मार्टफोनला स्क्रॅचेस पडू शकतात. फोन पडला तर कव्हर्स तुटण्याची शक्यताही असते. त्यामुळे कोणतंही ट्रेंडी कव्हर घेण्याआधी विचार करा. मोबाईल खराब होणार नसेल तरच कव्हर वापरा.

## मस्ट हॅव ॲप्स

व्हा टेक्नोसॅव्ही

स्मार्टफोनमधली विविध ॲप्स आपलं आयुष्य सुकर करत असतात. आरोग्य, सुरक्षा, मनी मॅनेजमेंट, पालकत्त्व याबाबतची ॲप्स तुम्ही डाउनलोड करू शकता. अशाच काही ॲप्सविषयी...

* मासिक पाळी हा महिलांच्या आरोग्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा मुद्दा. मासिक पाळीशी संबंधित समस्या जाणून घेण्यासाठी तसंच त्यावर लक्ष ठेवण्यासाठी पिरिएड्स ट्रॅकर ॲप्स आहेत. * गरोदर महिलांना प्रत्येक गोष्टीची खूप उत्सुकता असते. या काळात कोणती काळजी घ्यायची, इंजेक्शन्सच्या वेळा कोणत्या, बाळाची प्रगती नीट होत आहे ना या सर्व प्रश्नांची उत्तर गरोदर महिलांसाठी तयार करण्यात आलेली ॲप्स देऊ शकतील. अशा ॲप्सच्या माध्यमातून डॉक्टरांच्या संपर्कात राहता येईल. * महिलांच्या सुरक्षेसाठी विविध ॲप्सची निर्मिती करण्यात आली. रात्रीच्या वेळी किंवा एकटीने प्रवास करताना अडचणी येऊ नये यासाठी सुरक्षेशी संबंधित ॲप्स तुम्ही डाउनलोड करू शकता. * सहलीच्या योजना आखण्याच्या कामात ॲप्सची खूप मदत होते. ठिकाणाची माहिती मिळवण्यापासून विमान, ट्रेनची तिकिटं बुक करण्यापर्यंत प्रत्येक गोष्ट ॲपवर होऊ शकते.

## पंचांग

**रविवार, ४ जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
पौष कृ. १, चंद्रराशी : मिथुन,
नक्षत्र : पुनर्वसु, योग : वैधृति,
सूर्योदय ६.५४, सूर्यास्त ५.४३

## फॉरवर्डस

**अल्फाज़ सारे रद्दी हैं,**

**अगर सुनने वाला कबाड़ी जैसा हो!**

## इन्स्टंट कुकिंग

दोस्तांनो घाईगडबडीच्या वेळी किंवा चवीत बदल म्हणून स्वत:च्या हातांनी काहीतरी करून खावं असं वाटतं. अशा वेळी काय करायचं हा प्रश्न पडतो. त्यासाठी ओटमील बाऊलचा पर्याय आहे. यासाठी एक कप ओट्स, एक कप पाणी, दालचिनीचा छोटा तुकडा, चवीनुसार मीठ, एक कप दूध, उपलब्ध फळं, अक्रोड, दोन चमचे बटर असं साहित्य घ्या. एका भांड्यात ओट्स, पाणी, दूध, मीठ आणि दालचिनी घाला. हे भांडं मंद आचेवर गॅसवर ठेवा. सतत हलवत राहा. मिश्रण घट्ट झालं की गॅस बंद करा. फळं, अक्रोड, बटर हे पदार्थ त्यात घाला. हलवून घ्या. गरम गरम खा.

## स्वयंरोजगाराची वाट

समुपदेशन

दोस्तांनो, आजकाल चांगलं शिक्षण घेऊनही तुटपुंज्या पगाराची नोकरी स्वीकारावी लागते, असं अनेकांबाबत घडतं. म्हणून तरुणाईने स्वयंरोजगाराकडे वळायला हवं. स्वत:चा व्यवसाय सुरू करायला हवा. न घाबरता पुढे जायला हवं. आज अनेक उद्योग चांगलं उत्पन्न मिळवून देऊ शकतात. उत्पन्नाच्या अशा काही पर्यायांविषयी...



तुमच्या अंगी पाककला असेल, एखादा पदार्थ बनवता येत असेल किंवा व्यवस्थापन कौशल्य असेल तर स्वत:चा कॅफे किंवा छोटेखानी रेस्टॉरंट सुरू करता येईल. चांगले खाद्यपदार्थ मिळणाऱ्या रेस्टॉरंटमध्ये खवय्यांची गर्दी झाल्याचं चित्र नेहमीच पहायला मिळतं. शहर मोठं असो किंवा छोटं, खाण्याचे दर्दी सगळीकडे असतात. त्यामुळे तुम्ही कॅफे सुरू करू शकता. यासाठी लागणारी जागा भाड्याने घेता येईल. न्याहरीचे काही पदार्थ आणि चहा एवढे पदार्थ ठेवले तरी चांगलं उत्पन्न मिळवू शकता. विविध फूड जॉईंट्स फ्रँचायझी देतात. ती घेऊन उद्योगाचा पाया रचू शकता. आईस्क्रीम पार्लर हा सुद्धा चांगला पर्याय आहे. आईस्क्रीम खाणाऱ्यांची कमतरता नाही. त्यामुळे तुमचा व्यवसाय अगदी चांगला चालेल. सध्या विविध कंपन्या वैविध्यपूर्ण आईस्क्रीम्स तयार करतात. या कंपन्यांची फ्रँचायझी घेता येईल. या क्षेत्राचा अनुभव मिळाला की पुढे मोठी भरारी घेता येईल. मात्र यासाठी न घाबरता पाऊल पुढे टाकायला हवं.

## खेचाखेची

### फायदा

तुम्ही आपले म्हणून सांगतो...

दिवसभर फोन हातात असल्याचा एक फायदा आहे

.
.
.
.
.
.

फोन हरवत नाही

## वेगळं काही

ऑस्ट्रेलियामध्ये कुनुनूर्रा वादळाने धुमाकूळ घातल्यानंतर सर्वच सुरक्षित स्थळी जाण्याची धडपड करत होते. त्यावेळी एका अजगराच्या पाठीवर बसून जाणारे बारा बेडूक चर्चेचा विषय ठरले. स्थानिक नागरिक अँड्रू मॉक यांनी या वरातीचा फोटो ट्विटरवर शेअर केला आणि तो सगळीकडे व्हायरल झाला. ११ फूट लांब अजगराच्या पाठीवरून हे बेडूक शेताच्या पलीकडे जायला निघाले होते. मॉक यांच्याच शेतातली ही घटना आहे. रात्री दीडच्या सुमारास जोरदार वादळ आणि पावसामुळे मॉक झोपेतून जागे झाले. त्यावेळी बाहेर पुरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. शेताची अवस्था पाहण्यासाठी बाहेर आलेल्या मॉकना हे दृष्य दिसलं आणि त्यांनी हा नजारा कॅमेऱ्यात बंदिस्त केला.

## वेळेच्या बचतीसाठी...

जाणून घ्या

सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या जमान्यात विविध ॲप्सचे लाभ विचारात घेण्याजोगे आहेत. त्याद्वारे अगदी फाईल ट्रान्सफर करण्यापासून डाटा बॅकअप घेण्यापर्यंतची कामं एका क्लिकवर होऊ शकतात. अशा काही ॲप्समुळे तुमची बरीच कामं अगदी झटपट होतील. वेळेची बचत करणाऱ्या या ॲप्सविषयी...



✲ 'इन्स्ट लाईफ' या मोबाईल गेममध्ये शूटिंग किंवा रेसिंगसारखं काही नाही. आयुष्यातल्या कोणत्याही टप्प्यावरील अडचण सोडवण्यासाठी याची मदत होईल.

✲ 'स्नॅपसीड' हे फोटोग्राफी ॲप डाउनलोड केल्यावर फोनमधला कोणताही फोटो एडिट करू शकता. सोशल मीडियावर शेअर करण्यासाठी इमेजचा आकार कमी करता येतो. यात इतर बदल करण्याची सोयही आहे.

✲ ई मेलच्या इनबॉक्समध्ये बरेच प्रमोशनल आणि स्पॅम मेल येऊन पडतात. या मेल्सच्या गर्दीत महत्त्वाचे मेल्स सापडत नाहीत. अशा वेळी 'टेम्प मेल' हे ॲप इनबॉक्समधले नको असणारे मेल्स डिलिट करतं. टेम्प मेल्समुळे इनबॉक्स कायम क्लीन राहील. इतकंच नाही तर हे ॲप फिशिंग ई मेल्स तसंच स्पॅमर्सपासून तुमच्या ई मेलला सुरक्षित ठेवतं.

## सुडोकू ५०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | ३ | | ८ | | |
| | ४ | | ९ | | | | | |
| ३ | | | २ | | ८ | | | ४ |
| ८ | | | ७ | | | ५ | ४ | |
| | १ | ४ | | ५ | | ७ | ८ | |
| | ५ | ७ | | | १ | | | ३ |
| ७ | | | ६ | | ३ | | | ९ |
| | | | | | ९ | | २ | |
| | | २ | | ४ | | | | ८ |

टीप -

✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ४९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९ | ८ | ३ | ५ | ७ | ४ | ६ | २ |
| ७ | ३ | ६ | १ | ४ | २ | ५ | ९ | ८ |
| ४ | ५ | २ | ६ | ८ | ९ | १ | ७ | ३ |
| ९ | ७ | ३ | ५ | ६ | १ | २ | ८ | ४ |
| ८ | २ | ५ | ७ | ९ | ४ | ६ | ३ | १ |
| ६ | १ | ४ | ८ | २ | ३ | ९ | ५ | ७ |
| ३ | ४ | १ | ९ | ७ | ६ | ८ | २ | ५ |
| २ | ८ | ९ | ४ | ३ | ५ | ७ | १ | ६ |
| ५ | ६ | ७ | २ | १ | ८ | ३ | ४ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ५०



**आडवे शब्द :-**
१)चंद्र
३) आयातकर घेण्याची जागा
७)एक पालेभाजी,सांभाळणारा
१०)इजा,खून
११)ढगाळ आकाश
१३) प्रहार,दिन
१४)गावभर भटकणारी
१५)एकाग्र नजर १
६)मुलगी किंवा मुलगा १
७)हाताने गोळा न होऊ शकणारा पदार्थ
१८) अभिप्राय
१९)गुरांचा घोळका
२०)मोठी जाड सुई
२१)वर्तमानपत्रातील कप्पा
२३)वाळवी,उणीव
२५)उपवन
२७) परदेश
२९)चेहे-यावरील तेज
३०)फुरसत
३१)नरम
३२)स्तुती करणारा
३३)वयस्कर वर
३५)आंदोलन,झोका
३६)शहर
३८)** बत्ता
३९)छोटी वक्रता
४०)स्वच्छ
४२)वाईट होवो या अर्थी वापरला जाणारा शब्द
४३)केसांची बट
४४)सडपातळ
४६)सिलोन राष्ट्राचे सध्याचे नाव
४८)निवडणूकद्वारे मिळणारा लोकांचा कल
५१)गाईचा कान,एक फूल
५२)शंकराचे देऊळ
५५)भडीमार
५६) कारस्थानी
५९)व्रत
६०)राजवाडा
६१)पादत्राण
६२)तसराळे .

**उभे शब्द:-**
१)सोपे
२)सोनचाफा
३)जन्मदात्री
४)कर्णेंद्रिय
५)बारसे
६) वेळ,कालावधी
८) सत्ता
९)लाकूड कापण्याचे हत्यार
१०)नगरपाल
१२) ** ** ** *** *** नाठाळाचे माथी हाणू काठी सं. तुकारामांच्या अभंगातील एक चरण
१५) स्नानाचे पात्र (इं.).
१७)युद्धासाठी उतावीळ झालेला
१८) मज्जाव,बंदी
१९)दफनभूमी
२२) हिंदीत जर
२४)फुरसत
२६) किल्ला,डोंगर
२७)शुभ्र,पांढरा
२८) किरकोळ सामान
३०)सूट
३३)जीवाला लागलेली काळजी
३४)बोटाच्या टोकावरील आवरण
३५) हड्डी
३७)पक्ष्यांचा राजा,वैनतेय
३९)पूर्वज
४०)टरफल
४१)देशी दारू
४४)शंकराचे एक नाव
४५)संपूर्ण
४७) कावळा
४८) *** गोटा--तीव्र रेचक
४९)घोषणा (हिं.)
५०)मोठा गाडा
५३)पातळ खांब
५४)मृत्युदेवता
५७)पंख
५८)शिजविलेले तांदूळ-- जेवण्यातील एक पदार्थ.

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# प्राण्यांनाही भावभावना असतात?

**मांजर, कुत्रे पाळण्याचा ट्रेंड सध्या अनेक ठिकाणी पहावयास मिळत आहे. मोकाट कुत्र्यांनाही सांभाळण्याचा आनंद अनेकजण घेत असतात. मात्र, काही मंडळी या कुत्र्यांसह मांजरावर हल्ला करून त्यांना जखमी करण्याचा प्रयत्न करतात. परंतु, त्यांनाही भावना असतात याची जाणीव काहींना नसल्याचे अनेकवेळा दिसून येत आहे. मदतीबरोबरच मैत्रीचे नाते जपण्याचे काम हे पाळीव प्राणी नक्कीच करतात याचे भान कायमच असणे गरजेचे आहे.**

अंकुश शिंगाडे



प्राण्यांनाही भावभावना असतात का? हा एक संशोधनाचा विषय. तसं पाहिल्यास आजची मंडळी ही याबाबत विचारच करीत नाहीत. विचार करीत नाहीत की त्यांना भावभावना असतात. तसं पाहिल्यास आज त्याबद्दल विचार करायला आपल्याजवळ वेळच नाही. अन् त्याबाबत कोणी विचारही करीत नाही.

प्राण्यांनाही भावभावना असतातच. कधी कुत्री आपल्याला मदत करीत असतात तर कधी मांजरी आपलं मनोरंजन करीत असतात. कधी घोडे आपली मदत करीत असतात तर कधी गाढवही मदत करीत असतांना माणसांना. कोंबडे सकाळी उठविण्याचे काम करतात तर मेंढी व बकरी आपल्याला लेंडी खत देते. गाय दूध देते तर बैल शेतीकामात मदत करते. तरीही आपण त्यांचे उपकार विसरुन त्यांना कापून खातो. कारण आपण उपकार विसरणारे विषभोगी आहोत. उपकार जाणणारे अमृतभोगी नाही.

प्राण्यांनाही भावभावना असतातच. याबाबतीत एक प्रसंग सांगतोय. एका व्यक्तीनं एक मांजर टाळली होती. त्यानं एकदा एका मांजरीला धाक दाखवला. तेव्हा त्या मांजरीला राग आला व तिनं त्याच्या गाडीची शिट फाडली. त्या मांजरीनं एवढंच केलं नाही तर तिला त्याचा एवढा राग आला की ती त्याच्या घरात येत नव्हती. बराच वेळ ती बाहेर राहिली. त्यानंतर ती घरात आली, तेही भीत भीतच. अन् ती घरात आली. तेव्हा ना दोन दिवस ती सोप्यावर झोपली ना ती अंथरुणावर झोपली.

एक पाळलेली मांजर. जी एका व्यक्तीची लाडाची. जी अंथरुणावर झोपत होती त्यांच्या. जी सोप्यावर झोपत होती त्यांच्या. जी अन्न खात होती पुरेसं. म्याव म्याव करुन दूध मागत होती दररोज. तिनं मांजरीनं दोन दिवस अन्नही खाल्लं नाही आणि दूधही मागितलं नाही.

एक मांजर, जी मुकं जनावर आहे व आपण तिला मुकंच जनावर समजतो. तीच मांजर. तीच मांजर एक दिवस जेवत नाही. तिला राग आल्यासारखा ती गाडीचं शिटकव्हर फाडते. ती घरात येत नाही बराच वेळ. जी झोपत नाही अंथरुणावर, सोप्यावर. यावरुन आपल्याला प्रत्यय येतो. प्रत्यय येतो की मांजर हा मुका प्राणी असूनही त्यालाही भाव भावना आहेतच. अशाच भावभावना इतर प्राण्यांना नसाव्यात काय? याबाबतीत विचार करतांना एक आणखी प्रसंग सांगतोय. या प्रसंगात त्या एका गावातील प्रसंग सांगतोय. वर्धा जिल्ह्यातील ते एक गाव. गावात माकडं भरपूर आहेत व त्या गावातील माकडं शेता-तील रस्त्यातून घरी येतांना लोकांना पकडतात व त्यांच्या कानशिलात दोन चार झापडा मारतात. एकदा तर एका माकडानं एका महिलेच्या छातीवर बसून तिच्या कानशिलात मारलं होतं. ज्यातून तिला दुखापत झाली होती व तिला जवळच असलेल्या वर्धेतील सेवाग्राम रुग्णालयात भरती केलं होतं. कारण दुखापतीनं ती घाबरली होती.

आपण जेव्हा समुहात असतो आणि समुहात आपण प्राण्यांची छेड काढत असतो. तेव्हा हे प्राणी आपला कुत्रा पकडून ठेवतात. ज्याची परिणती ते प्राणी आपण एकटे असल्यास आपल्याला झापड मारुन काढतात.

प्राणी आपल्याला संकटातून वाचवतातही. ते आपल्याला समजून येत नाही. एखाद्यावेळेस एखाद्या प्रवासात आपण असलो तर एखादा प्राणी मधातच रस्त्यावर येतो व आपली गाडी अडवतो. त्यामुळंच काही वेळ आपल्याला थांबावं लागतं. आपल्याला आपल्या मार्गात अचानक आलेल्या अशा प्राण्यांचा राग येतो. परंतु नंतर आपल्याला कळतं की पुढे आपल्याला अपघात होणार होता. जेव्हा एखादा अपघात झालेला दिसतो वा एखादं झाड पडलेलं दिसतं. कधी भुस्खलन झालेलं दिसतं व वाटतं की बरं झालं ते प्राणी मधात आलं व आपण थांबलो. नाहीतर या अपघातात आपणही गेलो असतो. कदाचीत ते झाड पडण्याची वेळ वा भुस्खलन होण्याची वेळ व आपली गाडी जाण्याची वेळ ही सारखीच असते. ते त्या प्राण्यांना माहीत असतं. परंतु आपले कर्म चांगले असतात. म्हणूनच आपण वाचतो. अनेक प्राण्यांबाबतचे अनुभव. अनेक प्रसंगात आपल्याला येत असतात. कधी वाटत असतं की हे प्राणी बरोबर नाही. त्यांचा राग येत असतो आपल्याला. परंतु त्या प्राण्यांचा जेव्हा उपयोग आपल्याला कळतो. तेव्हा मात्र त्या प्राण्यांबाबत आपल्यात सहानुभूती निर्माण होत असते. एक असाच प्रसंग. एक वाशीमचा मित्र. तो पेंटींगचं काम करायचा. त्याही दिवशी तो पेंटींग करीत होता. झुल्यावर होता. तेव्हा अचानक एका कावळ्यानं त्याचेवर हल्ला केला व त्याच्या आक्रमणापासून स्वतः ला वाचविण्यासाठी तो सज्जावर उतरला. डोळे कुस्करून कावळ्याचा प्रतिकार करण्यासाठी सज्ज झाला. तोच झुला तुटून खाली पडला व त्याला कळलं की त्या कावळ्यानं त्याचेवर हमला करुन सज्जावर उतरण्यास भाग पाडलं होतं. म्हणूनच त्याचा जीव वाचला. त्यानं मनोमन कावळ्याचे उपकार मानले. आता तो पक्षी प्रेमी व प्राणी प्रेमी बनलेला आहे व तो दर उन्हाळ्यात सर्वच पक्षीच नाही तर प्राण्यांसाठीही आपल्या स्वखर्चातून वाशीममध्ये पाण्याची सोय करतो. एक असाच प्रसंग. फेसबुकवर आलेला व्हिडिओ. बिचारी गाय एका मुलाला तोंडात पकडून ओढत नेते. सुरुवातीला तिचा राग येतो आपल्याला, ती करीत असलेल्या कृत्याचा. परंतु नंतर भिंत पडते. तेव्हा कळतं की तिनं केलेलं कृत्य बरोबर होतं. बिचाऱ्या गाईनं बाळाला वाचवलं.

प्राण्यांच्या उपकाराबाबत सांगतांना प्राणी आपल्या बऱ्याच उपयोगाचे आहेत. परंतु आपण त्यांचे महत्व जाणून घेत नाही. फक्त स्वार्थासाठीच तेवढा आपण धापर करतो. प्राणी आपल्या उपयोगाचे आहेत. हे पुराणही सांगतं. हल्दिघाटच्या लढाईत महाराणा प्रतापच्या कामात येणारा चेतक, तसाच झाशीची राणी लक्ष्मीबाईच्या कामात येणारा अश्व, तसाच रामायणातील सीतेला वाचविणारा जटायू. ही त्या प्राण्यांची उदाहरणं आहेत की ज्यांनी आपल्या मैत्रीसाठी वा धन्यासाठी आपल्या प्राणाची बाजी लावली. आजही आपल्याला आपली गाय दूध देवून मदत करते. बैल शेतात अंगमेहनत करुन आपल्या कामास येतो. कुत्रा घराची राखण करतो. अन् बिभट्या जरी दिसला तरी तो न घाबरता आपल्या प्राणाची बाजी लावतो. परंतु आपल्या धन्याला काही होवू देत नाही. प्राणी आपलं मरण पत्करतात. परंतु आपल्याला क्षती पोहोचू देत नाहीत.

आज आपल्याला माहीतही आहे की प्राणी माणसांपेक्षाही इमानदार व कर्तव्यदक्ष आहेत. परंतु आपली मानसिकता तशा स्वरुपाची नाही. आपली मानसिकता त्यांना कर्तव्यदक्ष मानत नाही आणि आपण फक्त त्यांचा स्वार्थासाठीच वापर करतोय. आपला स्वार्थ संपला की आपण त्या प्राण्यांना विसरतो. जसं गाय भाकड होताच तिचे दूध देणे उपकार विसरुन तिला कसाबाला विकणे. बैल म्हातारा होताच त्याचा आपल्याला उपयोग नाही. हा विचार करुन त्याला कसाबाला विकणे. कुत्रा पिसाळला. म्हणून त्याचा उपचार न करता त्याला जंगलात नेवून सोडणे.

आपली ही कृती समर्थनीय नाही. कारण आपल्याला जो मदत करतो, त्याचे उपकार विसरणं म्हणजे आपला स्वार्थीपणाचा कळसच झाला. हे असंच वागणं असल्यानं आता प्राणीही आपला बदला घेवू लागले आहेत. त्यांनाही समजलं आहे की माणूस स्वार्थी आहे व हा स्वार्थी माणूस आपली मदत पुर्ण झाल्यावर आपल्यालाच कसाबाला विकतात. कोणी आपल्यालाच कापून आपल्याच मांसावर ताव मारतात. जसे कोंबडे पहाटेला बाक देवून आपल्याला उठवत आपल्याला शुद्ध ऑक्सिजन अर्थात ओझोन वायूचा फायदा मिळवून देतात. तरीही आपण ते उपकार न मानता त्यांनाच कापून त्यांच्याच मांसावर ताव मारतो. तेव्हा ते बदला घेण्यासाठी गावाकडे व गावातून शहराकडे येत आहेत. कधी ऐकायला मिळतं की गाईनं शिंग मारलं म्हणून दवाखान्यात गेला. कधी म्हटलं जातं की बिबट्या वा वाघ परीसरात सुटलाय. कधी म्हटलं जातं की माकडानं हमला करुन जखमी केलं. ज्यातून भरती करावं लागलं तर कधी म्हटलं जातं की कातीचा कोंबडा उडाला व त्यानं लोकांवर हमला करुन कितीतरी लोकांना जखमी केलं. तसंच कितीतरी प्रसंगात साप चावून माणसं मेल्याचीही उदाहरणे आहेत.

आज कधी कुत्री हमले करतात तर कधी मांजरीसारखी प्रजातीही हमला करते माणसांवर. कारण ते प्राणी मुकी जनावरं असली तरी त्यांनाही भावभावना आहेत की ज्यातून ते आता तशा स्वरुपानं वागू लागले आहेत माणसांसोबत. माणसांना अक्कल यावी म्हणून. आता पाहू या माणसांना भविष्यात किती अक्कल येते ते. जर अक्कल आली व माणसं सुधारली की पावलं असं म्हणता येईल. नाहीतर प्राणीही हमले नक्कीच करत राहणार यात शंका नाही. तेव्हा माणसानं सुधरावं. हिंसा करु नये. तसाच प्राण्यांचा स्वार्थासाठी ते उपयोग करु लागले तरी त्यांनी केलेले उपकार आपण विसरु नये म्हणजे झालं. कारण प्राण्यांनाही भावभावना असतात हे तेवढंच खरं आहे. **

# 'सांडव ज्वेलर्स'ची यशोगाथा

धनंजय शेटये



माणुसकीच्या पुण्याईतून फुललेलं सोन्याचं लेणं... आज मुंबईच्या विशाल महानगरात आणि तिच्या उपनगरात 'सांडव ज्वेलर्स' हे केवळ एक दुकान नाही, तर ते विश्वास, सचोटी आणि पितृप्रेमाच्या पुण्याईने सिद्ध झालेला एक दिमाखदार ब्रॅण्ड आहे. या ब्रॅण्डच्या अनेक तेजस्वी शाखा आज तळपताना दिसतात. पण या सुवर्ण-रोपट्याचे बीज ज्यांनी रुजवले, त्या नववी नापास असलेल्या सांडव बंधूंची ही यशोगाथा म्हणजे शून्यातून विश्व उभे करणाऱ्या त्यांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचा आणि पितृप्रेमी निष्ठेचा एक अनोखा अध्याय आहे.

कोकणातील अतिशय दुर्गम, डोंगराळ भूभागावर वसलेल्या भटवाडी-पोईप या लाल मातीच्या गावातून मुंबईच्या चकचकाट्यापर्यंतचा हा प्रवास खडतर संघर्षाची आणि अखंड परिश्रमाची गाथा आहे, जी प्रत्येकाने वाचावी.

**शिक्षणापलिकडील यश, संस्कारांची शिदोरी आणि धैर्याचे भांडवल**

कधीकधी उच्च शिक्षणाच्या भव्य पदव्यांपेक्षा, तुटपुंज्या जुजबी शिक्षणाच्या सोबतीने असलेले आपले प्रेमळ, मनमिळाऊ बोलणे आणि माणुसकीचे वागणे यशाचे शिखर अधिक वेगाने सर करू शकते. गरज असते ती फक्त अखंड धैर्याची, कामाप्रती प्रचंड मेहनत करण्याची तयारी, निस्सीम प्रामाणिकपणाची आणि स्वतःच्या कर्तृत्वावरील अढळ विश्वासाची! हीच संस्कारांची शिदोरी घेऊन कै. दत्ताराम काशिराम सांडव यांच्या मायेच्या आणि शिस्तीच्या छायेत वाढलेल्या या भावांची कहाणी म्हणजे लाखो तरुणांसाठी एक प्रेरणादायी दीपस्तंभ आहे.

**भटववाडी-पोईप ते मुंबई : खडतर जीवनाचा आरंभ**

देऊ दत्ताराम सांडव, काशिराम दत्ताराम सांडव, सदाशिव सांडव आणि संतोष सांडव ही चार बंधू आणि सोबत दोन बहिणी उषा आणि सरीता, असा हा मोठा परिवार! घरात कमावणारे हात तुलनेने कमी आणि खाणारी मुखे जास्त, अशी परिस्थिती. वडील कै. दत्ताराम काशिराम सांडव आणि माता कै.सौ. सुमित्रा दत्ताराम सांडव यांनी मोलमजुरी करून संसाराचा गाडा हाकला. पितृछत्र लवकर हरपल्यामुळे कै. दत्ताराम यांनी त्यांच्या चुलत्यांच्या संस्कारात राहून, एकत्र कुटुंब पद्धतीचा धागा शेवटपर्यंत जपला. त्यांचे वडिलोपार्जित काम लाकूड चिरकाम होते.गावोगावी लाकूड चिरकाम करुन ते संसाराचा उदरनिर्वाह करत होते. त्यांची धर्मपत्नी

कै.सौ. सुमित्रा दत्ताराम सांडव यांची खंबीर साथ त्यांना लाभली. या हिंमतवान धर्मपत्नीने अनेक संकटांना सामोरे जात, कुटुंबाला प्रेमाचा गारवा दिला. त्या शेतीत राब राब राबल्या. खोल विहिरीवर असलेली 'लाट' ओढून शेतीला पाणी देऊन शेतमळे पिकवले. खरंतर 'लाटीने' पाणी काढणे जिकिरीचे, पुरुषांचे काम पण ते काम या रणरागिणी मातेने कौटुंबिक जबाबदारीच्या ओझ्याखाली आपल्या पतीच्या संसारात साथ देण्यासाठी जीद्दीने केले. आपल्या कष्टाच्या बळावर संस्काराचा प्रेमरूपीमळा मेहनतीने फुलविला आणि शेतात सोनं पिकवले आणि ज्यामुळे कुटुंबाला घरचा भाजीपाला मिळाला आणि कौटुंबिक खर्चाला हातभार लाभला.

**मुंबईची वाट- नववी नापास पण कष्टाने पास!**

सर्वात मोठे चिरंजीव देऊ दत्ताराम सांडव. शाळेत जाण्यासाठी ५-६ किलोमीटर घनदाट जंगलातून पायपीट करावी लागे, जिथे हिंस्त्र पशूंचे भय होते. यामुळे देऊ जेमतेम नववीपर्यंत पोहोचले आणि नापास झाले. शिक्षणापेक्षा त्यांनी वडिलांना लाकूड चिरकामात मदत करायला सुरुवात केली. कष्टाला कधीच डगमगले नाहीत. अर्धी मजुरी मिळत असली तरी, प्रचंड मेहनतीचे लाकडाचे ओंडके उचलण्याचे काम त्यांनी कधीही डगमगून न जाता केले.

बालपणापासूनच अठरा विश्व दारिद्र्याच्या चटक्यांनी त्यांच्या जीवनाला कष्टमय जीवनाची सवय लावली होती. पण पितृप्रेमी देऊ कधीही वडिलांची माणुसकी आणि प्रामाणिकपणाची शिकवण विसरले नाहीत. तोच प्रामाणिकपणा हीच त्यांची सर्वात मोठी कमाई ठरली.

एकदा परळ येथील ख्यातनाम 'श्रद्धा ज्वेलर्स'चे मालक फणसगावकर गावी आले असताना दत्ताराम सांडव यांनी त्यांच्याजवळ धाव घेतली आणि आपल्या मोठ्या मुलाला, देऊला, मुंबईत नोकरी देण्याची विनंती केली. नातेवाईकांच्या आश्रयाला राहून श्री.देऊ सांडव हे श्री. फणसगावकर यांच्या सराफा दुकानात 'जे सांगतील ते' काम इमानेइतबारे करू लागले.परिस्थितीचे फटके आणि द्रारिद्याचे चटके यामुळे कोणतेही कष्टाचे काम करताना त्यांना कधी लाज वाटली नाही. कमीपणा वाटला नाही. मेहनत हेच सर्वस्व मानणारे होते. हळूहळू कारागीरांकडून कला शिकू लागले.

**भावंडांची साथ, राम-लक्ष्मणाची जोड!**

देऊ यांचे मन आपल्या कुटुंबासाठी तळमळत होते. आपल्या आई-वडिलांना तुटपुंज्या कमाईत मदत करणे त्यांना गरजेचे वाटले. याच विचारातून त्यांनी सर्वात धाकटा भाऊ संतोष सांडव यांना आपल्यासोबत मुंबईत आणले. शाळेत घालण्याचा विचार होता, पण संतोषही नववीत नापास झाले. मग तेही 'श्रद्धा ज्वेलर्स'मध्ये काम करू लागले. फणसगावकर हे खरंच सहृदयी देवमाणूस ठरले, कारण त्यांनीच या दोन्ही भावांना मुंबईत पहिला आधार दिला.

देऊ, काशिराम, सदा, संतोष हे बंधू म्हणजे जणू रामायणातील राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न याच भावंडांचे आधुनिक रूप! त्यांची ही अखंड एकी आणि गुण्यागोविंदाने नांदणे, याचे एकमेव कारण म्हणजे कै. दत्ताराम सांडव यांच्या संस्कारांची भक्कम बैठक.

**'सांडव ज्वेलर्स' चा उदय यशाचा सुवर्ण-कलश**

नववी नापास असलेल्या देऊ दत्ताराम सांडव यांनी मग मात्र कधीच मागे वळून पाहिले नाही. प्रचंड कष्ट करण्याची तयारी, सत्याचा मार्ग आणि नवनवीन शिकण्याची उमेद यामुळे ते मुंबईसारख्या शहरात आपले स्वतःचे असे भक्कम स्थान निर्माण करू शकले. धाकटे बंधू संतोष सांडव यांनी त्यांना तितकीच मोलाची साथ दिली.

अनेक वर्षे सराफाच्या दुकानात काम करून कला शिकल्यावर, या दोन नववी नापास भावंडांनी स्वतंत्र व्यवसायात उतरण्याचे धाडस केले. भांडुपमध्ये 'सांडव ज्वेलर्स' या नावाने त्यांनी आपली पहिली सोन्याची पेढी सुरू केली. हे एक भव्य स्वप्न होते, पण त्यात मोठी जोखीमही होती.

या हिंमतवान सांडव बंधूंनी आपल्या मनमिळाऊ स्वभावाने, प्रेमळ जिव्हाळ्याने आणि माणुसकीच्या राजमंत्राने व्यवसायात पाय रोवले. 'ग्राहक हेच दैवत' मानले आणि बघता बघता त्यांच्या व्यवसायाचा उत्कर्ष होऊ लागला.आज मुंबईसारख्या विशालकाय नगरीत 'सांडव ज्वेलर्स' हा एक प्रतिष्ठित ब्रॅण्ड आहे, ज्याच्या भांडुप, डोंबिवली, दिवा अशा ठिकाणी मुंबई शहरात आणि उपनगरात अनेक शाखा आहेत. विनम्रतेचा वारसा, पाय जमिनीवर, दृष्टी आकाशात या दोन नववी नापास भावांनी जगाला हे दाखवून दिले की, जर तुमच्याकडे प्रामाणिकपणा, प्रचंड कष्ट करण्याची तयारी, आत्मविश्वास, माधुर्यपूर्ण बोलणं आणि माणसं जोडण्याची कला असेल, तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही. एवढा मोठा व्याप सांभाळूनही श्री. देऊ दत्ताराम सांडव हे न चुकता दरवर्षी आपल्या मातीशी जोडलेले राहण्यासाठी गावी शेती करण्यासाठी जातात. मोठेपणाचा गर्व नसलेली, पण यशाचे सर्वोच्च शिखर गाठलेले असूनही पाय जमिनीवर असणारी ही तेजस्वी व्यक्तिमत्त्वे म्हणजे खऱ्या अर्थाने सांडव बंधू होत! काशिराम आणि सदानंद सांडव यांनी गावात राहून घर, शेती, परंपरा आणि संस्कृती जपण्याची जबाबदारी समर्थपणे निभावली. सण-उत्सव, कौटुंबिक रितीरिवाज आणि एकत्र कुटुंब पद्धतीची मूल्यं त्यांनी अखंड जपली. आणि कौटुंबिक रितीरिवाजांचे संवर्धन करून या दोन बंधूंनी सांडव परिवारातील एकीची वज्रमूठ कायम ठेवली आहे. तरुण पिढीसाठी धडा 'सांडव ज्वेलर्स'ची ही कहाणी सांगते की, यश मिळवण्यासाठी केवळ पदव्यांची गरज नसते; तर प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम आणि भावंडांची एकी असेल, तर शून्यातूनही सुवर्ण साम्राज्य उभं करता येतं. मातीशी नातं जपणारा हा 'विश्वासाचा सुवर्णप्रवास' आजच्या पिढीसाठी खऱ्या अर्थाने दीपस्तंभ ठरणारा आहे. **

# व्हेज की नॉनव्हेज काय योग्य

निलेश साठे





**अन्न हे पूर्णब्रह्म असे कायमच बोलले जाते. मात्र, शाकाहार व मांसाहाराचा आस्वाद घेण्याची प्रत्येकाची एक वेगळी पसंती आहे. त्यामुळे प्रत्येक वेळेला कोणतेही पदार्थ खायचे हे प्रत्येकाने ठरवणे गरजेचे आहे.**

शाकाहार चांगला की मांसाहार याबद्दल समाजामध्ये नेहमीच वेगवेगळी मत पाहायला मिळतात. वास्तविक हा प्रश्न कधीही कोणाला पडू नये कारण शाकाहार आणि मांसाहार ही अन्न साखळीची निसर्गानेच केलेली संरचना आहे. कोणी म्हणते शाकाहार चांगला तर कोणी म्हणते शरीरामध्ये ऊर्जा आणि ताकत निर्मिती करायची असेल तर मांसाहार करावाच लागेल. आपण जे ग्रहण करू जे आपण खात असतो त्याच्यावर आपले विचार बनतात असे कित्येकांचे मत आहे. शाकाहारी म्हणजे शुद्ध सात्विक जेवण घेतलं तर आपले विचार शुद्ध निर्मळ आणि चांगले बनतील. आणि मांसाहार केला तर आपल्यातील तमोगुण वाढतील. आणि आपली प्रवृत्ती चिडखोर भांडखोर आणि हिंसक होईल असेही काहींचे मत असते. अर्थात हे प्रत्येकाचे आपापले मत आहे. कोणी काय खावे हे कोणीही कुणाला किंवा इतरांना सांगू शकत नाही. हा ज्याचा त्याचा स्वतःचा प्रश्न आहे.

फक्त शाकाहारच करा किंवा मांसाहारच करा हे आपलं मत कोणीही कोणावर जबरदस्तीने लादू शकत नाही. तसे पाहायला गेले तर मनुष्याच्या उत्पत्ती पासूनच मनुष्य मांसाहार करत आलेला आहे. जस जसा काळ बदलत गेला सुविधा निर्माण झाल्या तसतशी लोकांची आवड बदलू लागली. त्यामुळे मग शाकाहारी ही संकल्पना उदयास आली. ज्यांना मांसाहार नाही आवडत ते शुद्ध शाकाहारी झाले. आणि जे मांसाहार करत आहेत ते तर मग करतच आहेत. ते मांसाहारी आणि शाकाहारी या दोन्ही तत्त्वांमध्ये बसतात.

खरंतर शाकाहार अतिशय उत्तम. तेच खरे चांगले अन्न मानले जाते. जेवढं आपण सात्विक खाऊ तेवढे आपल्या विचार सात्विक होतील. पण म्हणून मांसाहार करणाऱ्याचा आपण तिरस्कार करु शकत नाही . कारण मांसाहार करणाऱ्यांनी मांस खाणे बंद केले तर काहीच वर्षात जनावरांची संख्या इतकी,वाढेल की जनावरं माणसांना खाऊ लागतील. त्यामुळेच शाकाहारी मांसाहारी प्रकृतीने केलेली ही एक सुंदर रचनाच म्हणावी लागेल. प्रत्येकाची आवड आणि निवड वेगवेगळी आहे. कोणाला शुद्ध शाकाहार आवडतो तर कोणाला मांसाहार जास्त प्रमाणात आवडतो.

प्रत्येकांने स्वतः ठरवायचे आपल्याला शाकाहार करायचा आहे की मांसाहार करायचा आहे. मीही थोड्याफार प्रमाणात मांसाहार करतो. पण मला स्वतःला शुद्ध शाकाहारी जेवण आवडते. त्यातही वरण-भात चपाती भजी हे माझ्या आवडीचं जेवण आहे. दर गुरुवारी आणि मंगळवारी हे जेवण आमच्याकडे बनतेच बनते. त्यातही मेथीची भाजी असेल तर जेवणाची मजाच वेगळी. मला जर कोणी रोज मेथीची भाजी करून देईल तर माझी संपूर्ण इस्टेट त्याच्या नावाने करून देईल असे मी माझ्या बायकोला उपहासाने म्हणतो.

अर्थात बायकोला माहित आहे माझ्याकडे काय इस्टेट आहे. जिभेचे चोचले पुरवण्यापेक्षा जगण्यासाठी जेवढं आवश्यक आहे ते आणि तेवढेच ग्रहण केलेलं कधीही चांगलंच. त्यामुळे मांसाहार की शाकाहार या फंदात न पडता आपल्या शरीरासाठी जे आवश्यक आहे जे आपल्या पचनी पडते ते अवश्य खाल्लं जावं. म्हणजेच पचेल रुचेल ते खावं. स्वस्थ खा मस्त रहा. हे नवीन वर्षच नव्हे तर आयुष्यातील प्रत्येक दिवस एन्जॉय करा. सर्व खाद्यप्रेमींना नूतन वर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा. हे संपूर्ण नवीन वर्ष तुम्हाला सर्वांना सुख समृद्धी आणि भरभराटीचे जावो. तसेच प्रत्येकाला उत्तम आरोग्य मिळावे हीच आई भवानी चरणी प्रार्थना. **

# ग्रंथालयातील पुस्तकांचे शत्रू, निगा, काळजी व व्यवस्थापन



संजय बोंदार्डे

ग्रंथ केवळ वापरामुळेच खराब होतात असे नाही; उलटपक्षी, वारंवार वापरात न येणारे ग्रंथही अनेक कारणांमुळे नष्ट होऊ शकतात. आग, प्रखर प्रकाश, तीव्र उष्णता, दमट हवा, दूषित वातावरण, धूळ, केरकचरा, पाणी तसेच उंदीर, घुशी, झुरळे, मुंग्या, बुरशी, कसर, वाळवी इत्यादींमुळे ग्रंथांना मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. म्हणून या सर्व शत्रूविरुद्ध योग्य प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहे.

**आग व उष्णतेपासून संरक्षण**

ग्रंथालयात धूम्रपान, मेणबत्ती, पणती, कंदील, गॅसचा दिवा अशा उघड्या ज्वालांच्या वापरास सक्त मनाई असते. तरीही अपघाताचा संभव असल्याने ग्रंथालयात अग्निशामक यंत्रे, वाळू व पाण्याने भरलेल्या बादल्या नेहमी सज्ज ठेवणे आवश्यक आहे. खिडक्यांमधून कपाटांवर सतत प्रखर सूर्यप्रकाश पडल्यास उष्णता वाढते व ग्रंथांच्या बांधणीवर विपरीत परिणाम होतो. पाने वाकडी होतात, रंग फिकट पडतो व कागद ठिसूळ बनतो. म्हणून कपाटांची रचना करताना थेट सूर्यप्रकाश पडणार नाही याची काळजी घ्यावी.

**पावसाळा, दमटपणा व बुरशी**

पावसाळ्यात खिडक्यांतून पाणी शिरल्यास ग्रंथ भिजतात व बांधणी खराब होते. ओलसर वातावरणात बुरशी वाढते व ग्रंथांना कुबट वास येतो. म्हणून कपाटे भिंतींपासून थोडी दूर ठेवावीत, खिडक्या बंद ठेवाव्यात व गरज असल्यास विद्युत दिव्यांद्वारे ओलसरपणा कमी करावा. कपाटे साबणाच्या पाण्याने व नंतर स्वच्छ गरम पाण्याने पुसून कोरड्या कापडाने स्वच्छ करावीत. अधूनमधून कपाटांची दारे उघडी ठेवून हवा खेळती ठेवावी. नॅपथलीन किंवा पॅराडायक्लोरोबेन्झीनच्या गोळ्या ठेवल्यास बुरशी व कीटकांचा प्रादुर्भाव कमी होतो.

**धूळ व दूषित हवा**

ग्रंथालय रस्त्यालगत किंवा तळमजल्यावर असल्यास धूळ अधिक प्रमाणात साचते. उघड्या कपाटातील ग्रंथांवर धूळ बसू नये म्हणून नियमित स्वच्छता करावी. शक्य असल्यास धूळ शोषक यंत्रांचा वापर करावा. कारखाने, गिरण्या किंवा समुद्रकिनाऱ्याजवळील ग्रंथालयात दूषित व खारट हवेमुळे ग्रंथांची हानी होते. यासाठी दारे-खिडक्या बंद ठेवणे, निर्गमन पंखे किंवा वातानुकूलन व्यवस्था करणे उपयुक्त ठरते.

**कीटक व वाळवी**

दमटपणा, धूळ व गच्च भरलेली कपाटे यामुळे कसर व इतर कीटक वाढतात. कीटकांनी छिद्रे पडलेले ग्रंथ तात्काळ वेगळे काढून उन्हात वाळवावेत व योग्य कीटकनाशक उपचार करावेत.

वाळवी हा ग्रंथांचा सर्वात मोठा शत्रू आहे. ती जमिनीतून येऊन लाकडी कपाटे व ग्रंथ नष्ट करते. शक्य असल्यास लोखंडी कपाटांचा वापर करावा. लाकडी कपाटांच्या पायाखाली डांबर किंवा क्रिओसोल ठेवावे व संशयास्पद ठिकाणी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

**उंदीर व झुरळे**

ग्रंथालयाजवळ उपाहारगृह असल्यास उंदीर-घुशींचा उपद्रव वाढतो. ग्रंथालयात खाण्यापिण्यास मनाई ठेवावी व स्वच्छता राखावी. झुरळांपासून बचावासाठी नॅपथलीनच्या गोळ्या व कीटकनाशक द्रव्यांचा वापर करावा.

**दुर्मिळ ग्रंथ व हस्तलिखिते**

हस्तलिखिते व दुर्मिळ ग्रंथ हे ग्रंथालयाचे



अमूल्य ठेवे आहेत. योग्य पुठ्ठे, कापड व लोखंडी कपाटांत सुरक्षित साठवण करावी. त्यांची छायाचित्रे, मायक्रोफिल्म किंवा झेरॉक्स प्रती तयार करून वापरासाठी उपलब्ध करून द्याव्यात.

**ग्रंथांची निगा व काळजी कशी घ्यावी**

पुस्तके स्वच्छ हातांनी हाताळावीत.

वाचताना खाण्यापिण्याचे पदार्थ दूर ठेवावेत. पानांची घडी न करता बुकमार्क वापरावेत. नवीन पुस्तकांना प्लास्टिक किंवा कागदी कव्हर घालावे.

**पुस्तके थेट सूर्यप्रकाशात ठेवू नयेत.**

कपाटात पुस्तके गच्च भरू नयेत; उभी व विषयानुसार लावावीत. दर ३-४ महिन्यांनी पुस्तके उन्हात दाखवावीत.

**कपाटे व शेल्फ नियमित स्वच्छ करावीत.**

पुस्तकांवर रेघा मारणे, रंगवणे टाळावे.

पुस्तक ओले झाल्यास पंख्याखाली वाळवावे; कापडाने पुसू नये. लहान मुलांसाठी ''बुक ॲब्युलन्स'' (पुस्तक दुरुस्ती पेटी) उपयुक्त ठरते. **

## जागरुक करणारा..

# त्रिकोण

पुस्तक परीक्षण

प्रा. शाम जोगळेकर

त्रिकोण, ही ॲड. विलास कृष्णाजी नाईक यांची खूनखटल्यावरील कादंबरी, संवेदना प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केली आहे. या पुस्तकाला गझलकार आणि साहित्यिक ए.के.शेख यांची, सविस्तर प्रस्तावना लाभली आहे. लेखक ॲड. विलास नाईक यांचा परिचय शेख यांनी सुरुवातीला करून दिला आहे. नंतर त्यांनी या कादंबरीची गुणवैशिष्ट्ये उलगडली आहेत. लेखक कोर्टातील प्रक्रिया उलगडताना, त्या प्रक्रियेमागील भावविश्व, मानसिक तणाव, सामाजिक दबाव यांची सखोल उकल करतो. 'त्रिकोण' फक्त तीन कोनांची आकृती दर्शवत नाही, तर गुन्हेगार, बळीत आणि यंत्रणा यांचे एकत्रित आणि गुंतागुंतीचे नाते दाखवते. एखाद्या गुन्ह्यामागे फक्त अपराध नसतो, तर सामाजिक परिस्थिती, मानसिक ताण, नात्यांमधील विसंवाद आणि अपुरे संवाद यांचा जटिल गोफ असतो, तो या कादंबरीत अनुभवायला मिळतो. 'भूमिका' मध्ये ॲड. विलास नाईक यांनी आपले मनोगत मांडले आहे. वकील मंडळी, सरकारी वकील, न्यायाधीश आणि पक्षकार हे कोर्टाचे चार आधारस्तंभ आहेत. या कादंबरीच्या वाचनामुळे हे आधारस्तंभ विचारप्रवृत्त होतील, अशी विलास नाईक यांची अपेक्षा आहे. या कादंबरीचे रंगीत, समर्पक मुखपृष्ठ हुसेन अन्वर यांचे आहे.

कोरोना काळ संपताना ही खुनाची घटना घडलेली आहे. धारावी झोपडपट्टीला लागून असलेल्या, शहाजहान या बहुमजली सोसायटीत प्रामुख्याने मुसलमानांची वस्ती आहे. तेथे नजमा आणि तिची मुलगी फातिमा यांचा खून झाला आहे. सायरा ही तिची मोठी मुलगी, त्यावेळी तेथे नसल्याने वाचली आहे. तिचा नवरा सोहेल आणि त्याची चुलत बहीण आणि प्रेयसी मुमताज यांना पोलिसांनी आरोपी केले आहे. सोहेलची मुंबईत शिक्षिका म्हणून नोकरी करणारी बहीण, जहिरा, ही आपल्या भावाला तुरुंगातून आणि खुनाच्या आरोपातून सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. मुंबईत येण्यापूर्वी त्यांचे पूर्वज जबलपूरजवळील एका गावात शेती करून राहत होते.

गरिबीमुळे आणि वाट्याला फारशी जमीन येणार नसल्यामुळे, तिच्या आजोबांचे कुटुंब कधीतरी, कोणाबरोबर मुंबईत आले होते. धारावीच्या झोपडपट्टीत राहत होते. सोहेलने त्याच्या बायकोला आणि धाकट्या मुलीला कापून टाकले आणि नंतर त्याची मैत्रीण, प्रेयसी आणि चुलत बहीण असणाऱ्या मुमताजनेच घरात जाऊन प्रेते जाळली आणि पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. अशी ही केस. त्या घटनेनंतर घरची परिस्थिती अडचणीची बनली होती. इतर प्रकरणात एकसंध असणारा




मुस्लिम समाज, नंतर या प्रकरणापासून हात राखून, लांबून फक्त तमाशा बघत होता. जणु काही त्या कुटुंबाला वाळीत टाकले गेले होते. सहानुभूती सर्व सोहेलच्या पत्नीच्या, नजमाच्या आई-वडिलांकडे जात होती. पोलिसांनी विविध प्रकारे पुरावे गोळा केले. त्यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला गेला. नंतर ही केस कोर्टामध्ये मांडली गेली. सरकारी वकील, महाजन यांनी कोर्टात सर्व साक्षीपुरावे मांडले. ॲड.मोहिते यांनी आपल्या वकिली कौशल्याने सोहेलची बाजू उत्तम प्रकारे कोर्टामध्ये मांडली. मुमताजचे वकील शेख यांना त्यामुळे पुढे निकाल काय लागणार याची कल्पना आली. खुनाच्या रात्री नेमके काय घडले, हे सांगायला कोणी स्वतंत्र साक्षीदार नव्हता. घटना घडली, त्यावेळी मृत्यूच्या वेळी, प्रेते जाळली तेव्हा सोहेल तिथे नव्हता हे सिद्ध करण्याचा प्रयत्न यशस्वीपणे मोहिते वकिलांनी केला. परिणामी सोहेलची या खटल्यातून निर्दोष मुक्तता झाली होती. त्याने मुंबई सोडली होती आणि तो कायमचा सुरतला निघून गेला होता. त्यानंतर सोहेलची बहीण जहिरा म्हणते, ''आमच्या आयुष्यातील काळी रात्र संपली होती. आम्ही आता माणूस म्हणून जगायचं शिकत होतो. सोहेल दूर गेला, नाती तोडली, स्वार्थी झाला, ते आमच्यासाठी वरदानच ठरलं. त्याची हयात असलेली मोठी मुलगी आम्हाला पुन्हा कधी दिसली नाही. तिचं भलं व्हावं, हीच आम्ही अल्लाकडे प्रार्थना करत होतो. कोपरापासून दोन्ही हात त्या कोर्टाला, त्या पोलीस स्टेशनला, कोर्ट कचेरीला आणि सोहेललासुद्धा जोडत होतो.''

त्रिकोण, या कादंबरीच्या वाचनामुळे एखादा खून घडल्यानंतर, पोलिस यंत्रणेकडून तपास कसा केला जातो, पुरावे कसे गोळा केले जातात, ते कोर्टामध्ये कसे मांडले जातात आणि आरोपी आणि फिर्यादी यांच्यावतीने वकिली कौशल्य कसे लढविले जाते, ते या कादंबरीतून सामान्य वाचकाला समजते. तसेच या कादंबरीतील विविध पात्रे, तुरुंगातील सोहेल याची मानसिक अवस्था, त्याच्या नातेवाईकांची आर्थिक परिस्थिती आणि तणावग्रस्त मानसिक अवस्था या सर्वांचे दर्शन होते. विविध पातळ्यांवरील वकील वर्गाची अवस्था ॲड. सुधीर कांबळे यांच्या निवेदनातून स्पष्ट होते आहे. जहिरा यांच्या निवेदनातून कादंबरी उलगडत जाते. त्यांच्या आर्थिक, सामाजिक प्रश्नांचीही जाणीव वाचकाला होते. ही कादंबरी वाचून सर्वसामान्य वाचकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. हेच या कादंबरीचे यश आहे. ॲड. विलास नाईक यांनी ही कादंबरी लिहून अनेक गोष्टी वाचकांसमोर उघड केल्या आहेत. त्यामुळे वाचक अंतर्मुख होतो. विशेष सरकारी वकील, ॲड. प्रदीप घरत यांची या पुस्तकावरील प्रतिक्रिया मलपुष्टावर, ॲड. विलास नाईक यांच्या रंगीत छायाचित्रासह वाचावयास मिळते. ॲड. विलास नाईक यांचा सविस्तर परिचय पुस्तकात दिला आहे. **

**पुस्तकाचे नाव : त्रिकोण**
**लेखक : ॲड. विलास नाईक**
**प्रकाशक : संवेदना प्रकाशन, पुणे-३३. ९७६५५५९३२२**
**प्रथमावृत्ती : ३ नोव्हेंबर २०२५**
**पृष्ठे: १२८, मूल्य : रु.२००/-**

# अंमलबजावणीत अडथळे आहेतच

वर्ष सरताना

**गेल्या काळात आपण किती पुढे आलो, हे पाहिले जाते. धांडोळा घेतला जातो. त्या अर्थाने महिलांविषयक प्रश्न, त्यांच्या संरक्षणार्थ केलेले कायदे आणि सामाजिक जाणिवांमधील बदलांकडे पाहिले तर, आपण फार मोठी मजल मारली नसल्याचे चित्र समोर येते. आजही महिलांवरील अत्याचार, बालविवाहाचे प्रमाण, महिला आणि मुलींचे शोषण कमी झालेले नाही. कायद्यांच्या अंमलबजावणीत आपण अजूनही मागे आहोत.**



रंजना गवांदे

बदलत्या काळासरशी महिलाविषयक प्रश्नांचे स्वरुप आणि गांभीर्यही बदलत आहे. हे प्रश्न अधिकाधिक जटील होत असून चार भिंतींबरोबरच समाजातही स्त्री सुरक्षित नसल्याचे चित्र आता नवीन राहिलेले नाही. खरेतर तिच्या सर्व प्रकारच्या संरक्षणासाठी कायद्यांची कमतरता नाही. मात्र हे कायदे सर्वांपर्यंत पोहोचत नाहीत, अनेक शक्ती त्याच्या अंमलबजावणीमध्ये खोडा घालण्याचा, दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करतात आणि अंतिमत: स्त्री संरक्षणार्थ उभी केलेली ही यंत्रणा तोकडी पडते हेच चित्र २०२५ मधील काही घटनांनी दाखवून दिले आहे. यातील काही ठळक घटनांचा परामर्श घेता कऱ्हाडमधील डॉक्टर संपदा मुंडे आत्महत्या प्रकरण, पुण्यातील हगवणे प्रकरण तसेच पंकजा मुंडे यांच्या सचिवाच्या पत्नीने पतीच्या अनैतिक संबंधाला कंटाळून केलेली आत्महत्या अशी अनेक उदाहरणे समोर येतात. इतरही अनेक घटना आहेत, इथे त्यांची जंत्री मांडणे शक्य नाही. मात्र त्यामध्ये अनेक महिलांचा शेवट झाला वा घडवून आणण्यात आला हेदेखील नाकारुन चालणार नाही. सरत्या वर्षाला निरोप देत २०२६ चे स्वागत करताना या प्रश्नावर साधकबाधक चर्चा करायलाच हवी.

मी ग्रामीण भागामध्ये काम करते. याच भागात राहते. रोजच्या अनुभवातून आजच्या काळात स्त्रियांकडे बघण्याचा लोकांचा दृष्टीकोन, येथील महिलांचे जीवनमान-जीवनशैली फारशी बदललेली नसल्याचे तीव्रतेने जाणवते. म्हणूनच समाजातील स्त्रियांचा दर्जा सुधारला असल्याचे विधान ढोबळमानानेही करावेसे वाटत नाही. ग्रामीण, आदिवासी, दुर्गम भागामधील महिलाविषयक प्रश्नांमध्ये फारसा फरक दिसत नसल्याचे खेदाने नमूद करावेसे वाटते. वानगीदाखल अगदी अलिकडचा व्याख्यान देते वेळी अनुभवलेला एक प्रसंग सांगते. माझे बोलणे संपल्यावर एक तरुण उभा राहिला. त्याला आजूबाजूच्या लोकांनी खुणा करुन बोलण्यास उभे केल्याचे दिसत होते. त्याच्या प्रश्नाचा रोख बायकांचेच इतके लाड का होतात, त्यांच्यासाठीच इतके कायदे का आहेत, कोर्टातही त्यांचीच बाजू का घेतली जाते, त्यांना प्राधान्यक्रम का दिला जातो अशा तक्रारवजा बोलण्याकडे होता. त्याच्या या चौकशीत सहजता वा कुतूहल नसून असुया, राग आणि देहबोलीतून विद्वेष व्यक्त होत होता. ही छोटीशी घटना बोलकी म्हणावी लागेल, कारण तो विचारणारा एकटा असला तरी भोवती बसलेल्या गटाचे अनुमोदनही लपत नव्हते. थोडक्यात, या सामाजिक मानसिकतेनिशी आपण २०२६ मध्ये म्हणजेच तथाकथिक प्रगत आणि आधुनिक युगात प्रवेश करत आहोत, हे विसरता कामा नये.

संविधानाच्या कलम १४, १५ वा २५ मध्ये प्रत्येक भारतीय नागरिकाला समान न्याय असल्याचे सूचित केले आहे. जात, धर्म, लिंग, पंथ असा भेदभाव न करता घटनेने प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. मात्र समाजाची मानसिकता त्याला अनुकूल नाही. मध्यंतरीच आदिवासी भागातील एक कुटुंब तक्रार घेऊन आले होते. जमिनीच्या मोठ्या खटल्यासाठी साक्षीदार म्हणून मी त्यांच्या पत्नीला बोलवायला सांगितले. तेव्हा माझ्याच ऑफिसमध्ये बसून ते महाशय म्हणाले, 'मॅडम, कशाला तिला बोलवायचे? ती काय बोलणार? बाईची अक्कल चुलीजवळ...!' थोडक्यात, आजही ७५ टक्के लोकांमध्ये ही मानसिकता आहे. ग्रामीण भागात ही टक्केवारी आणखी वाढते. याचे दाखले अनेक प्रकरणांमधून दररोज मिळत असतात. त्यातीलच एक म्हणजे, सून नांदत नसल्याची तक्रार घेऊन एक बाई आमच्याकडे आली आणि बोलण्याच्या ओघात सुनेचे चुकले तर मुलगा दोन-चार चापटी मारतो, असे सहज म्हणाली. पोरीच्या जातीने नवऱ्याचे एवढे तर सहन केलेच पाहिजे, असे म्हणत तिने तक्रारीचा पाढा तसाच सुरू ठेवला. अर्थातच ती बाई स्वत:च्या तोंडाने एका महिलेची तक्रार करत असली तरी तिचा आवाज पुरुषी वर्चस्वाने, दबावाने आणि वर्षानुवर्षांच्या पुरुषप्रधान संस्कृतीने घडवलेला होता. अशी एक ना अनेक उदाहरणे देता येतील. अशा मानसिकतेमुळेच सुरूवातीला उल्लेख केलेल्या घटना घडतात आणि अनेक कोवळ्या कळ्या उमलण्यापूर्वीच कोमेजून जातात. २०२५ मध्येही हे चित्र बदललेले नाही.

आपल्याला वाढत्या बालविवाहांचा प्रश्नही अद्यापी तडीस लावता आलेला नाही. या प्रश्नाकडे आजही हव्या त्या गांभीर्याने पाहिले जात नाही. लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराविरोधात 'पोस्को'सारखा कठोर कायदा आहे. मात्र बालविवाह हा समाजमान्य बलात्कार आहे, हे अजून समाजाला पटलेले नाही. विशेषत: भटक्या समाजामध्ये काही विशिष्ट वर्गामध्ये आजही आठ-नऊ वर्षांच्या मुली आणि १३-१४ वर्षांच्या मुलांची लग्नं लावली जातात. आमच्याकडे आठवड्यातून एकदा तरी अशी एखादी तक्रार येतेच येते. अर्थातच यामध्ये लैंगिक अत्याचार, लैंगिक शोषण मोठ्या प्रमाणावर होते. लहान वयातच लग्न लावून दिलेल्या मुलामुलींचे शिक्षण थांबते. त्यांना बालमजूर म्हणून कामाला जावे लागते. अशांमध्ये आरोग्याचे असंख्य प्रश्न निर्माण होतात. वस्तूत: आपल्याकडे बालविवाह थांबवणारा कायदा आहे. पण त्याची अंमलबजावणी हव्या त्या गांभीर्याने होताना दिसत नाही. पूर्वीपेक्षा थोडा फरक घडत असला तरी सुधारणा अत्यंत मंद गतीने होत आहे, हेदेखील विचारात घ्यावे लागेल. पूर्वी बालविवाह थांबवत असताना आम्हाला काही पत्रकारांचेच फोन यायचे आणि कशाला मध्ये पडता, असे म्हणत शहाणपण शिकवले जायचे. काही वेळा तर शासकीय अधिकारीही वेगवेगळ्या विचारणा करुन भंडावून सोडायचे. आम्हालाच लेखी तक्रार देण्यास सांगायचे. आता या मानसिकतेत थोडा बदल होत आहे. पण तरीही कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीपासून आपण दूर आहोत, हे लक्षात घ्यावे लागेल.

कार्यस्थळी होणाऱ्या लैंगिक शोषणाचा प्रश्नही बराच गंभीर आहे. २०१३ मध्ये यासंबंधीचा कायदा पारित करण्यात आला. तो अत्यंत चांगला असून याद्वारे कोणत्याही कार्यस्थळी अशा घटनांची, तक्रारींची दखल घेणारी एक समिती असावी, असे निर्देशित करण्यात आले आहे. दहापेक्षा जास्त कर्मचारीवर्ग असणाऱ्या कार्यालयांसाठी ही बाब अनिवार्य आहे. मात्र आजही अनेक ठिकाणी अशी कोणतीही समिती दिसत नाही. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे घरगुती कामे करणाऱ्या महिलांचे कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण होत असेल तर त्यांना थेट कलेक्टरच्या अध्यक्षतेखाली असणाऱ्या समितीकडे तक्रार करावी लागते. मात्र दूरच्या भागात काम करणाऱ्या महिलेचे कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण झाल्यास तिने इतके दूर कसे जायचे, हा प्रश्न उरतो. कारण, कधी कधी हे अंतर शंभर किलोमिटर वा त्यापेक्षा अधिकही असू शकते. हीदेखील कायद्यातील मोठी त्रुटी वाटते. महिलांना स्थानिक ठिकाणीच त्वरित आणि योग्य न्याय मिळायला हवा. चौकशी, साक्षीपुरावे, सुनावणी यासाठी पीडितेने इतका प्रवास करणे, वेळ व पैसा खर्च करणे योग्य वाटत नाही. म्हणूनच तातडीने ही सुधारणा होणे गरजेचे वाटते. नवीन कायदे करण्यापेक्षा महिलांच्या संदर्भातील कायद्यातील अशा छोट्या मोठ्या त्रुटी दूर केल्या तरी खूप काही साधले जाईल, असे वाटते.

वकील म्हणून काम करताना अशा अनेक बाबी जाणवतात आणि खटकतात. काही खटल्यांमध्ये मुख्य निकाल येईपर्यंत न्यायालय पीडित स्त्रीच्या चरितार्थासाठी, सुरक्षेसाठी अंतरिम आदेश देते. कायद्यानुसार चार भिंतीमध्ये आई, मुलगी, बायको, बहीण अशा कोणत्याही नात्याने एखाद्या पुरुषाबरोबर राहणारी स्त्री त्याने मानसिक, आर्थिक, शारीरिक छळ केल्यास न्यायालयात दाद मागू शकते. अशा परिस्थितीत घराबाहेर काढली गेलेली आई घराचा हिस्सा मागू शकते, पत्नी निवारा वा खर्च मागू शकते. या महिला संरक्षण वा मुलांची कस्टडी मागू शकतात. हे सगळे मूळ केसचा निकाल होईपर्यंत मिळवता येते. पण असे असले तरी केस दाखल केल्यानंतर चार-पाच वर्ष अंतरिम आदेशासाठी हिअरिंगच घेतले जात नाही. थोडक्यात, यामुळे कायद्याचा उद्देशच मागे पडतो आणि पीडितेला विना अन्न, निवारा तसेच संरक्षणविना दिवस काढावे लागतात. तिची सर्वार्थाने आबाळ होते आणि तरतुदीचा उपयोगच संपतो. काही वेळा न्यायालयाने अंतरिम आदेश देत पीडितेला मदत करण्याचे सांगितले तरी मंजूर झालेली रक्कम वसूल करण्यासाठीही तिला बराच त्रास सहन करावा लागतो. नवरा वा संबंधित लोक यावेळीही तिला प्रचंड त्रास देतात. मुद्दाम गैरहजर राहणे, कमी रक्कम देणे, पैसे टाळण्यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या वापरणे असे प्रकार सर्रास घडतात. या सगळ्यातून होणारा त्रास दूर करण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. थोडक्यात, येत्या वर्षात कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे ठरवले तरी आपण बरेच पुढे जाऊ, असे म्हणता येईल. २०२६ मध्ये हे घडेल, अशी अपेक्षा करु या. **

# निवडक



## अभुपेंद्र मार्शल आर्टचे यश

**रसायनी :** महाराष्ट्र राज्यस्तरीय इंटरस्कूल चॅम्पियनशिप २०२५ चे भव्य आयोजन दौंड (पुणे) येथे करण्यात आले होते. स्पधत २०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवून आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. मास्टर भूपेंद्र मार्शल आर्ट स्पोर्ट्स अँड फिटनेस अकॅडेमीच्या ३६ खेळाडूंनी भाग घेत यश संपादन केले. १५ सुवर्ण, १२ रौप्य व ९ कांस्यपदकांची कमाई करत एकूण ३६ पदके मिळवून द्वितीय क्रमांकाची ट्रॉफी पटकावली. विजेते खेळाडू मुली सुवर्णपदक : सम्बुद्ध कांबळे, करण सत्रे, निहार शिंदे, अवनीश सगट, राज शितोळे, अवीर बनसोडे, स्वराज इंगळे, वेदांत दत्तात्रय शेटे, यश मोरे, ध्रुव कोलतेकर. रौप्यपदक विजेते : विहान फडतरे, देवेश नवीन, ध्रुव दिघाडे, स्वराज पाटील, श्रवण पाटील, प्रमोद ठोंबरे. कांस्यपदक विजेते : अथर्व तिवारी, राजवर्धन भालेराव, ऋतुराज प्रविण ठाकूर, मंथन रोटे. मुलीं सुवर्णपदक विजेते : अविका सिंग, नित्या सावरकर, आरुषी सुतार, वृद्धी बिरादार, आयुषी माने. रौप्यपदक विजेते : काव्या सकलानी, रुत्विका जयेश नागले, स्वरा पिसाळ, स्वराली सगट, प्रेरणा भगवत देवकर, दीक्षा घाग. कांस्यपदक विजेते अक्षया बनसोडे, अन्वी मोरजकर, जिया मंगेश डोंगरे, स्नेहल आडव, अमृता मोहिते.



## महाराष्ट्राने वन डे ट्रॉफी जिंकली

**पुणे :** महाराष्ट्राने सांघिक कामगिरीच्या जोरावर बीसीसीआयच्या १९ वर्षाखालील वन डे क्रिकेटच्या किताबावर आपले नाव कोरून तमाम मराठी क्रिकेटप्रेमींना नववर्षाची गोड भेट दिली. महाराष्ट्राने गुजरातला ७ फलंदाज राखून धूळ चारली. मिशा कटारिया व प्रेरणा सावंत यांची अचूक गोलंदाजीच आघाडीच्या फळीच्या दमदार फलंदाजीच्या जोरावर महाराष्ट्राने सहज विजेतपदाला गवसणी घातली. पुण्यातील गहुंजे येथील मैदानावर महाराष्ट्राच्या पोरींनी पराक्रम केला. गुजरातकडून मिळालेले २२४ धावांचे लक्ष्य महाराष्ट्राच्या पोरींनी ३९.४ षटकांत केवळ ३ बात २२६ धावा करीत सहज पूर्ण केले. या विजयात जिया सिंग (५७) व अक्षया जाधव (नाबाद ५४) यांनी अर्धशतके झळकावली. साह्याद्री कदम (४८) व भाविका अहिरे (नाबाद ४६) यांनी आक्रमक फलंदाजी करत महाराष्ट्राच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. गुजरातकडून परमारने २, तर दिव्याने एक फलंदाज बाद केला. त्याआधी, नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना गुजरातने ४६.५ षटकांत २२३ भावसंख्या उभारली. दिव्या वर्धनी हिने ८१ धावांची खेळी केली, चार्ली सोलंकी (५६) अर्धशतक झळकाविले.



## वैजनाथ संघाचा प्रथम क्रमांक

**खांब :** रोहा तालुक्यातील देवकान्हे येथील धाकेश्वर मित्र मंडळ यांच्या वतीने यशस्वीरित्या संपन्न करण्यात आलेल्या विभागीय क्रिकेट स्पर्धेत वैजनाथ संघ चषकाचा मानकरी ठरला आहे. खांब विभाग क्रिकेट असोसिएशन व धाकेश्वर मित्र मंडळ देवकान्हेतर्फे बाहे येथील क्रीडा मैदानावर संपन्न करण्यात आलेल्या या क्रिकेट स्पर्धेत वैजनाथ संघाने अंतिम विजेतपद पटकावले व गावदेवी बाहे संघाला उपविजेतपदावर समाधान मानावे लागले. तर धाक्सूद चिल्हे संघाने स्पर्धेतील तृतीय क्रमांक पटकावले. या सामन्यात उत्कृष्ट फलंदाज पंकज सावरकर वैजनाथ उत्कृष्ट गोलंदाज, रोशन कोंडे चिल्हे मालिकावीर, रोहीत थिटे बाहे संघाने स्पर्धेतील तृतीय क्रमांक पटकावून यश संपादित केले. या सामन्यात उत्कृष्ट फलंदाज पंकज सावरकर वैजनाथ, उत्कृष्ट गोलंदाज रोशन कोंडे चिल्हे, मालिकावीर रोहीत थिटे बाहे यांना तसेच विजेत्या संघांना उपस्थित मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले.



## राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा उत्साहात

**मुंबई :** गुड मॉर्निंग स्पोर्टस् संघाने अमरहिंद मंडळ आयोजित 'स्व. उमेश शेणॉय चषक' राज्यस्तरीय कुमार कबड्डी स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. गुड मॉर्निंगचा दवेश गवळी स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. त्याला सायकल देऊन गौरविण्यात आले. दादर (प.) येथील मंडळाच्या पटांगणार सुरु असलेल्या कुमारांच्या अंतिम सामन्यात मुंबईच्या गुड मॉर्निंग स्पोर्टस्ने अतितटीच्या लढतीत पूर्वार्धातील ११-१३ अशा दोन गुणांच्या पिछाडीवरून ठाण्याच्या ग्रीफिन्स जिमचा प्रतिकार ३२-२८ असा मोडून काढत 'स्व. उमेश शेणॉय चषक' व रोख रु. तीस हजार आपल्या खात्यात जमा केले. उपविजयी संघाला चषक व रोख रु. वीस हजारवर समाधान मानावे लागले. दिवेश दळवी, सुजन दळवी यांच्या संयमी चढाया त्यांना श्रवण तिरोडकर, आदित्य धुमाळ यांची मिळालेली पकडीची साथ यामुळे हे शक्य झाले. मनीष धनावडे, आदित्य पिलाने यांचा पूर्वार्धातील चढाईचा जोश उत्तरार्धात मावळला. तर वेदान्त ढमाले, तन्मय पवार यांचा बचावदेखील दुबळा ठरला.

# विजय हजारे ट्रॉफीमध्ये शतकांचा पाऊस

## ■ भारतीय खेळाडूंच्या बॅटने केला कहर; हार्दिक-तिलक-अक्षर अष्टपैलू चमकले

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय संघाचे तीन खेळाडू २०२६ च्या टी-२० विश्वचषकासाठी सर्वात जास्त जबाबदार असतील तर हार्दिक पंड्या त्यापैकी एक आहे. विश्वचषकाच्या जवळजवळ एक महिना आधी, हार्दिक पंड्याने दाखवून दिले आहे की तो स्पर्धेसाठी तयार आहे आणि उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. या स्टार अष्टपैलू खेळाडूने विजय हजारे ट्रॉफीमध्ये याची झलक दाखवली. बडोद्यासाठी खेळताना हार्दिक पंड्याने फक्त ६८ चेंडूत स्फोटक शतक झळकावले. संकटात सापडलेल्या संघासाठी सातव्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी येत असताना, या स्टार अष्टपैलू खेळाडूने एकट्याने डाव उलटवला आणि संघाला वाचवले आहे.







भारतीय टी-२० संघाचा उपकर्णधार अक्षर पटेल हा देखील विजय हजारे ट्रॉफीचे सामने खेळत आहे. या सामन्यामध्ये त्याने कमालीचा खेळ दाखवून भारतीय क्रिकेट चाहत्यांना आनंद दिला आहे. अक्षर पटेल याने झालेल्या आंद्रप्रदेशविरुद्ध सामन्यामध्ये १११ चेंडूमध्ये १३० धावा केल्या. भारतीय टी-२० संघातील या खेळाडूंच्या कमालीच्या फार्मनंतर भारतीय क्रिकेट चाहत्यांच्या आशा उंचावल्या आहेत.

**हार्दिकची धमाकेदार खेळी**

शनिवारी, ३ जानेवारी रोजी राजकोटमधील निरंजन शाह स्टेडियमवर झालेल्या विजय हजारे ट्रॉफीच्या एलिट ग्रुप सामन्यात हार्दिक पंड्याचा विध्वंसक खेळ पाहायला मिळाला होता.

बडोदा विदर्भाविरुद्ध प्रथम फलंदाजी करत होता. तथापि, हार्दिक सातव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आला तेव्हा संघाने फक्त ७१ धावांत पाच विकेट गमावल्या होत्या. त्याने संघाचा कर्णधार आणि त्याचा मोठा भाऊ कृणाल पंड्यासोबत संघाला थोडक्यात सावरले आणि दोघांनी ६५ धावांची भागीदारी केली.

हार्दिकने त्याच्या लिस्ट 'ए' (एकदिवसीय) कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले. फक्त ६८ चेंडूत शतक पूर्ण केल्यानंतरही, हार्दिक थांबला नाही, त्याने त्याची स्फोटक फलंदाजी सुरू ठेवली. संघाला २५० च्या पुढे नेल्यानंतर तो अखेर बाद झाला. ४६ व्या षटकात बाद झालेल्या हार्दिकने फक्त ९२ चेंडूत १३३ धावांची आश्चर्यकारक खेळी केली होती.

### तिलक वर्माने ठोकले शतक

**विजय हजारे ट्रॉफीच्या या सामन्यात हैदराबादने प्रथम फलंदाजी केली. संघाची एक बाद २५ धावा असताना तिलक वर्मा तिसऱ्या क्रमांकावर आला. त्याने शतक झळकावले, ११८ चेंडूत सहा चौकार आणि तीन षटकारांसह १०९ धावा केल्या. या डावात त्याची सरासरी ९२.३७ होती. त्याच्या या खेळीमुळे प्रथम फलंदाजी करणाऱ्या हैदराबादने ५० षटकांत ९ गडी गमावून २८९ धावा केल्या. तिलक व्यतिरिक्त अभिरथ रेड्डी यांनीही ७१ धावांची शानदार खेळी केली. चंदीगडकडून जगजीत सिंग संधूने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या.**

# धनुर्विद्या स्पर्धेसाठी पाच विद्यार्थ्यांची निवड

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

रत्नागिरी जिल्हा निवड चाचणी धनुर्विद्या स्पर्धेत भाईशा घोसाळकर हायस्कूलच्या पाच विद्यार्थ्यांची राज्यसंघात निवड झाली.महाराष्ट्र राज्य धनुर्विद्या असोसिएशन आणि सोलापूर जिल्हा धनुर्विद्या असोसिएशन यांच्या सहकार्याने आयोजित १७ वी मिनी सबज्युनियर व २री कीड्स राज्यस्तरीय धनुर्विद्या अजिंक्यपद स्पर्धा लवकरच होणार आहे. या राज्यस्पर्धे साठी रत्नागिरी जिल्ह्याचा संघ निवडण्यासाठी गुरुवार (दि.१) जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन केले होते. ही स्पर्धा १०, १३ व १५ वयोगटातील मुले व मुली यांच्यात खेळवण्यात आली. ही स्पर्धा कम्पाउंड, रिकर्व्ह आणि इंडियन या प्रकारात घेतली होती. यामधून जिल्ह्याचा संघ निवडण्यात आला आहे. कडवई पंचक्रोशी शिक्षणसंस्थेच्या पाच खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्या पाचही विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी जिल्हा संघात निवड झाली आहे. त्यात साईराज सुर्वे, स्वराज चव्हाण, आर्या जोयशी, स्वरा इंजले व परिणीती कांबळे यांचा समावेश आहे.

# विश्वशांती गुरुकुलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव

## ■ सुवर्णपदक विजेत्या अर्णा पाटील यांची प्रमुख उपस्थिती

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उलवे येथील माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलचा वार्षिक क्रीडा महोत्सव अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. 'द जर्नी ऑफ नॉलेज ॲण्ड डिस्कव्हरी' या संकल्पनेवर आधारित या क्रीडा महोत्सवातून शैक्षणिक गुणवत्ता आणि क्रीडाक्षमतेचा सुरेख संगम अनुभवायला मिळाला. शालेय शिक्षणाच्या चौकटीपलीकडे जाऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा हा सोहळा उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला.



उझबेकिस्तान येथे झालेल्या १३व्या सीनियर आशियाई स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या व बहुपदक राष्ट्रीय खेळाडू अर्णा निखिल पाटील यांची या कार्यक्रमातील प्रमुख उपस्थिती उल्लेखनीय ठरली. कार्यक्रमाची सुरुवात आकाशात रंगी-बेरंगी फुगे सोडून करण्यात आली. त्यानंतर वर्षभरातील मासिक संकल्पनांवर आधारित आकर्षक थीम परेड सादर करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या कल्पक मांडणीने व रंगीबेरंगी साहित्यामुळे ही परेड विशेष लक्षवेधी ठरली.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अर्णा पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याचे व त्यांच्या प्रभवी सादरीकरणाचे विशेष कौतुक केले. खेळातूनच शिस्त, संघभावना व नेतृत्वगुण विकसित होतात, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छाही दिल्या. तर, मुख्यध्यापिका अंशू सक्सेना यांनी जिथे धैर्य, चिकाटी आणि कौशल्याचा संगम होतो असा हा खेळ व्यक्तिमत्त्व घडविण्याचे उत्तम साधन असल्याचे सांगितले.

यावेळी विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते पदके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचा समारोप नेत्रदीपक जिम्नॅस्टिक्स व कॅलिस्थेनिक्सच्या सादरीकरणाने करण्यात आला.

# राष्ट्रीय क्रीडा शासन विधेयक लागू

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

नव्या वर्षाच्या पहिल्या दिवसापासून म्हणजेच १ जानेवारी २०२६ पासून ऐतिहासिक राष्ट्रीय क्रीडा शासन अधिनियमातील काही तरतुदी लागू झाल्याची अधिसूचना केंद्र सरकारने जारी केली आहे. या कायद्याअंतर्गत देशभरातील राष्ट्रीय कीडा महासंघ तसेच इतर मान्यताप्राप्त क्रीडा संस्थांच्या कार्यपद्धतीचे नियमन करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे राष्ट्रीय क्रीडा मंडळ स्थापन करण्याचा तसेच क्रीडाविषयक वाद निवारणासाठी स्वतंत्र लवाद उभारण्याचा मार्ग मोकळा झाली आहे. केंद्र सरकारने संसदेत राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक सादर केले होते. दोन्ही सभागृहांत मंजुरीनंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या संमतीने हे विधेयक अधिनियमात रूपांतरित झाले. आज लागू झालेल्या तरतुदींमध्ये राष्ट्रीय ऑलिम्पिक समिती, राष्ट्रीय पॅरालिम्पिक समिती, राष्ट्रीय क्रीडा महासंघ आणि प्रादेशिक क्रीडा महासंघ यांच्या स्थापनेची व प्रशासनाची चौकट समाविष्ट आहे. याशिवाय मान्यताप्राप्त कीडा संस्थांसाठी अनुपालन अटी, राष्ट्रीय क्रीडा मंडळ आणि राष्ट्रीय कीड़ा न्यायाधिकरण यांच्या स्थापनेच्या तरतुदी तसेच केंद्र सरकारच्या नियम बनवण्याच्या अधिकारांचाही त्यात समावेश आहे. याशिवाय मान्यताप्राप्त क्रीडा संस्थांसाठी अनुपालन अटी, राष्ट्रीय क्रीडा मंडळ आणि राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरण यांच्या स्थापनेच्या तरतुदी तसेच केंद्र सरकारच्या नियम बनवण्याच्या अधिकारांचाही त्यात समावेश आहे.

### आंतरराष्ट्रीय सहभागावर मर्यादा

**या कायद्यानुसार, राष्ट्रीय हितासाठी निर्देश देण्याची आणि आवश्यक तेथे प्रतिबंध घालण्याची सक्ती या तरतुदीअंतर्गत केंद्र सरकारला असाधारण परिस्थितीत भारतीय संघ व वैयक्तिक खेळाडूंच्या आंतरराष्ट्रीय सहभागावर योग्य ती मर्यादा घालण्याचा अधिकार मिळणार आहे.**



# पेणची सुकन्या देशात चमकली

## ■ उमंग तांडेल हिची नॅशनल किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

**| खरोशी | प्रतिनिधी |**

भारत सरकारच्या क्रीडा मंत्रालयातर्फे ''खेलो इंडिया'' किक बॉक्सींग नॅशनल झोनल लिग २०२५-२६ या खेळात इंदोर, मध्य प्रदेश येथे नुकत्याच झालेल्या किक बॉक्सिंग स्पर्धेत महाराष्ट्र संघातून खेळणारी रायगड पेणची सुकन्या कुमारी उमंग गणेश तांडेल हिने प्रथम क्रमांकासह गोल्ड मेडल मिळवले आहे. याकामी प्रशिक्षक संतोष मोकल यांच्या मार्गदर्शनाखाली वडील गणेश तांडेल यांचे विशेष सहकार्य लाभत असल्यामुळे तिने यश संपादन केले.

तिची 'खेलो इंडिया' नॅशनल किक बॉक्सिंग चॅम्पीयनशीपसाठी निवड झाली असून, ही स्पर्धा मार्च २०२६ रोजी तामिळनाडू, चेन्नई येथे होणार आहे. 2020 सालीसुद्धा नॅशनलसाठी निवड झाली होती. ती कराटेमध्ये ब्लॅक बेल्ट असून, आतापर्यंत तिने तालुका, जिल्हा, राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांकासह सुवर्णपदक मिळवत पेण शहराचे नाव देशाच्या कानाकोपऱ्यात नेले आहे. तिच्या यशाबद्दल सर्व स्तरातून तिचे अभिनंदन होत आहे.

# गतका संघाची पदकांची लयलूट

**ठाणे :** महाराष्ट्र गतका संघाने राष्ट्रीय गतका स्पर्धेमध्ये यश मिळवत पदकांची लयलूट केली आहे. चंदीगड मोहालीमध्ये ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाने पाच रजत, तीन कांस्यपदक पटकावले. भारतातील २३ राज्यातील सहाशेहून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

# किकबॉक्सिंग स्पर्धेत महाराष्ट्र अव्वल

**| मुंबई | प्रतिनिधी |**

भारतीय क्रीडा प्राधिकरण, क्रीडा व युवा कल्याण मंत्रालय तसेच वाको इंडिया किकबॉक्सिंग फेडरेशन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित चारदिवसीय खेलो इंडिया अस्मिता पश्चिम विभागीय महिला किकबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा इंदोर पब्लिक स्कूल येथे पार पडली. या स्पर्धेत पश्चिम विभागातील मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगणा, गोवा तसेच दमण व दीव येथील गुणवंत महिला किकबॉक्सिंग खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. उत्कृष्ट व दमदार कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्र संघाने विजेतेपद पटकावत स्पर्धेत अव्वल स्थान मिळवले. महाराष्ट्र संघाकडून स्पोर्टस् किकबॉक्सिंग असोसिएशन, मुंबई शहर येथील खेळाडू अश्विनी जांबळे हिने पॉइंट फाइट - ५५ वजनी सीनियर गटात सुवर्णपदक जिंकून संघाच्या यशात मोलाची भर घातली. याशिवाय कशिस जैस्वार हिने क्रिएटिव्ह फॉर्म प्रकारात कांस्यपदक, तर प्रीशा पिल्लई हिने पॉइंट फाइट +५५ वजनी गटात कांस्यपदक पटकावत महाराष्ट्राच्या यशाची पताका उंचावली आहे.

## १५ कोटींपेक्षा अधिक तिकिटांची मागणी | आतापर्यंतच्या वर्ल्ड कप प्रेक्षकांची बेरीजही फिकी

# फिफा वर्ल्ड कपमध्ये उसळणार गर्दीचा महापूर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

फुटबॉल हा खेळ नाही, तो एक जागतिक वेडेपणा आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. पुढील वर्षी अमेरिका मेक्सिको आणि कॅनडामध्ये संयुक्तपणे होत असलेल्या फिफा वर्ल्ड कपला १५ कोटींपेक्षा अधिक तिकिटांची मागणी झाल्याची माहिती खुद्द फिफाने दिली आहे. त्यामुळे यंदाच्या फिफा वर्ल्ड कपमध्ये गर्दीचा महापूर उसळणार आणि आतापर्यंतचे तिकीट विक्रीचे, गर्दीचे सारे विक्रम मोडीत निघणार, आहे.

यंदा फिफा वर्ल्ड कपच्या तिकीट विक्रीला न भूतो न भविष्यति असा प्रतिसाद लाभला आहे. विशेष म्हणजे रॅण्डम सिलेक्शन ड्रॉचा सध्याचा टप्पा अजून अर्ध्यावर असतानाच हा विक्रम नोंदवला गेला आहे. म्हणजे सामना सुरू होण्याआधीच प्रेक्षकांनी मैदान जिंकून टाकलेय आणि सर्व सामने वर्ल्ड कपच्या पाच महिने आधीच सोल्ड आऊट होणार आहे.





प्रत्येक अर्जासोबत सबमिट केलेल्या व्हेरिफाइड ब्रेडिट कार्डसच्या आधारे तब्बल ३० पट ओव्हरसब्सक्रिप्शन नोंदवण्यात आले आहे. आणखी एक धक्कादायक आकडा म्हणजे १९३० ते २०२२ दरम्यान झालेल्या सर्व २२ वर्ल्ड कपमधील ९६४ सामन्यांतील एकूण प्रेक्षकसंख्येपेक्षा ही मागणी ३.४ पट अधिक आहे. २०२६ च्या तिकीट मागणीसमोर तो बेंचवर बसतो. फुटबॉलचा कुंभमेळा ११ जून पासून सुरू होणार आहे. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांतील १६ शहरांमध्ये सामने खेळवले जातील. यावेळी प्रथमच ४८ संघ खेळणार असल्यामुळे १०४ सामने आणि ३९ दिवस हा थरार रंगणार आहे. १९ जुलैला फुटबॉलचा महायज्ञ पूर्ण होईल. ११ डिसेंबरपासून सुरू झालेल्या या तिकीट प्रक्रियेत २०० हून अधिक देश आणि प्रांतांमधून फुटबॉलप्रेमींनी फिफाच्या वेबसाईटवर धाव घेतली आहे.

### फुटबॉल इतिहासात नवा अध्याय

तिकिटांची विक्रमी मागणी आणि वाढलेला स्पर्धेचा विस्तार पाहता फिफा वर्ल्ड कप २०२६ हा फक्त आकारानेच नव्हे, तर फॅन्सच्या सहभागाच्या बाबतीतही फुटबॉल इतिहासातील सर्वात मोठा आणि संस्मरणीय सोहळा ठरणार आहे. थोडक्यात हा वर्ल्ड कप खेळला जाण्याआधीच लिजंड ठरला आहे.

### स्पर्धा नाही, तर महोत्सव

फिफा अध्यक्ष जियानी इन्फेंटिनो यांनी या ऐतिहासिक प्रतिसादावर प्रतिक्रिया देताना म्हटले, फिफा वर्ल्ड कप २०२६ हा जगातील सर्वात मोठा आणि सर्वसमावेशक क्रीडा सोहळा ठरणार आहे. चाहत्यांचा हा प्रतिसाद म्हणजे फुटबॉलची जागतिक ताकद आहे. उत्तर अमेरिकेत आपण इतिहास घडवत आहोत जिथे एकता, आनंद आणि उत्कृष्ट फुटबॉलसाठी संपूर्ण जग एकत्र येणार असल्याची प्रतिक्रिया फिफा अध्यक्ष जियानी इन्फेंटिनो यांनी दिली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)